अल्पावधीत लोकप्रिय ठरलेले ग्रंथप्रसाराला वाहिलेले दर्जेदार मासिक



# मेहता मराठी ग्रंथजगत


डिसेंबर २०११ । किंमत १५ रुपये















'स्टीव्ह जॉब्ज – एक झपाटलेला तत्रंज्ञ'
या पुस्तकाचे लेखक अच्युत गोडबोले आणि अतुल कहाते यांनी
मेहता पब्लिशिंग हाऊसच्या दालनात पत्रकारांशी
पुस्तकाविषयी दिलखुलास गप्पा मारल्या.

# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ डिसेंबर २०११
◆ वर्ष अकरावे
◆ अंक बारावा

— *अनुक्रमणिका* —

| | |
|---|---|
| **संपादकीय** | ४ |
| **दखल** | १४ |
| **साहित्यवार्ता** | १८ |
| **विशेषवार्ता** | ५० |
| **साहित्य चिंतन** | ५२ |
| **पुस्तक परिचय** | |
| **कॅन्सर रोखू या** | |
| : वन्दना अत्रे/डॉ. चंद्रकांत संकलेचा | ५८ |
| **शास्त्रज्ञांचे जग** : निरंजन घाटे | ६६ |
| **मी संपत पाल** : अनु. सुप्रिया वकील | ७२ |
| **कथा गुर्जरी** : अनु. अंजनी नरवणे | ८० |
| **अभिप्राय** | ८६ |
| **पुरस्कार** | ९४ |
| **वाचकांचा प्रतिसाद** | १०३ |
| **श्रद्धांजली** | १०५ |
| **बालनगरी** | १०८ |

संपादक :
सुनील मेहता

कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

संपादन सहाय्य :
अश्विनी कुलकर्णी

अंकाची किंमत १५ रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा ११ तारखेस

मांडणी-अक्षरजुळणी
*मेहता*
*पब्लिशिंग*
*हाऊस*

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड टेलिफोभवनसमोर, पुणे-४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
Extension **(ग्रंथजगत विभाग) - २२७/२४३**
**Email -** info@mehtapublishinghouse.com
**Website - www.mehtapublishinghouse.com**

**वार्षिक वर्गणी १५० रु. तीन वर्षांची ३५०रु. पाच वर्षांची ५००रु.**
**३ किंवा ५ वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*

# संपादकीय

## मराठी ई-बुक्स

फ्रँकफर्ट बुकफेअर मध्ये यंदा ई-बुक्सच्या हक्कांच्या देव-घेवीचे करार जास्त झाले. ते व्यवहार करण्यासाठी फ्रँकफर्टला उपस्थित राहण्याची गरज तरी काय असा प्रश्न पडला. त्यामुळे बुकफेअरचं महत्त्व आता कमी होत जाईल. इंटरनेटद्वारेच ई-बुक हक्कांचे घरबसल्या व्यवहार होऊ लागतील; हे लक्षात आले.

मराठी पुस्तके ई-बुक्सच्या स्वरूपात उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया आता वेग घेऊ लागली आहे. ही गोष्ट सद्य:काळाशी सुसंवादी अशीच म्हणायला हवी. आपल्याकडे ई-बुक ही संकल्पना नवी असल्याने तिच्याबाबत जनमानसामध्ये खूप शंकाकुशंका, समज गैरसमज आहेत. त्यांचे निराकरण करण्यासाठी मुलाखती, प्रात्यक्षिके, व्याख्याने यांच्या द्वारे प्रयत्न करायला हवे आहेत. छापील कागदी पुस्तके पाहण्याची, वाचण्याची, हाताळण्याची, खरेदी विक्रीची सवय आपल्याला आहे. परंतु हे पुस्तक डिजिटल स्वरूपात संगणकावर, आयपॅडवर, स्मार्टफोनवर, किंवा किंडल, नूक यासारख्या केवळ पुस्तकांच्याच वाचनासाठी तयार केलेल्या वाचनयंत्रावर वाचण्यासाठी उपलब्ध होऊ शकते - ही कल्पना आपल्याकडे अजून सर्वदूर पोचलेली नाही. ऑमेझॉन डॉट कॉमने किंडल हे वाचनयंत्र बाजारात आणून ई-बुक या कल्पनेला व्यवहार्य चौकटीत बसवले.

हजारो पुस्तके एकेका क्लिक सरशी आपल्या संगणकावर किंवा अन्य साधनावर डाऊनलोड करून वाचता येतील, छापील पारंपरिक पुस्तकापेक्षा कमी किमतीत ही पुस्तके वाचता येतील. कागद, ग्रंथछपाई,

बांधणी, साठवणूक, पाठवणी यांचा खर्च करण्याची गरज नसल्याने डिजिटल पुस्तके मुद्रित पुस्तकांपेक्षा कमी किमतीत उपलब्ध होतील हा वाचकांच्या दृष्टीने मोठाच लाभ म्हणावा लागेल. प्रकाशकांच्या दृष्टीनेही पुस्तकांचे संपादन, डीटीपी, प्रूफरीडिंग, मांडणी वगैरे करून छपाईपूर्व सिद्धता करणे एवढेच काम उरल्याने त्यांच्या एकंदर गुंतवणूकीत घट होईल. त्याचाही फायदा वाचकांना मिळणे शक्य होईल. सकृत् दर्शनी हे सर्व आकर्षक वाटते यात शंकाच नाही. परंतु जागतिक ग्रंथव्यवहाराचा एकूण व्याप आणि व्यावसायिक स्वरूप पाहता यात लेखक, प्रकाशक, ग्रंथविक्रेते यांचे हितसंबंध, आर्थिक आणि बौद्धिक संपदेचे हक्क, ज्ञानाची मक्तेदारी, देशोदेशींचे कायदे वगैरे बाबींशी संबंधित मुद्दे लक्षात येऊ लागले आहेत; आणि त्यावर तोडगे काढण्याची संबंधितांची कोशिश सुरू आहे. येत्या दशकात त्याबाबत बरेच विचारमंथन होऊन सर्वमान्य धोरण जागतिक पातळीवर ठरेल अशी आशा बाळगायला हरकत नाही.

ई-बुक्सच्या विक्रीत आणि व्यवहारात वाढ होत असल्याने पारंपरिक पुस्तकांच्या विक्रीत घट होत आहे हे अमेरिका-इंग्लंडमध्ये स्पष्ट होताना दिसते. ॲमेझॉनच्या पारंपरिक पुस्तकविक्रीपेक्षा ई-बुक विक्रीत तीनशे टक्के वाढ गतवर्षी झाली. अमेरिकेतील बॉर्डर्स ही ग्रंथविक्री क्षेत्रातील दुसऱ्या क्रमांकाची संस्था. तिची सहाशे विक्री केंद्रे असूनही तिला दिवाळखोरी जाहीर करावी लागली. ही सर्व स्टोअर्स आता बंद होतील. बार्न्स अँड नोबल या प्रथम क्रमांकाच्या विक्री संस्थेने मात्र ई-बुक्स मध्ये प्रवेश करून, स्वत:चे स्वस्त वाचनयंत्र बाजारात आणून स्वत:ला दिवाळखोरीतून वाचवले आहे. एवढेच नव्हे तर तोटा कमी करण्यातही यश मिळवले आहे. इंग्लंडमध्ये २०० स्टोअर्स असलेल्या वॉटरस्टोन या अग्रगण्य ग्रंथविक्रीसंस्थेला नवीन 'मालक' मिळाला असून, तिची पुनर्रचना चालू आहे. अमेरिका-इंग्लंड या दोन्ही देशात जी स्वतंत्र ग्रंथविक्री केंद्रे आहेत, त्यातील निम्मीअधिक बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. ॲमेझॉन हे जगातील सर्वात मोठे ऑनलाइन ग्रंथविक्री केंद्र सर्व प्रकाशन संस्थांची पुस्तके उपलब्ध करून देते. ॲमेझॉनकडे ९ लाख पुस्तके ई-बुक म्हणून

आज यादीत आहेत. कॉपीराइटमुक्त आणखी २०लाख पुस्तके आहेत. इंग्लंडमधील ७० टक्के ग्रंथव्यवहार तिच्या नियंत्रणात आहे. ॲमेझॉनने नुकतीच द बुक डिपॉझिटरी ही संस्था ताब्यात घेतली असून हे नियंत्रण ८० टक्के एवढे वाढवले आहे. गुगलने जगभरातील वीसेक लाख पुस्तके डिजिटल स्वरूपात आणली आहेत. ती अल्प किंमतीत डाऊनलोड करता येतात. प्रकाशक आणि लेखक यांच्याशी मानधनाबाबत करार केले आहेत. कॉपीराइट कायद्याच्या कक्षेत येणाऱ्या पुस्तकांच्या हक्काबाबत संबंधितांवर अन्याय होऊ नये अशी सावधानता बाळगली आहे. लेखक व ई-बुक कंपन्या यात रॉयल्टी बाबत ३५ ते ५० टक्के असे करार होत आहेत.

मुद्रित पुस्तक आणि ई-बुक ही दोन वेगवेगळी माध्यमे आहेत अशी भूमिका यामध्ये गृहीत धरलेली आहे.

हॅरी पॉटरची पुस्तके ब्लूम्सबरीने छापलेली असली तरी त्याची ई-बुक्स पॉटरपोअर या नव्या कंपनीतर्फे निघणार आहे.

प्रकाशक लेखकाच्या हस्तलिखितावर संपादकीय संस्कार करतो; त्याचे शुद्ध लेखन, मांडणी, सजावट, प्रसिद्धी याकडे लक्ष देतो. पुस्तकाचे मार्केटिंग करतो. ई-बुक म्हणजे प्रकाशकाने सिद्ध केलेल्या पुस्तकाचे स्कॅनिंग करून ते इंटरनेट, संगणक, मोबाईल, आयपॅड, किंडल सारखे वाचन यंत्र यावर उपलब्ध करुन देणे असे ते मानतात. लेखकाने जर स्वत:च पुस्तक डीटीपी करुन घेतले आणि ते कुठल्याही प्रकाशकाकडे न देता ई-बुक वितरकाकडे दिले तर? हा प्रश्न विचारात घेणे इष्ट ठरेल. अमेरिका-इंग्लंड मध्ये बरेच लेखक प्रकाशकाकडे न जाता सरळ आपले पुस्तक इंटरनेटवर टाकतात किंवा ॲमेझॉनसारख्या ई-बुक वितरकाला देतात. त्याला जर मागणी चांगली असेल तर प्रकाशक मुद्रित स्वरूपात पुस्तक काढण्याचे हक्क मिळवतात. गुगलने कॉपीराइट मुक्त पुस्तकांचे स्कॅनिंग करून ती डिजिटल स्वरूपात आणली. ई-बुक आर्कहाइव्ह, ऑनलाइन लायब्ररी यांच्या कार्यपद्धतीतही स्कॅनिंग केंद्रीभूत आहे. परंतु 'ई-बुक' स्वरूपात एखादे मुद्रित पुस्तक विकताना त्याचे स्कॅनिंग न करता स्वतंत्रपणे डीटीपी करण्याचे पथ्य पाळणे इष्ट ठरेल.

ई-बुक चे प्रस्थ मराठीत अजून फारसे वाढलेले नाही, परंतु येत्या काही वर्षात ते निश्चितच वाढत जाणार आहे. प्रकाशकांनी त्यादृष्टीने आवश्यक ते तंत्रज्ञान आत्मसात करायला हवे. अन्यथा त्यांच्या पायाखालची वाळू कधी सरकेल हे त्यांनाही कळणार नाही. किंडल नंतर ई-बुक रीडरच्या क्षमतेत वाढ होऊन किमतीत बरीच घट झालेली आहे. आता मोबाइलवरच ई-बुक सहजपणे वाचता येईल. ब्लॅक अँड व्हाइट मजकुराबरोबर त्यात रंगीत चित्रे वगैरे असतील. वाचनयंत्रासाठी स्वतंत्र खर्च करावा लागणार नाही. साहजिकच ई-बुकचे ग्राहक, वाचक यांच्या संख्येत मोठी वाढ होणार आहे. प्रकाशन क्षेत्राचे सद्य:स्वरूप टिकून राहणे अशक्य आहे. काळाची पावले ओळखून पुढचे धोरण लवचिक ठेवण्यात आपले हित आहे.

❒





**सभासद वर्गणी भरण्यासाठी, व पुस्तके मागविण्यासाठी खालील पत्त्यावरही संपर्क साधू शकता**

## मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२.
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८.००
(शनिवारी बंद)
फोन : (०२३१)२५४२९०१.
टेलिफॅक्स : (०२३१)२५४१८८१.
Email : mehtabooks@eth.net

नवे कोरे




# वन फुट रॉंग

**सोफी लगूना**

अनुवाद
**सुनीति काणे**

१६०रु. पोस्टेज २५रु.

'बाहेरचं जग निषिद्ध होतं. तिथं जाणं धोक्याचं होतं, कारण कुठे थांबायचं, हे तुम्हाला सांगण्यासाठी तिथं भिंती आणि छत नव्हतं.'

सच्चा आवाज. बालपणाच्या धास्तीभरल्या आठवणी जाग्या करता करता उदात्ततेला आवाहन करणारा आणि वास्तवापुढे मान तुकवणाऱ्या निरागसतेची वेदना टिपणारा सच्चा आवाज!

सोफी लगूनानं रेखाटलेलं जग, व्यक्तिरेखांना साजेशी भाषा, यामुळे वाचक गुंगून जातो. हे सारं एका दारुण वास्तवाच्या कथानकाला हाताळताना, एवढ्या तीव्र आणि प्रभावशाली शैलीत ती करू शकलीय, हीच तिच्या लेखन गुणांना मिळालेली पावती म्हटली पाहिजे. भडक पत्रकारितेच्या हे सर्वस्वी विरुद्ध आहे. हे माणुसकी, मनोविकार आणि सत्य यांनी ओतप्रोत भरलेलं आहे.

**इंग्रजीमध्ये सुद्धा उपलब्ध**

**नवे कोरे**

# श्रीमंत लोकांचे पाच नियम


मूळ लेखक

**डॉ. सुधीर दीक्षित**

अनुवाद

**प्रशांत तळणीकर**

२९०रु. पोस्टेज २५रु.




सर्वसाधारणपणे समजलं जातं, तितकं काही श्रीमंत होणं कठीण नाही.
वॉल्ट डिस्नेपेक्षा तर आपली परिस्थिती निश्चितच वाईट नसेल.
ते इतके गरीब होते की, ते फाटकेच बूट घालायचे,
कारण ते बूट शिवायलादेखील त्यांच्याजवळ पैसे नसायचे.
धीरूभाई अंबानींपेक्षा आपली परिस्थिती नक्कीच चांगली असेल.
ते एके काळी पेट्रोलपंपावर पेट्रोल भरणाऱ्या पोऱ्याचं काम करत असत.
आपली परिस्थिती अँड्र्यू कार्नेजीइतकी वाईट नक्कीच नसेल.
ते कधीकाळी हमाली करायचे.
आणि हर्लेन सँडर्सपेक्षा तर आपली परिस्थिती वाईट असणारच नाही.
कारण ते वयाच्या साठाव्या वर्षापर्यंत दरिद्रीच होते.
हे सगळे आणि यांच्याचसारखे इतर अनेक लोक विलक्षण अडचणींचा
आणि संकटांचा सामना करूनच श्रीमंतीच्या शिखरावर पोहोचले.
कळत-नकळत, त्यांनी श्रीमंत होण्याच्या नियमांचं पालन केलं होतं.
खालील प्रश्नांची उत्तरं मिळवण्याकरता हे पुस्तक वाचा -

- सामान्य परिस्थितीमध्ये राहत असूनही त्यांनी यशाचं शिखर कसं गाठलं?
- दारिद्र्य, शिक्षणाचा अभाव आणि अपयश यांच्याशी त्यांनी सामना कसा केला?
- कुठल्या सवयींमुळे ते श्रीमंत होऊ शकले?

**नवे कोरे**




# चिंता सोडा सुखाने जगा

मूळ लेखक

**डेल कार्नेजी**

अनुवाद

**ॲड. शुभदा विद्वांस**

२००रु. पोस्टेज २०रु.

डेल कार्नेजी ह्यांच्या बेस्टसेलर्स पुस्तकांच्या सुधारित आवृत्तीच्या सहा लाख प्रती नुकत्याच प्रकाशित झाल्या आणि लाखो लोकांना अकारण चिंता करण्याच्या सवयीतून मुक्तता मिळाली. डेल कार्नेजींनी १९९० साली व्यावहारिक पातळीवर आचारविचारांची जी सूत्रे सांगितली होती ती आज सुद्धा तेवढीच उपयुक्त आहेत.

तुमच्या व्यवसायासंबंधीच्या पन्नास टक्के चिंता तुम्ही ताबडतोब कमी करू शकता.

तुमच्या आर्थिक चिंता तुम्ही मिटवू शकता.

'निंदकाचे घर असावे शेजारी' ह्या उक्तीप्रमाणे टीकेचा फायदा करून घ्या.

दमणूक टाळा आणि चिरतरुण दिसा.

तुमच्या जागृतावस्थेतच एक तास अधिक मिळवा आणि

स्वत:ला जाणून घ्या, स्वत: म्हणून जगा.

लक्षात ठेवा, ह्या पृथ्वीतलावर तुमच्या सारखा दुसरा कोणीच नाही.

'चिंता सोडा सुखाने जगा' हे पुस्तक मूलभूत मानवी भावना आणि विचार ह्यांना हळुवारपणे हाताळते. हे पुस्तक वाचणे हा एक रोमांचकारक अनुभव आहे. यातील सूचना आचरणात आणणे फार सोपे आहे. त्यामुळे तुमच्यात आमूलाग्र बदल होईल. एवढेच नाही, तर तुम्ही अधिक उच्च प्रतीचे आयुष्य जगू शकाल.

**नवे कोरे**

# मित्र जोडा आणि लोकांवर प्रभाव पाडा

मूळ लेखक

**डेल कार्नेजी**

अनुवाद

**ॲड. शुभदा विद्वांस**




२००रु. पोस्टेज २५रु.

तुम्हाला तुमच्या पसंतीचे काम हवे आहे का? ते तुम्हाला सहज मिळेल. तुम्हाला जे काम मिळाले आहे ते तुम्ही अवश्य घ्या आणि त्यामध्ये अधिक सुधारणा करा.

तुम्ही कोणत्याही संकटात सापडला असाल तर त्याचा उपयोग संधी म्हणून करा.

डेल कार्नेजी ह्यांच्या अजरामर आणि काळाच्या कसोटीला उतरलेल्या उपदेशांमुळे अगणित लोकांनी यशाचे शिखर गाठले आहे. त्यांना व्यावसायिक यश तर मिळालेच पण त्यांचे व्यक्तिगत आयुष्यही समृद्ध झाले.

'मित्र जोडा आणि लोकांवर प्रभाव पाडा' हे पुस्तक तुम्हाला पुढील गोष्टी शिकवते.

लोकांना तुम्ही आवडावे म्हणून करायच्या सहा युक्त्या.


लोकांनी तुमच्याशी सहमत व्हावे म्हणून करायच्या बारा युक्त्या.

लोकांना राग न येऊ देता त्यांच्यात बदल घडवून आणण्याच्या सहा युक्त्या.

आणि आणखीही खूप काही.

'मित्र जोडा आणि लोकांवर प्रभाव पाडा'
ह्या पुस्तकाचा जास्तीत जास्त लाभ घ्या.

**नवे कोरे**




# बऊठाकुरानीर हाट

लेखक
**रवींद्रनाथ टागोर**

अनुवाद
**मेधा बाळकृष्ण तासकर**


१६०रु. पोस्टेज २५रु.

प्रत्येक दीर्घ नि:श्वासावर विस्तृत टीका आणि स्पष्टीकरणे दिली जात होती. विभेला हे सगळे आणखी सहन होईना, म्हणून ती निसटून बागेत आली होती. सूर्य आज ढगांआडूनच उगवला होता, ढगांआडच अस्तास गेला होता. दिवस कधी मावळला आणि संध्याकाळ कधी झाली, ते समजले नाही. संध्याकाळच्या वेळी पश्चिम दिशेला सोनेरी रेषा उमटली होती, पण दिवस मावळताना ती विरून गेली. अंधार घनदाट होऊ लागला. दशदिशा झाकोळून गेल्या. सुरूच्या दाट बनांतून फांद्यांच्या वर इतका अंधार दाटला की, फांद्या एकमेकींत मिसळून गेल्या अन् सहस्र लांबलचक पायांवर भार देऊन प्रचंड विस्तृत नि:स्तब्ध अंधार त्यावर रेलला आहे, असे वाटू लागले.

हळूहळू रात्र होऊ लागली. राजवाड्यातले दिवे एकेक करून मालवले गेले.

**नवे कोरे**

# रामायणातील पात्रवंदना




मूळ गुजराती लेखक

**दिनकर जोषी**

अनुवाद

**अंजनी नरवणे**

१८०रु. पोस्टेज २५रु.

आपण सर्वच जण लहानपणापासून रामायणातील गोष्टी ऐकत आलो. आजही कॉमिक्स, पुस्तकं, टीव्ही, चित्रपट या सगळ्या माध्यमांमधून आपण सगळेच रामकथा बघत, वाचत असतो.

भारतातील भाषांमध्ये व वेगवेगळ्या देशांमध्ये मिळून तीनशेच्या वर लहान मोठी रामायणं लिहिली गेली आहेत. बौद्ध, जैन, मुस्लिम रामायणंही आहेत! अर्थात मूळ अधिकृत ग्रंथ महर्षी वाल्मिकी लिखितच.

बऱ्याचजणांना हे वाचून आश्चर्य वाटेल की वाल्मिकी रामायणाप्रमाणे श्रावणबाळाची कथा वेगळी आहे. जनक राजानं सीतेचं स्वयंवर मांडलंच नव्हतं, रावण अत्यंत विद्वान व धार्मिक शिवभक्त होता आणि कुबेराचा सावत्र भाऊ होता, लक्ष्मणानं 'लक्ष्मणरेषा' काढलीच नव्हती!

आणि मुख्य म्हणजे रामायणातल्या महत्त्वाच्या व्यक्तींचे स्वभाव, गुणदोष, कोणत्या घटनेत कोण कसं आणि का वागलं, विरोधाभास कोणते, या सर्वांचा आपण किती विचार करतो? या पुस्तकात तटस्थ भूमिकेतून, सर्वांबद्दल संपूर्ण आदर बाळगूनही सर्व व्यक्ती व घटनांचं सुंदर विश्लेषण केलं आहे.

ते वाचून, त्यावर विचार करून आपण केवळ अंधश्रद्धाळू न राहता डोळस आणि सश्रद्ध बनू शकतो.

आपल्या संस्कृतीची भागीरथी असणारं रामचरित्र नव्यानं समजून घेऊया!

# दखल



## 'बोक्या सातबंडे'चे यश

दिलीप प्रभावळकर यांच्या बोक्या सातबंडे या पुस्तकाला यंदाचा साहित्य अकादमीचा बालसाहित्य पुरस्कार जाहीर झाला आहे.

साहित्य अकादमीतर्फे १९५५ पासून विविध भाषांतील उत्तमोत्तम साहित्यकृतींना पुरस्कार देण्यात येतात. साहित्य अकादमीच्या पुरस्कारामुळे त्या लेखकाला आणि त्याच्या पुस्तकाला एक वेगळीच मान्यता आणि प्रतिष्ठा लाभते. समकालीन लेखकांमध्ये एरव्ही प्रतवारी लावणे अवघड जाते; परंतु अकादमी सारख्या संस्थेने पुरस्कारासाठी निवड केली म्हणजे एका परीने त्या लेखकाला समकालीनांमध्ये वरचढ ठरवले जाते आणि अन्य समकालीनांना ते मान्य किंवा अपेक्षित असो वा नसो, स्वीकारावे लागते. एखादा नवा वाङ्मयीन प्रवाह अशा पुरस्कारामुळे साहित्यात प्रतिष्ठित होतो. बलुतं, मला उद्ध्वस्त व्हायचंय या सारख्या दलित आत्मकथनांचे पर्व सुरू झाले आणि 'उपरा' आणि 'उचल्या' यांना साहित्य अकादमीचे पुरस्कार मिळाले आणि दलित साहित्याचे भाग्य फळफळले. 'उपरा' चे लेखक लक्ष्मण माने यांना परदेशी आमंत्रणे आली, फ्रेंच वगैरे भाषांत अनुवाद झाले, साडेतीन टक्क्यांचे साहित्य म्हणून ब्राह्मणी साहित्यावरचे त्यांचे घणाघाती हल्ले मराठी माणसाला आवडू लागले, भटक्या विमुक्त जाती जमातींमधील एक झुंजार बोलका तरुण म्हणून यशवंतराव चव्हाण - शरद पवार यांनी लक्ष्मण माने यांना जवळ केले, आमदारपद दिले, आश्रमशाळा काढायला मदत केली, शैक्षणिक संकुलासाठी भरघोस निधी उपलब्ध करून दिला. साहित्य अकादमीचा पुरस्कार 'उपरा'ला मिळाला नसता तर लक्ष्मण माने यांची पुढची नेतृत्वाची वाटचाल इतकी नेत्रदीपक वा सुकर झाली नसती. 'उचल्या' या लक्ष्मण गायकवाड यांच्या आत्मकथनाला १९८८चा अकादमीचा पुरस्कार जाहीर झाला; आणि दलित आत्मकथनांच्या दबदब्यात अधिकच भर पडली. साहित्य हे राजकीय, सामाजिक शस्त्र - साधन म्हणून वापरता येते. वापरले जाते. 'उचल्या' हे लेखनाच्या दृष्टीने फारच कच्चे पुस्तक होते; परंतु उचल्या, भामटे म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जमातीतील अल्पशिक्षित तरुणाचे आत्मकथन म्हणून अकादमीने त्याला गौरवले. एक सामाजिक दस्तऐवज म्हणून 'उचल्या'चे स्वागत इतर भाषांतही चांगले झाले. साहित्य अकादमीच्या काही उच्चपदस्थांना ते खूप आवडले. चीनला जाणाऱ्या भारतीय लेखकांच्या शिष्टमंडळात जाण्याची संधी लक्ष्मण गायकवाड यांना मिळाली. फिल्मसिटीत कँटीन चालवण्याचा खास परवाना त्यांना महाराष्ट्र शासनाने

दिला. सध्याही ते साहित्य अकादमीच्या मराठी विभागाचे समन्वयक आहेत.

साहित्य अकादमीच्या पुरस्काराने असे बरेच काही घडू शकते. तरुणवयात असले मोठे पुरस्कार मिळणे हे आणखीच भाग्याचे ज्यांना ते लाभतात.

-२-

हे पुरस्कार आतापर्यंत प्रौढ साहित्याच्या संदर्भातच सीमित होते. गेल्या वर्षापासून ते बालसाहित्यालाही देण्यात येत आहेत. त्यामुळे बालसाहित्याकडे दुर्लक्ष होते किंवा त्याची उपेक्षा होते ही तक्रार थोडीफार कमी होऊ शकेल. गेल्या वर्षी अनिल अवचट यांच्या 'सृष्टीत..गोष्टीत' या पुस्तकाला साहित्य अकादमीचा बालसाहित्य पुरस्कार दिला गेला. बालसाहित्याच्या क्षेत्रात अनिल अवचट यांचे हे पहिलेच पाऊल. पण ते मोठे दमदार होते. आजोबाच्या भूमिकेत गेलेले अनिल अवचट आपल्या नातवंडांच्या सान्निध्यात स्वत:च्या बालपणाचे क्षण जणू पुन्हा जगू पाहतात; बालसदृश निरागस वृत्तीने अवतीभवतीच्या परिसरातल्या प्रत्येक गोष्टीकडे नव्या नवलाईने बघू लागतात. त्या सर्व गोष्टी त्यांच्याशी मोकळेपणाने जणू बोलू लागतात. आपल्या व्यथावेदना, सुखदु:खे, आवडीनिवडी, भयशंका प्रांजलपणे प्रकट करू लागतात. त्या त्यांच्या कहाण्या 'दाढीवाले काका' आपल्यापर्यंत पोचवतात. कधी मिस्किलपणे, कधी गंभीरपणे. पंखा, टेप, विजेचा दिवा, कूलर, खांब .... त्यांच्यातील हेवेदावे, स्पर्धा,... माणसासारखेच सर्व काही! पण निसर्गाचा महिमा अपरंपार... पंख्याच्या नियंत्रित वाऱ्यापेक्षा स्वाभाविक झुळूक परमशीतल!

असे कल्पनाशक्तीचे तरल, वास्तवदर्शी नमुने अवचटांच्या या बालकथांमध्ये विखुरलेले आहेत.या प्रत्येक कथेवर वेगवेगळ्या अंगांनी भाष्य करता येईल. वेगवेगळ्या दृष्टीतून आजच्या मानवी जीवनावर, पर्यावरण ऱ्हासावर, अनैसर्गिक जीवनशैलीवर टीकाटिपणी होऊ शकेल.

या संग्रहावर लिहिताना मी म्हटले होते, ''या पुस्तकातील एकूण ऐवज बालसाहित्यात अवचटांना मानाचे स्थान मिळवून देण्यास समर्थ आहे. बालकथांना साजेशा कल्पनाशक्तीला तशाच अर्थपूर्ण, लयबद्ध भाषाशैलीची जोड मिळाल्याने या कथांचे श्रवणही सुखदायक ठरते.''या पुस्तकाला साहित्य अकादमीचा बालसाहित्याचा पुरस्कार - हा निश्चितच अगदी सुविहित होता.

-३-

दिलीप प्रभावळकर यांच्या 'बोक्या सातबंडे' या बालनायकाच्या विविध करामतींच्या कथांची ७ पुस्तके गेल्या पंधरा वर्षात निघाली आहेत. या सात पुस्तकात तीसावर कथा समाविष्ट झाल्या आहेत.

आकाशवाणीसाठी प्रथम प्रभावळकरांनी वीसपंचवीस श्रुतिका लिहिल्या. त्यात बोक्या सातबंडे हा बालनायक केंद्रस्थानी होता. दहा वर्षे वयाचा हा बालनायक एका

हाऊसिंग सोसायटीत राहणारा. घरी त्याचा मोठा भाऊ विजयेंद्र - कॉलेजात जाणारा. नाट्य वगैरे विषयात रस घेणारा. बोक्याचे खरे नाव चिन्मयानंद. पण त्या नावाने त्याची आजीच तेवढी हाक मारते. बाकी सर्वजण बोक्या या नावानेच त्याला हाक मारतात. त्याचे वडील प्रदीप सातबंडे उद्योजक, आई महिला मंडळात सक्रिय. आजी थोडी मॉडर्न. सर्वांशी मिळून मिसळून वागणारी. बोक्यावर तिचा जीव असणारच! सातबंडे परिवार तसा सुखवस्तू. घरात वातावरण मोकळे. शिवाय कॉलनीतले शेजारी, मोठ्या भावाचे शाळा कॉलेजातले मित्र. शिक्षक.

बोक्या कल्पक, चलाख, चतुर, बोलका, चटपटीत. दुसऱ्यांना नेहमी मदत करणारा. त्यासाठी हवे ते करणारा. लोकांचे मानसशास्त्र जाणणारा. समकालीन वास्तवाचे भान असणारा. इव्हेंट मॅनेजमेंटचे उपजत ज्ञान असणारा.

राजहंस प्रकाशनच्या दिलीप माजगावकरांनी श्रुतिकांचे कथांमध्ये रूपांतर करण्याचा आग्रह केला, त्यामुळे दिलीप प्रभावळकर यांनी बोक्याच्या कथा लिहिल्या. दहा वर्षे वयाला झेपतील अशी साहसे त्याला करायला लावली. कधी कधी वयाला न झेपणारीही कामे त्यानी केली.

बोक्या एकदा कॉलनीतल्या टिम्या घोसाळेच्या घरातले रंगीत मासे, पांढरे उंदीर, लव्हबर्डस, बेडूक, एवढेच नव्हे तर बिनविषारी साप, कासव, वगैरेंना घरी घेऊन येतो. आठ दिवस त्यांना घरी ठेवतो.... त्यात जे घोटाळे होतात त्यातून सारे घरच नव्हे तर कॉलनीत हलकल्लोळ माजतो. आठ दिवसांनी घोसाळे कुटुंब बेळगावहून परत येते तेव्हा बोक्याची सगळेजण तारीफ करतात. बोक्या दादाला त्याच्या प्रेमप्रकरणात मदत करतो. हंगामेंच्या घरात डांबून ठेवलेल्या संगीताला त्यांच्या तावडीतून सोडवून तिच्या आईवडिलांकडे पोचवतो. आपल्याकडे आलेल्या नंदकिशोर भातसांडे या आगाऊ गळेपडू पाहुण्यांना पळवून लावतो. पैसे मिळवण्यासाठी बेबी सीटिंग करतो; दादाच्या नाटकातले एक पात्र आजारी पडते तेव्हा आपल्या बाबांना तो त्या नाटकात काम करायला तयार करतो. गुप्तखजिना मिळवण्यासाठी अंगुष्ठे यांच्या अंगणात खड्डा खणतो. गुप्त खजिना सापडत नाही, पण त्या खड्ड्यात अंगुष्ठ्यांचा भावी जावई पडून त्याचे हाड मोडते. त्यामुळे अंगुष्ठ्यांची बेबी बोक्याला 'नको त्या नवऱ्यापासून वाचवले' म्हणून धन्यवाद देते. आपल्या कॉलनीतल्या कामवाल्या बायांच्या घरच्या मुलांसाठी सुटीचे शिबिर घेऊन, त्यांना स्पेशल बसने सहलीसाठी खंडाळा येथे घेऊन जातो. घाटात ब्रेक निकामी झाल्यावर बोक्या धाडसाने बस थांबवतो. त्याच्या साहसाची बातमी वृत्तपत्रात येते. त्याला बक्षीस मिळते. शाळेत सत्कार होतो. अशा अनेकविध करामती पहिल्या तीन भागात आल्या. या पुस्तकांना वाचकवर्गाने उत्तम प्रतिसाद दिला. त्यावर चित्रपट निघाला. पुढचे दोन भाग २००७ मध्ये निघाले. सहावा व सातवा भाग नुकतेच बाजारात आले.

गोट्या (ना. धों. ताम्हनकर), फास्टर फेणे (भा. रा. भागवत) या दोन कुमारनायकांनी

मराठी बालमनाचे त्या त्या काळात, गेल्या शतकात रंजन केले. मराठी मुलांना रोल मॉडेल पुरवले. रेल्वेने प्रवास हे गोट्याच्या दृष्टीने एक मोठे थ्रिल होते.

नेफा आघाडीवर चिनी सैनिकांचा समाचार घेणे, बैलगाडीच्या शर्यतीत भाग घेणे, विमान अपहरण करणाऱ्या गुंडांना हिसका दाखवणे, चक्रीवादळात सापडलेल्या लोकांची सुटका करणे वगैरे साहसांमुळे फास्टर फेणे हा समकालीन वाटला. मुलांना प्रिय झाला.

बोक्या सातबंडे हा फास्टर फेणेच्या पुढचा टप्पा म्हणता येईल. तोही समकालीन वास्तवाशी आपले सूत जुळवतो. ध्वनिप्रदूषण, शॉपिंग मॉल, मॉडेलिंग, ओल्ड पर्सन्स एक्सेंज प्रोग्रॅम (ओपीईपी), दादाचे नाटक पाडण्याचा प्रयत्न करणाऱ्या दामलेसारख्या गुंड प्रवृत्तीच्या तरुणाचा बंदोबस्त करणे, हॉस्पिटलमध्ये आई असताना इतर पेशंटना मदत करणे वगैरे कामे करतो. आजीच्या पंचाहत्तरीचा सोहळा साग्रसंगीत घडवून आणून इव्हेंट मॅनेजमेंटचे कौशल्य प्रकट करतो. वडिलांच्या सरांचा सत्कार समारंभ थाटात साजरा करतो. एवढेच नव्हे तर जर्मनीतील एका छळछावणीच्या म्युझिअमला भेट देऊन, तेथे दिसलेल्या छायाचित्रावरून संबंधित व्यक्तीचा शोध लावून तिला भेटून तिला आपण काढलेले चित्र देतो. ''आपण माणसं आहोत. राक्षस नाही.'' हे त्याचे उद्गार जर्मनीतील टीव्हीवरून सर्वदूर पोचतात.

'बोक्या'चे पुढचे पराक्रम याच शैलीत पुढे चालू राहतील. फास्टर फेणेचे वीस भाग निघाले. चाळीस वर्षे जाऊनही फास्टर फेणे बारा तेरा वर्षांचाच राहिला. गेल्या १६-१७ वर्षांत बोक्याही दहा-बारा वर्षांचे वय टिकवून आहे.

-४-

'बोक्या'ला साहित्य अकादमीचा बालसाहित्याचा पुरस्कार मिळाला हे उचितच झाले. अनिल अवचट आणि प्रभावळकर हे एकविसाव्या शतकातल्या पहिल्या दशकातले बालसाहित्यकार म्हणून प्रस्थापित होतील. पुढच्या बालसाहित्यकारांना कुमार नायकांची कारकीर्द रंगवताना संगणक, इंटरनेट, मोबाईल, सोशल नेटवर्किंग, अंतरिक्षयाने, आभासमय विश्व याकडे वळावे लागेल. हॅरी पॉटर, हॉबिट, दि लॉर्ड ऑफ द रिंग्ज सारख्या फॅंटसीकडे वळावे लागेल. छोट्या कथांऐवजी हॅरी पॉटर प्रमाणे अनेक खंड व्यापणारे विशाल पर्यायी विश्व निर्माण करावे लागेल. अचाट कल्पनाशक्तीची आराधना-साधना करावी लागेल. बालसाहित्य हे नव्या दशकात अब्जावधींच्या उलाढालीचे क्षेत्र ठरणार आहे. आजच्या हुशार, तल्लख, तंत्रज्ञानप्रवण मुलामुलींना अर्थपूर्ण वाटेल असे काही लेखन करण्याचे आव्हान मोठे असणार आहे.

❒

**शंकर सारडा**

ई १० पाटील रिजन्सी, १५ एरंडवणे, पुणे ४११००४.

मोबा.९८२३२६१०२३

# साहित्यवार्ता



*** ट्रान्सट्रोमर यांना साहित्यातील नोबेल**

मानवी मनाचा तात्त्विक मागोवा घेणारे स्वीडनचे कवी टॉमस ट्रान्सट्रोमर यांना २०११ चा साहित्यातील नोबेल पुरस्कार जाहीर झाला आहे. हा पुरस्कार १५ लाख अमेरिकन डॉलर्सचा आहे. ८० वर्षांचे ट्रान्सट्रोमर यांच्या कविता धूसर प्रतिमांद्वारे गहन आशय मांडून वास्तवाचे अभिनव दर्शन घडवतात, असा गौरव निवडसमितीने केला आहे. आंतरिक भावविश्वाचा व विचारविश्वाचा वेध घेणाऱ्या त्यांच्या कविता ६० भाषांत अनुवादित झाल्या आहेत.

ट्रान्सट्रोमर यांचा जन्म स्टॉकहोममध्ये १९३१ साली झाला. स्टॉकहोम विद्यापीठातून उच्च विद्याविभूषित झाल्यावर मानसोपचार तज्ज्ञ म्हणून ते कार्यरत होते. महाविद्यालयात शिकत असतानाच वयाच्या २३ व्या वर्षी १९५४ मध्ये '१७ डिक्टर' (१७ कविता) हा त्यांचा पहिला काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला होता. १९५८ आणि १९६६ मध्ये त्यांचे पुढचे दोन काव्यसंग्रह प्रसिद्ध झाले. त्यात बाल्कन्स, स्पेन आणि आफ्रिकेतील भटकंतीतून त्यांना गवसलेल्या भावप्रतिमा शब्दबद्ध झाल्या होत्या. 'विण्डोज अँड स्टोन्स' या नावाने त्या इंग्रजीत अनुवादित झाल्या. १९७४ साली प्रसिद्ध झालेल्या 'ओस्टेर्सजोअर' या संग्रहात बाल्टिक प्रांताचा धगधगता इतिहास आणि भौगोलिक व सागरी संघर्षाचा मागोवा आहे. हा संग्रह 'बाल्टिक्स' नावाने इंग्रजीत आला.

१९९० मध्ये त्यांना हृदयविकाराचा झटका आला आणि पक्षाघाताच्या झटक्याने त्यांचे अर्धे अंग लुळे पडले. त्यामुळे त्यांच्या वाक्क्षमतेवर मोठाच परिणाम झाला. तरीही जिद्द न हरता त्यांची लेखणी चालू राहिली. १९९६ मध्ये 'सॉर्गेगोल्डोलेन' हा त्यांचा काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला आणि पहिल्याच फेरीत त्याच्या ३०००० प्रती विकल्या गेल्या! १९९७ मध्ये 'सॉरो गोल्डोलेन' हा त्याचा इंग्रजी अनुवादही प्रकाशित झाला. २००४ मध्ये 'द ग्रेट एनिग्मा' हा त्यांच्या निवडक इंग्रजी अनुवादित कवितांचा संग्रह प्रसिद्ध झाला.

*** माहितीच्या सुरक्षिततेबाबत वाढती चिंता**

'सायबर' हल्ले हा जगभरातील औद्योगिक, व्यावसायिक, वाणिज्यिक आणि आणि अन्य संस्थांपुढील गहन प्रश्न बनला आहे. यापैकी जवळ जवळ सत्तर टक्के कंपन्यांनी असे हल्ले परतवून लावण्यासाठी किंवा हल्लेच होऊ नयेत, यासाठी 'फायरवॉल' आणि अन्य माध्यमांद्वारे कडेकोट बंदोबस्त केला आहे. 'हॅकर्स'च्या नाड्या आवळत असताना, माहितीची चोरी किंवा अनवधानाने वा नजरचुकीने माहिती पूर्णपणे नष्ट होणे किंवा करप्ट होणे, या बाबींची तीव्रता जाणवत आहे.

गोपनीयता आणि माहिती व्यवस्थापन क्षेत्रांत संशोधन करणाऱ्या 'पोनेमॉन' या संस्थेने माहिती सुरक्षिततेमध्ये अग्रगण्य असलेल्या 'पीजीपी कॉर्पोरेशन'च्या सहकार्याने जागतिक पातळीवर २००९ मध्ये केलेल्या सर्वेक्षणाचे निष्कर्ष धक्कादायक आहेत. माहितीच्या सुरक्षेसाठी विविध क्षेत्रांतील कंपन्यांनी३० लाख ४३ हजार डॉलर खर्च केले आहेत. 'कॉर्पोरेट' आणि आरोग्यविषयक आस्थापनांमधील माहिती अपघाताने किंवा नजरचुकीने नष्ट होऊ शकते असा ६१ टक्के कर्मचाऱ्यांचा अंदाज आहे; तर कंपनीशी थेट संबंध नसलेल्या किरकोळ विक्रेत्यांकडूनही माहिती नष्ट होऊ शकते, असे ४१ टक्के लोकांना वाटते. एखाद्या कंपनीच्या संगणक प्रणालीमध्ये प्रवेश करणाऱ्या हॅकर्सकडूनही अशा घटना घडू शकतात, असे ८ टक्के कर्मचाऱ्यांना वाटते. 'हॅकर्स'चा प्रवेश रोखण्यासाठी ७० टक्के कंपन्यांनी बंदोबस्त केला आहे.

*** चंद्रपूरचे साहित्य संमेलन ३ ते ५ फेब्रुवारीदरम्यान**

८५ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन ३, ४ व ५ फेब्रुवारी २०१२ रोजी चंद्रपुरात होणार आहे. सहा परिसंवाद, दोन कविसंमेलने, एक कथाकथन आणि सांस्कृतिक कार्यक्रम, अशी भरगच्च साहित्य मेजवानी या संमेलनात मिळणार आहे.

तीन फेब्रुवारीला सकाळी ८ वाजता ग्रंथदिंडीने या संमेलनाची सुरुवात होणार आहे. ११ वाजता ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन मावळते अध्यक्ष उत्तम कांबळे यांच्या हस्ते होणार आहे. संमेलनाचा मुख्य उद्घाटन सोहळा दुपारी चार ते सात या वेळात होणार आहे.या संमेलनाला उपस्थित राहणाऱ्या प्रतिनिधींना निव्वळ उपस्थिती नि:शुल्क





४थी आवृत्ती

## वाचनातून विज्ञान

—— डी. एस. इटोकर

विद्यार्थ्यांना विज्ञानातील रहस्यांचा शोध घेण्यास प्रवृत्त करणारे वैज्ञानिक प्रयोग

१२०रु. पोस्टेज २५रु.

ठेवण्यात आली आहे. याशिवाय तीन दिवसांच्या नाश्ता-भोजन-चहासाठी ५०० रुपये, तर निवास, भोजन शुल्क दीड हजार रुपये आहे.

ग्रंथ प्रदर्शनासाठी १३० गाळे उपलब्ध आहेत.

चंद्रपूरला ३ ते ५ फेब्रुवारी २०१२ या कालावधीत होत असलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या लोगोचे तसेच, वेबसाईटचे प्रकाशन राज्याचे सांस्कृतिक व पर्यावरण मंत्री संजय देवतळे यांच्या हस्ते झाले. महामंडळाच्या अध्यक्ष उषा तांबे, स्वागताध्यक्ष शांताराम पोटदुखे, आमदार नाना शामकुळे, गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विजय आईंचवार, प्राचार्य डॉ. कीर्ति वर्धन दीक्षित, डॉ. उज्ज्वला मेहेंदळे वगैरे उपस्थित होते.

महामंडळाच्या बैठकीत नियोजित कार्यक्रम पत्रिका निश्‍चित झाली. संमेलनासाठी तयार करण्यात आलेल्या विशेष लोगोचे व वेबसाईटचे प्रकाशन सांस्कृतिक मंत्री संजय देवतळे यांच्या करण्यात आले.

नागपूरचे संजय धोतरकर यांच्या लोगोची निवड करण्यात आली.

*** पानिपतचं रणांगण!**

आपल्या मुलखात भ्रष्टाचारी मार्गानं पैसा कमवायचा आणि परमुलखात नेऊन वाढवायचा. हिंदुस्थानी माणसाचा हा छंद जोवर सुटत नाही तोवर आपल्या द्रारिद्र्याची लक्तरं अशीच जगाच्या वेशीवर टांगली जातील...' विश्‍वास पाटील लिखित आणि वामन केंद्रे दिग्दर्शित 'रणांगण' या नाटकातील सदाशिवराव भाऊ यांच्या तोंडी असलेला हा प्रसिद्ध संवाद.

पानिपत युद्धाचं यंदाचं २५० वं वर्ष आहे. या निमित्तानं पुण्यातल्या युवा रंगकर्मींनी रणांगण पुन्हा एकदा रंगमंचावर आणायचं ठरवले आहे. दिग्पाल लांजेकर या नाट्यकर्मीनं ही धुरा उचलली आहे.

सवाई आणि श्री गणंजय या दोन संस्थांच्या मदतीनं येत असलेलं रणांगण प्रायोगिक पद्धतीनं सादर होणार आहे. पानिपतात एक लाख मराठी सैन्य मारलं गेलं आणि युद्धात हार पत्करावी लागली. म्हणून 'पानिपत म्हणजे सर्वनाश' असं म्हटलं जात असलं, तरी ते तसं नाही. या युद्ध काळात अफाट प्रयत्न झाले होते. त्याकाळी झालेले प्रयत्न आणि वस्तुस्थिती आजच्या तरुणांपुढे मांडण्यासाठी हे नाटक आहे.

जुन्या नाटकात निवेदन जास्त होतं. ते या नाटकात कमी प्रमाणात असेल आणि मोन्टाजेसच्या माध्यमातून त्या घटना उलगडतील. तसंच संगीत हा या नाटकातला महत्त्वाचा घटक आहे. कादंबरी वाचताना जो परिणाम साध्य होतो, तोच परिणाम नाटकातून देण्याचा प्रयत्न आहे. या नाटकाचं नाव 'पानिपतचं रणांगण' असणार आहे. ज्येष्ठ नाटककार वसंत कानेटकर यांनी हे नाव सुचवलं होतं.

नव्या नाटकात सदाशिवरावभाऊच्या भूमिकेत योगेश सोमण असून ज्ञानेश

वाडेकर, रोहन मंकणी, शैलेश खोत यांच्या प्रमुख भूमिका आहेत. संगीताची जबाबदारी केदार दिवेकर निभावतोय. प्रकाश योजना चंद्रशेखर कुलकर्णी आणि तेजस देवधर करत असून नेपथ्य अनघा लांजेकर करताहेत. रोहन मंकणी, रामचंद्र निजामपूरकर आणि निखिल आगले यांनी निर्मितीची जबाबदारी उचलली आहे.

*** 'संयुक्त' मानापमान!**

अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलनाचे यजमानपद संयुक्तपणे स्वीकारण्यास नाट्य परिषदेची सांगली मुख्य शाखा आणि चिंतामणीनगर शाखा या दोन्ही संस्था राजी झाल्याने ९२ वे संमेलन आयोजित करण्याचा मान सांगली शहराला मिळणार आहे.

स्वागताध्यक्षपदी डॉ. पतंगराव कदम यांनी शहरातील शाखांशी चर्चा करून हे संमेलन संयुक्तपणे होईल, अशी घोषणा केली.

चिंतामणी नगर शाखेचे अध्यक्ष शफी इनामदार म्हणाले, 'मुख्य शाखा संमेलन संयुक्तपणे आयोजित करण्यास राजी झाली आहे. या संमेलनाचे सगळे आर्थिक व्यवहार मुख्य शाखेकडे असतील. चिंतामणीनगर शाखा कोणत्याही पदाची मागणी करणार नाही. मुख्य शाखा जी काही जबाबदारी सोपवेल ती पार पाडली जाईल.'

सांगली मुख्य शाखा आणि चिंतामणीनगर शाखा या ९२ व्या नाट्यसंमेलनाच्या आयोजक संस्था असतील. तसेच इस्लामपूर आणि मिरज या शाखा सहयोगी संस्था म्हणून भूमिका निभावतील, असे सांगली मुख्य शाखाध्यक्ष डॉ. दयानंद नाईक यांनी सांगितले.

*** नाट्यछटा जन्मशताब्दी**

मराठीतील पहिली नाट्यछटा दिवाकर यांनी १८ सप्टेंबर १९११ रोजी लिहिली. तिचे नाव होते 'महासर्प.' बोलणारे एक पात्र व ऐकणारा एक किंवा अनेक यांच्यातील संवाद म्हणजे नाट्यछटा. दिवाकर यांनी हा प्रकार इंग्रजीतून घेतला होता. रॉबर्ट ब्राउनिंग या नाटककाराचा दिवाकरांवर प्रभाव होता. ब्राउनिंग यांनी मोनोलॉग हा


२री आवृत्ती

**थेंबभर पाणी अनंत आकाश**



**सुरेखा शहा**

ओसाडीतून नंदनवन निर्मिणाऱ्या पाण्याच्या थेंबाथेंबातून जीवन देऊन शेतकऱ्यांना समृद्ध करणाऱ्या, भूमी व भूमिपुत्रांवर प्रेम करणाऱ्या
पद्मश्री डॉ. भवरलाल जैन यांच्या उत्तुंग यशाची कथा

२८०रु. पोस्टेज ३०रु.

प्रकार हाताळला होता. त्याचे मराठी नाव 'नाट्यछटा' झाले. वास्तविक, आधी मनोरंजन किंवा करमणूक मासिकांमध्ये 'नेपथ्यपाठ' या नावाने अशा छटा येत. परंतु दिवाकर यांचे मार्गदर्शक, मित्र प्रा. वासुदेवराव पटवर्धन यांनी 'नाट्यछटा' हे नामाभिधान केले. दिवाकरांच्या लेखणीच्या बहराचा तोच काळ होता. त्यामुळे दिवाकरांनी ५१ नाट्यछटा लिहिल्या. त्याचा प्रभाव पुढच्या अनेक पिढ्यांवर होता. एवढेच नव्हे, तर पुढे पुढे शाळांच्या स्नेहसंमेलनात अशा नाट्यछटा सादर होत. काही शाळांत त्यांच्या स्पर्धाही होत.

दिवाकर यांचे नाव साहित्यात या एकाच प्रकाराने नोंदविले गेले. वि.स.गोगटे यांनी स्वत:च्या काही नाट्यछटा गुजराती व हिंदीत भाषांतरीत केल्या; पण दिवाकरांच्या नाट्यछटेची सर त्याला आली नव्हती. 'पंत मेले, राव चढले', 'वर्डस्वर्थचे फुलपाखरू', 'फाटलेला पतंग', 'एका नटाची आत्महत्या', 'बोलावणं आल्याशिवाय नाही' अशा नाट्यछटा बहारदार होत्या.

दिवाकर मूळचे नगरचे. १८८९ मध्ये त्यांचे आजोबा पुणेकर झाले. १८ जानेवारी १८८९ रोजी गोविंद बळवंत दिवाकरांना पुत्ररत्न झाले, ते आपले नाट्यछटाकार दिवाकर. पुढे ते दत्तक गेले, त्यांचे नाव शंकर गर्गे झाले तरी त्यांनी सर्व लिखाण दिवाकर नावानेच केले. पोलीस खात्यात १५ रुपयांवर व पुढे डिप्रेस्ड क्लासेस मिशनच्या सेंट्रल प्रायमरी स्कूलमध्ये शिक्षक म्हणून नोकरी केली.

*** ज्युलिअन बार्न्स यांना 'मॅन बुकर'**

ग्रंथविश्वातील सर्वपरिचित आणि सर्वमान्य 'मॅन बुकर' पुरस्कार यंदा ब्रिटिश लेखक ज्युलिअन बार्न्स यांना 'द सेन्स ऑफ ॲन एंडिंग' या कादंबरीसाठी मिळाला. तीन वेळा बुकरच्या 'शॉर्टलिस्ट'मध्ये झळकलेल्या बार्न्स यांना यंदा या पुरस्काराने हुलकावणी दिली नाही.

निवड समितीच्या प्रमुख डेम स्टेला रिमिंग्टन यांच्या हस्ते त्यांना ५० हजार पौंडांचा हा पुरस्कार देण्यात आला. बार्न्स यांचे पुस्तक एकविसाव्या शतकातल्या माणसाचे सुंदर शब्दरूप असल्याचा निवड समितीचा निर्णय झाल्याचे रिमिंग्टन यांनी म्हटले.

बार्न्स यांना यापूर्वी १९८४ साली 'फ्लॉबर्ट्स पॅरट', १९९८ साली 'इंग्लंड, इंग्लंड' आणि २००५ मध्ये 'आर्थर ॲण्ड जॉर्ज' या पुस्तकांसाठी बुकरचे मानांकन मिळाले होते. बार्न्स यांनी यापूर्वी १० कादंबऱ्या लिहिल्या असून तीन कथासंग्रह आणि पत्रकारितेतील लिखाणाची तीन पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. त्यांचे लिखाण तीसाहून अधिक भाषांमध्ये अनुवादित झाले आहे.

लंडनमध्ये वाढलेल्या आणि ऑक्सफर्डमध्ये शिकलेल्या बार्न्स यांनी ऑक्सफर्ड शब्दकोशाच्या पुरवणी विभागात 'लेक्सिकोग्राफर' पदावर काम केले आहे. काही

काळ पत्रकारितेत घालविल्यानंतर न्यू स्टेट्समन आणि न्यू रिव्ह्यू या नियतकालिकांमध्ये साहित्य संपादकाचे पद भूषविले. १९८० साली मेट्रोलॅण्ड या कादंबरीद्वारे त्यांनी आपल्या साहित्याचा श्रीगणेशा केला. ज्युलिअन बार्न्स यांच्या 'द सेन्स ऑफ ॲन एंडिंग' या कादंबरीमध्ये मध्यमवयीन नायकाच्या तीन शाळकरी मित्रांसोबतच्या आठवणींना प्राधान्य मिळाले आहे.

*** ७५ हजार प्राचीन हस्तलिखिते डिजिटल स्वरूपात**

७५ हजार हस्तलिखितांना 'डिजिटल फॉरमॅट'देण्यात 'नॅशनल मॅन्युस्क्रिप्टस' मिशनने (एनएमएन) पुढाकार घेतला आहे. एक लाखांहून अधिक पाने 'डिजिटल डेटा'च्या माध्यमातून उपलब्ध आहेत. प्राचीन इतिहासातील महत्त्वाच्या नोंदी 'डिजिटल' स्वरूपात जतन करण्याच्या दुसऱ्या टप्प्यात ५५ हजार हस्तलिखितांच्या डिजिटलायझेशनचे काम पूर्ण झाले. तिसऱ्या टप्प्या अंतर्गत पुण्यातील भारत इतिहास संशोधक मंडळ, भुवनेश्वर येथील ओरिसा स्टेट म्युझियम आणि लखनौतील अखिल भारतीय संस्कृत परिषद या ठिकाणी 'डिजिटलायझेशन'चे काम सुरू आहे, 'एनएमएन'च्या संचालिका डॉ. दीप्ती त्रिपाठी म्हणाल्या की तिसऱ्या टप्प्यातील तीन कोटी रुपयांच्या कामांना मंजुरी मिळाली आहे.

'नॅशनल डिजिटल मॅन्युस्क्रिप्टस लायब्ररी'मुळे भाषा, विषय, लेखक, लिपी आणि टायटल असा 'सर्च' देऊन हस्तलिखितांचा अभ्यास करता येईल. त्यासाठी 'एनएमएन' आणि 'आनंदाश्रम' तर्फे कार्यशाळा घेण्यात आली.

*** कवितेत कल्पकता असणे गरजेचे**

''कविता ही लिहिली जात नाही, तर ती आपोआप उमलते. कवितेसाठी केवळ शब्दांची जुळवाजुव नको, तर कवितेचे वेड लागायला हवे. कवितेत प्रतिभा आणि कल्पकता असणे गरजेचे आहे,'' असे मत शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी सागर काकडे लिखित 'माझ्या मनातलं' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन करताना व्यक्त केले. या प्रसंगी सागर काकडे, प्रकाश शिरोळकर, जतिन लखामदे, महेश घाटपांडे, संजय गुजर उपस्थित होते.

*** गुगल प्लस मुळे फेसबुकला नवा फेस**

गुगल या इंटरनेटमधील जायंट कंपनीने मर्यादित ॲक्सेस असणाऱ्या 'गुगल प्लस'ची विंडो सर्वांसाठी खुली केली आहे. हँगआऊट, सर्च, गेम्स या फीचर्सचा समावेश प्रथमच नेटवर्किंग साइटवर केला आहे. या सोशल नेटवर्किंग साइटच्या वाढत्या लोकप्रियतेमुळे बड्या कंपन्यांमध्ये नव्याने 'सोशल वॉर' सुरू झाल्याचे दिसते.

गुगल प्लस च्या ॲडव्हान्टेजला टक्कर देण्यासाठी सोशल नेटवर्किंगमधील मार्क झुकरबर्ग यांच्या 'फेसबुक'नेही 'फेस' बदलला! यातील 'न्यूज फीड'ला वृत्तपत्राचा

लुक दिला आहे. याचबरोबर इन्स्टंट चॅटसाठी 'टीकर' सुविधाही लाँच केली आहे. यामध्ये 'न्यूज फीड' शेअर केलेली व्यक्ती ऑनलाइन असेल, तर चॅट विंडो मध्ये न जाता आपण थेट तिच्याशी चॅटिंग करू शकतो.

गुगलच्या सर्च इंजिनवरूनही गुगल प्लस ॲक्सेस करता येईल; तसेच प्लस वरील 'सर्च' या फीचरमुळे सोशल नेटवर्कवरून शेअर केलेली माहिती शोधता येईल.

ऑर्कुट आणि फेसबुक या दोन्ही सोशल नेटवर्किंग साइट २००४ मध्ये सुरू झाल्या. सुरवातीस गुगलने बाजी मारली. मात्र २००८ मध्ये 'फेसबुक'ने नवी फीचर्स समाविष्ट करून 'ऑर्कुट'ला मागे टाकले. जून २०११ रोजी 'गुगल प्लस' ही नवी सोशल नेटवर्किंग साइट लाँच केली गेली.

*** कॅंपस फिल्म सोसायटी**

''मराठीला समृद्ध साहित्याची परंपरा आहे. सामाजिक विषय मांडण्याची सुरवात३० च्या दशकात या मातीतून झाली. समाजातील वेगवेगळ्या समस्या आणि संस्कृतीवर 'प्रभात'ने खूप चांगले चित्रपट दिले,'' असे गौरवोद्‌गार प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक श्याम बेनेगल यांनी पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाच्या 'कॅंपस फिल्म सोसायटी'चे उद्‌घाटन करताना काढले. चित्रपट समीक्षक सुधीर नांदगावकर, सतीश जकातदार, विद्यापीठाचे मनोहर जाधव, विद्यागौरी टिळक, राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाचे संचालक प्रशांत पाठराबे आदी यावेळी उपस्थित होते.

''विद्यापीठांबरोबरच संलग्न महाविद्यालयांमध्येही फिल्म सोसायटी असण्याची गरज आहे. याद्वारे चित्रपटाची भाषा विद्यार्थ्यांना अवगत करता येईल. आंतरराष्ट्रीय स्तरावर गाजलेले चित्रपट पाहण्याची संधी मिळेल,'' असे मत बेनेगल यांनी व्यक्त केले.

नांदगावकर म्हणाले, ''चित्रपटशौकिन रसिक बनले पाहिजेत. फिल्म सोसायटीची चळवळ कोल्हापूर, औरंगाबाद आणि नांदेड येथील विद्यापीठांमध्येही झाली आहे.

*** देशभरातील विद्यार्थ्यांचे जानेवारीत पुण्यात संमेलन**

माईर्स एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंट व भारत अस्मिता फाउंडेशन यांच्यातर्फे दहा ते बारा जानेवारीदरम्यान भारतीय छात्र संसद संमेलन 'एमआयटी'मध्ये आयोजित करण्यात आले आहे.

गेल्या वर्षी झालेल्या संमेलनात आठ हजार विद्यार्थी सहभागी झाले होते. यंदा १५ हजार विद्यार्थ्यांचा सहभाग अपेक्षित आहे, अशी माहिती प्रा. कराड यांनी दिली. दलाई लामा यांच्यासह राष्ट्रीय स्तरावरील नेते, उद्योजक, युवक मंत्री, खासदार नऊ सत्रांत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. विद्यार्थ्यांमधून नेतृत्व घडविणे हा या संमेलनाचा उद्देश आहे.

*** 'श्री लक्ष्मीमाता कला-संस्कृती पुरस्कार'**

''माझ्या कवितांवर प्रेम करणारी माणसे आहेत, तो पर्यंत मी मरायला तयार नाही.'' अशी भावना ज्येष्ठ कवी मंगेश पाडगावकर यांनी २८ सप्टेंबर रोजी पुणे नवरात्र महोत्सवात व्यक्त केली.

१७ व्या पुणे नवरात्रमहोत्सवात पाडगावकर यांच्यासह प्रसिद्ध कलादिग्दर्शक व चित्रपट निर्माते नितीन देसाई, लावणी नृत्यांगना सुरेखा कुडची, चित्रपट निर्माते महेश टिळेकर, अभिनेता सिद्धेश्वर झाडबुके यांना 'श्री लक्ष्मीमाता कला-संस्कृती पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले.

पाडगावकर म्हणाले, 'माणूसपण सुंदर करणाऱ्या गोष्टी मला पुण्याने दिल्या. त्यामुळे पुण्यात मिळालेला हा पुरस्कार माझ्यासाठी मोठा आहे. तुमच्यासारखी रसिक माणसे आहेत व ती माझ्या कवितेवर प्रेम करतात तोवर मी मरायला तयार नाही. माझे पाय लटपटत असले तरी कविता लटपटत नाही.' कार्यक्रमाचे प्रास्ताविक आबा बागुल यांनी, तर सूत्रसंचालन सुधीर गाडगीळ यांनी केले.

*** भारतीय भाषांमधील साहित्याचा सन्मान**

भारतात इंग्रजी पुस्तके वाचणारा वर्ग हा छोटा असला तरी प्रभावी आहे. तरीही विविध भारतीय भाषांमध्ये अस्सल, कसदार साहित्याची निर्मिती होत आहे. अभिजन वर्गातील भारतीय इंग्रजी लेखकांच्या जाणिवा आणि अनुभवविश्व पाहता त्यांच्या लेखनात भारतीय भाषांमधला कसदारपणा क्वचितच दिसून येतो. भारतातल्या विविध भाषांमधले उत्तमोत्तम साहित्य इंग्रजीत अनुवादित करण्याची चळवळ मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. यंदा क्रॉसवर्डच्या सर्वोत्तम अनुवादित पुरस्कारासाठी हिंदी, बांगला, मल्याळम आणि तमिळ भाषेतून एकूण पाच अनुवादित पुस्तके निवडण्यात आली. मल्याळममधून अनुवादित केलेल्या एन.एस. माधवन यांच्या 'लिटनिस ऑफ डच बॅटरिज' या पुस्तकाला सर्वोत्तम अनुवादाचा पुरस्कार देण्यात आला. सोशल मिडिया मार्फत वाचकांची मते मागवून निवडण्यात येणाऱ्या सर्वोत्तम लोकप्रिय पुस्तकाचा पुरस्कार अश्वीन संघी यांच्या 'चाणक्याज् चाण्ट' ला तर सर्वोत्तम बालसाहित्यासाठीचा पुरस्कार रणजित लाल यांच्या 'फेसेस इन द वॉटर'ला देण्यात आला.



**सभेत कसे बोलावे** ११वी आवृत्ती

**श्याम भुर्के**

''सभेत बोलणे साधावे लागते,
ते कसे साधावे ह्याचे मार्गदर्शन''

७०रु. पोस्टेज २०रु.

*** 'तेरावं वरीस गुगलचं'**

जगभरातील सर्वात लोकप्रिय सर्च इंजिन म्हणून मान्यता पावलेल्या गुगलचा तेरावा वर्धापनदिन साजरा करण्यात आला.

अक्षरांना पार्टी हॅट, पांढरा शुभ्र केक, त्यावर १३ मेणबत्त्या, त्याभोवती प्रेझेंट्स, फुगे असा थाट होता. स्टॅनफर्ड विद्यापीठाचे पदवीधर लॅरी पेज आणि सर्जी ब्रिन यांनी गुगलची स्थापना केली. त्यांनी आपले पहिले सर्च इंजिन १९९६ मध्ये बनवले. पण, त्याला गुगलचे सुनियोजित स्वरूप १९९८ मध्ये आले. चार सप्टेंबरला गुगल ही कंपनी स्थापन करण्यात आली. १५ सप्टेंबरला गुगल डॉट कॉम या डोमेन नावाची नोंदणी करण्यात आली. गुगल आपला स्थापनादिवस २७ सप्टेंबरला साजरा करते. गुगलचा क्रोम हा ब्राउजरही लोकप्रिय बनला आहे.

- पेज आणि बर्नी यांनी गुगोल या शब्दावरून आपल्या सर्च इंजिनला गुगल असे नाव दिले.

- गूगोल म्हणजे एकावर शंभर शून्ये

- गुगल म्हणजे तरुणाईच्या नावीन्यपूर्ण कल्पनेचा आविष्कार

- प्रख्यात अमेरिकी गणिततज्ज्ञ एडवर्ड कास्नेर यांचा नऊ वर्षांचा भाचा मिल्टन सिरोटा याने १९३८ मध्ये गूगोल हा शब्द वापरला.

- पुढे कास्नेर यांनी तो मॅथेमॅटिक्स अँड इमॅजिनेशन (१९४०) या ग्रंथात वापरून जगभरात लोकप्रिय केला.

*** कुसुमाग्रज जन्मशताब्दी**

नाशिक येथे कुसुमाग्रज यांच्या जन्मशताब्दीनिमित्त अक्षय संस्थेच्या वतीने 'रसयात्रा' या कार्यक्रमाचा १०० प्रयोग करण्यात आला.

कुसुमाग्रजांनी केलेली रंगभूमीची स्थापना, रंगकाव्यात झालेला प्रवेश, त्याकाळी गायक लोकांचा होत असलेला करार याचे सादरीकरण 'नाटकास कारण की' या प्रयोगातून करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुसुमाग्रज प्रतिष्ठानचे कार्यवाह लोकेश शेवडे यांनी केले. यावेळी 'देशदूत'चे संस्थापक श्री. देवकिसन सारडा, श्री किशोर पाठक, श्री. रामदास कामत, श्रीमती रंजना पाटील, श्री. बाबा धर्माधिकारी आदी मान्यवर उपस्थित होते.

*** 'प्रभात'च्या चित्रांना 'सप्तरंगी' साज!**

'संत तुकाराम', 'संत ज्ञानेश्वर', 'धर्मात्मा', 'रामशास्त्री' यासारख्या 'प्रभात'च्या लोकप्रिय चित्रपटांतील काही कृष्ण-धवल प्रसंग सप्तरंगात आणि 'थ्री डी' स्वरूपात आणण्याचे काम पुण्यातील सृजन ॲनिमेशन इन्स्टिट्यूटने हाती घेतले आहे. सृजन ॲनिमेशनचे संचालक संतोष रासकर म्हणाले, 'अलीकडच्या काळात जुन्या चित्रपटांना नवा रंग, लूक देण्याचा ट्रेंड बॉलीवूडमध्ये रुजला आहे. मराठीमध्ये असा प्रयत्न

अद्याप कोणी केला नाही. म्हणून अत्याधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करणाऱ्या विद्यार्थ्यांनी 'प्रभात'च्या १२ चित्रपटांतील काही प्रसंग बदलण्याचे आव्हान स्वीकारले आहे.'

पुण्यासह जळगाव, सातारा, बीड, कोल्हापूर, नगर येथील अडीचशे विद्यार्थी मेहनत घेत आहेत. यासाठी रीतसर परवानगी प्रभातच्या दामले यांच्याकडून घेण्यात आली आहे.

*** 'अति झालं हसू आलं' चे प्रकाशन**

चित्रकार नारायण शेळके लिखित 'अति झालं हसू आलं' या पुस्तकाचे प्रकाशन मंगेश तेंडुलकर यांच्या हस्ते झाले. सदानंद चांदेकर, वैशाली कौलगुड, नंदकिशोर धाडणेकर आदि यावेळी उपस्थित होते. ''व्यंगचित्रे ही अनुभवातून व विचारातून रेखाटली जात असल्याने बोलकी वाटतात. म्हणूनच व्यंगचित्राच्या माध्यमातून चित्रकार सामाजिक विषयांबरोबरच निखळ आनंद देणारे आणि मनोरंजन करणारे विषयही हाताळत असतो ''लेखक शब्दांतून विचार मांडतो; तर चित्रकार रंगसंगतीतून आणि चित्रांमधून विचार मांडतो. तसेच एखादा दृश्य विषयसुद्धा समर्पकपणे मांडत असतो.''असे मत हास्यचित्रकार शि. द. फडणीस यांनी व्यक्त केले.


तेंडुलकर म्हणाले, ''आवडीतून कला जोपासता येते. त्यासाठी महत्त्वाकांक्षा हवी. व्यंगचित्रे देखणी, सुंदर, लक्ष वेधून घेणारी व आकर्षक रंगसंगती साधणारी असतात. सध्याची तरुण पिढीही चांगली व्यंगचित्रे काढते. फक्त तिने मनोरंजनात्मक विषयच न हाताळता सामाजिक विषयही हाताळावेत.

शेळके म्हणाले, व्यंगचित्रे बोलकी असल्यामुळेच सामान्य नागरिकांच्या समस्या त्याद्वारे समर्पकपणे मांडता येतात.

*** रेखांकनाचे प्रदर्शन**

'सु-दर्शन कलादालना'त 'रेषाविष्कार' या प्रदर्शनात कृष्ण खन्ना, गीव्ह पटेल, विलास शिंदे, ज्योती बसू व तुषार जोग यांची रेखाचित्रे प्रदर्शित करण्यात आली. तीव्र भावनांच्या वेळी कागदावर ओढलेल्या अस्ताव्यस्त रेघोट्यांतूनही साकार झालेली ही रेषाचित्रे होती.

कृष्ण खन्ना यांनी दैनंदिन जीवनातील कारुण्याला चित्रविषय बनवलेले आहे.


४थी आवृत्ती

**अंतराळवार सुनीता विल्यम्स**

**अनु. चित्रा वाळिंबे**

स्पेसवॉकचा जागतिक विक्रम करणाऱ्या
अवकाश महिलेची चरित्रकथा

९०रु. पोस्टेज २५रु.

पाण्याच्या जोरकस प्रवाहातून पुढे जाऊ पाहणाऱ्या बैलगाड्या, ट्रकखाली दमून झोपलेले ड्राइव्हर-क्लीनर या रेखाटनांतील चारकोलच्या फटकाऱ्यांची लय मनोवेधक आहे.

सतत आकार बदलणाऱ्या ढगांचे आकार पकडत ते आकार विसर्जित करणे हा खेळ ग्रीव्ह पटेल यांच्या काही रेखाटनांत दिसतो. चित्र म्हटले की आकार आला; पण ढगांना स्थिर असा आकारच नसतो. त्यामुळे आकाराच्या पलीकडे जात ढग रेखाटण्याचा प्रयत्न दिसतो.

पडणाऱ्या दु:स्वप्नांचे रेखाटन तुषार जोग करतात. बॉंबस्फोटात उद्ध्वस्त झालेली मोटार आणि तिच्या शेजारी मुलांच्या खेळण्यातील ठोकळ्यांच्या काळवंडलेल्या इमारती असे चित्र पाहताना आपल्याला आसपासच्या भयावह वास्तवाची जाणीव होते. त्यातील उपहास जाणवतो. त्यामागे दडलेले राजकीय वास्तवही पुढे येते.

विलास शिंदे यांनी इलेक्ट्रॉनच्या मार्गाचे किंवा ग्रहगोलांच्या भ्रमणकक्षाचे वाटावे असे निसर्गचित्रण केले आहे. तर ज्योती बसू यांनी चित्रविचित्र आकृत्यांनी चित्रचौकट जिवंत केली आहे.

*** 'एक होता राजा'**

मराठी चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध निर्माते-दिग्दर्शक व अभिनेते राजा परांजपे याच्या गाजलेल्या कृष्णधवल चित्रपटांचे डिजिटल तंत्रज्ञानाद्वारे जतन केले जाणार आहे. १९३० ते १९६० या कालावधीतील 'जगाच्या पाठीवर', 'पेडगावचे शहाणे', 'आंधळा मागतो एक डोळा', 'सुवासिनी' अशा ८० चित्रपटांचा त्यामध्ये समावेश आहे.

राजा परांजपे प्रतिष्ठान हा उपक्रम राबवीत असून त्याच्या निधी संकलनासाठी ११ ऑक्टोबरला 'एक होता राजा: एक सुमधुर कालखंड' हा कार्यक्रम करण्यात आला. या कार्यक्रमाला दिग्दर्शक राजदत्त, संजय सूरकर, निर्मात्या-अभिनेत्री स्मिता तळवलकर उपस्थित होत्या.

*** जीवनमित्र प्रतिष्ठान**

''अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा मुंबई भेटीत भारतीय उद्योजकांना अमेरिकेत गुंतवणूक करण्याचे आवाहन करतात, त्या वेळी भारताचे महत्त्व अधोरेखित होते. आज संपूर्ण जगावर मंदीचे सावट असताना परदेशातील भारतीय मात्र ताठ मानेने जगत आहेत, याचे कारण आपले संस्कार आणि संस्कृती श्रेष्ठ आहे, हेच होय असे उद्गार सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी काढले.

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त जीवनमित्र प्रतिष्ठान या संस्थेने सामाजिक जाणीव सभा व शिबिराचे आयोजन केले होते. ज्येष्ठ समाजसेविका सिंधुताई सपकाळ, डॉ. रसिक सेठिया, उद्योजक विनोद मित्तल, राधेश्याम अगरवाल,

या वेळी उपस्थित होते.

निकम म्हणाले, ''भारतात भिन्न जाती-धर्माचे लोक गुण्यागोविंदाने राहतात हे येथील संस्कृतीचे वैशिष्ट्य आहे. दहशतवादाचा आधार घेऊन काही परकीय शक्ती हे बिघडविण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्याचा मुकाबला संपूर्ण समाजाने एकत्रित येऊन केला पाहिजे. ज्येष्ठांनी तरुण पिढीला योग्य मार्गदर्शन करावे.''

कार्यक्रमाच्या पूर्वार्धात 'जीवनाच्या वळणावर' ही ज्येष्ठ नागरिकांच्या जीवनावर आधारित नाटिका सादर करण्यात आली.

*** सार्वजनिक ग्रंथालयाचे डिजिटायझेशन**

सरकारच्या मदतीने सुरू करण्यात आलेल्या सार्वजनिक ग्रंथालयांचे आता डिजिटायझेशन करण्यात येणार असून, विश्रामबागवाड्यातील विभागीय ग्रंथालयापासून पथदर्शी प्रकल्प सुरू होत आहे.

राज्याचे ग्रंथालय संचालक डी. एस. चव्हाण म्हणाले, रौप्यमहोत्सवी वर्षाचा टप्पा ओलांडलेली एक हजारांहून अधिक ग्रंथालये महाराष्ट्रात आहेत. त्यापैकी 'अ' वर्गात ३१७, 'ब' वर्गात ९९३, 'क' वर्गात ३ हजार ६५६ आणि 'ड' वर्गात पाच हजार ७८८ ग्रंथालये आहेत. शासकीय स्तरावरील सुमारे ११ हजार ग्रंथालये राज्यात कार्यरत आहेत. इतर राज्यांच्या तुलनेने महाराष्ट्रात २० टक्के अधिक ग्रंथालये आहेत. वाचकांची अभिरुची लक्षात घेऊन, त्या दृष्टीने कालानुरूप ग्रंथालय चळवळ उभी करण्यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत. त्याअंतर्गत डिजिटायझेशनचा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे.

१९८९-९० मध्ये ग्रंथालयांची एकूण संख्या ४४८१ होती. दहा वर्षांनंतर ६४९० झाली. २००४-०५ मध्ये साडेसात हजार आणि आजमितीस ११ हजारांचा टप्पा गाठला आहे. 'गाव तिथे ग्रंथालय' ही योजना प्रभावीरीत्या कार्यान्वित झाल्याने ही संख्या वाढली आहे. शताब्दी पार केलेली ८३ ग्रंथालये राज्यात असून, त्यांच्या विकास-संवर्धनासाठी योजना आखलेल्या आहेत, अशी माहिती चव्हाण यांनी दिली.

*** चेन्नईच्या सामाजिक कार्यकर्त्या वैष्णवी जयकुमार**

छिन्न मनोवस्थेत रस्त्याच्या कडेला बसलेले... कळकट-मळकट कपडे घातलेले... डोक्यावरील केसांचे जंजाळ झालेले... काही लोक कुठल्याही शहरात, जागोजागी दिसतात. आपण सगळेच त्यांना 'वेडे' समजून पुढे जातो.... पण, चेन्नईतील वैष्णवी जयकुमार यांना मात्र अशाच एका 'वेड्या'ने मनापासून हादरवले आणि मनात साठलेली करुणा, अनुकंपा, एका संस्थेत परावर्तित झाली. रस्त्यातील या लोकांना आधारवड बनली 'बॅनियन..' अनेक लोकांचे आयुष्य पुन्हा या संस्थेने उभे केले.

जागतिक स्क्रिझोफ्रेनिया दिनानिमित्त स्क्रिझोफ्रेनिया अवेअरनेस असोसिएशन

संस्थेने आयोजिलेल्या कार्यक्रमात लेखक अनिल अवचट यांनी वैष्णवी जयकुमार यांची मुलाखत घेतली. संगणकतज्ज्ञ अच्युत गोडबोले, 'सा' संस्थेचे अध्यक्ष अमृत बक्षी, सचिव अनिल वर्तक आदी या वेळी उपस्थित होते.

जयकुमार म्हणाल्या, ''मीही आयुष्यात खूप पैसे कमविण्याचे स्वप्न पाहत होते; पण १८ वर्षांपूर्वी मानसिक आजाराने त्रस्त महिला रुग्ण माझ्या पाहण्यात आली. तिच्या अवस्थेने आम्ही हादरून गेलो. अशा लोकांसाठी काम करणाऱ्या एका संस्थेत तिला घेऊन गेलो. पण, तिथला अनुभव मन विषण्ण करणारा होता. आपणच या रुग्णांसाठी काहीतरी केले पाहिजे, अशी तीव्र जाणीव झाली. त्यातून संस्था उभी राहिली.''

त्या म्हणाल्या, ''चेन्नईबरोबरच देशातील इतर शहरांमधून संस्थेत रुग्ण येत असतात. अनेक रुग्ण अत्यंत करुण अवस्थेत असतात. त्यामुळे त्यांना अंघोळ घालून स्वच्छ करणे, हे मोठे आव्हान असते. त्यांच्यावर योग्य उपचार करून घरी पाठविण्याचा प्रयत्न करतो. या कामासाठी आम्ही शासनाकडे कोणतीही मदत मागितली नव्हती; पण आमचे काम पाहिल्यावर सरकारने स्वत:हून मदत केली.''

गोडबोले म्हणाले. ''पैशाच्या मागे धावताना सुख हरपत आहे. स्पर्धेतून ताणतणाव वाढत आहे. त्यातून मनोविकारांचे प्रमाण वाढत आहे. आरोग्य, सामाजिक कामासाठी सरकारने मदत वाढविण्याची गरज आहे.''

*** विष्णुदास भावे यांच्या बाहुलीचा 'पुनर्जन्म'**

आद्य नाटककार विष्णुदास भावे हे कळसुत्री बाहुल्या तयार करून त्यांचे खेळही करत असत. त्यांची एक बाहुली प्रख्यात रंगभूषाकार प्रभाकर भावे यांच्याकडे डागडुजीसाठी आली आणि त्यांनी या बाहुलीला पूर्वीचे रूप दिले.

ही नवी बाहुली सांगलीच्या नाट्यगृहात ठेवली जाणार आहे.

विष्णुदास भावे त्या काळी सांगली संस्थानच्या राजाकडे नोकरी करीत होते. मुखवटे तयार करणे, लाकडी कळसुत्री बाहुल्या करून त्यांचे खेळ करणे हा त्यांचा छंद होता. त्यांच्या घराच्या माळ्यावर एका ट्रंकेत बाहुल्यांचे काही अवशेष सापडले होते. ते भालजी पेंढारकर, प्रभाकर भावे यांच्याकडे देण्यात आले.

प्रभाकर भावे म्हणाले, 'बावीस वर्षांपूर्वी काहीच माहिती नसताना ही बाहुली मी उभी केली होती. ही बाहुली मूळ देवीची असावी. तिला चार हात आहेत. तिची डागडुजी करताना कागदाचा लगदा, लाकूड आणि दीर्घकाळ टिकण्यासाठी ऑईलपेंट वापरला असून नवे कपडे शिवले आहेत.'

*** दलित साहित्य परिषदेचा वर्धापनदिन**

''दलितांच्या चळवळी एकजातीय झाल्यामुळे परावलंबित्व वाढत गेले. राजकीय अपयशाने खचून गेल्यामुळे समाज संभ्रमावस्थेत आहे. ही कोंडी फोडण्यासाठी

साहित्यिकांनी मार्गदर्शन करावे,'' असे आवाहन ॲड. जयदेव गायकवाड यांनी केले. दलित साहित्य परिषदेच्या वर्धापनदिनानिमित्त समाजाला संभ्रमावस्थेतून बाहेर काढण्यासाठी साहित्यिकांची भूमिका या विषयावर चर्चासत्र झाले. लेखक डॉ. शरणकुमार लिंबाळे आणि समीक्षक डॉ. श्रीपाल सबनीस यांनी चर्चासत्रात भाग घेतला. परिषदेचे अध्यक्ष बाळ आल्हाट आणि धर्मराज निमसरकर यावेळी उपस्थित होते.

गायकवाड म्हणाले, ''सध्याच्या संभ्रमावस्थेबाबत साहित्यिक बोलत नाहीत हे वास्तव आहे. निग्रो चळवळीच्या साहित्याचा परिपाक म्हणून सहानुभूती मिळवून कृष्णवर्णीय बराक ओबामा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष झाले. साहित्य काय करू शकते, याचे हे उत्तम उदाहरण आहे. त्या दृष्टीने आपल्याकडील दलित समाज अवगुंठित झाला आहे. त्याला दिशा देण्याचे काम साहित्यिकांना करावे लागेल.''


लिंबाळे म्हणाले, ''दलित समाज संभ्रमावस्थेत नाही. लेखक, कार्यकर्ते, नेते संभ्रमात आहेत. समाजाची स्वप्ने आणि अपेक्षा समजून घेण्यात नेतृत्व खुजे ठरले आहे. दलित चळवळ सुरवातीला काँग्रेसच्या दावणीला बांधली गेली आणि आता शिवशक्ती-भीमशक्तीची चर्चा सुरू आहे; पण हा धुरळा आहे. डॉ. बाबासाहेबांच्या तत्त्वज्ञानाचा कडवेपणाने अर्थ लावून आम्ही आत्मकेंद्री झालो आहोत. यातून बाहेर पडण्यासाठी आंबेडकरी जाणिवा प्रखर केल्या पाहिजेत.''

सबनीस म्हणाले, ''व्यक्तिगत महत्त्वाकांक्षा असल्यामुळे दलित नेते एकत्र येऊ शकले नाहीत. त्यामुळेच दलित समाजाचा विकास होऊ शकला नाही हे स्पष्ट आहे. या चक्रातून बाहेर पडण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत.''

*** तरुणांसाठी साहित्य-नाट्यसंमेलन**

युवा वर्गात मराठी भाषेची रुची निर्माण व्हावी म्हणून महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे २४ ते २६ डिसेंबर दरम्यान युवा साहित्य-नाट्य संमेलन घेण्यात येणार आहे. युवापिढीला आपल्या कला संस्कृतीची नव्याने ओळख करून देण्यासाठी हा उपक्रम आहे.

कोथरूडमधील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात होणाऱ्या संमेलनात राज्यातील


**डायरी ऑफ ॲन फ्रँक** ७वी आवृत्ती

**अनु. मंगला निगुडकर**

नात्झींच्या अमानुष छळाचं दर्शन घडवणारी एका उमलत्या कळीची अनुभव गाथा

२००रु. पोस्टेज २०रु.

विद्यापीठांशी संलग्न कॉलेजमधील प्रत्येकी दोन विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, अशी कल्पना आहे. संमेलनाच्या निमित्ताने ई-कविता आणि कथालेखन स्पर्धा, कार्यशाळा वगैरे उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. नाट्यदिग्दर्शक वामन केंद्रे, अतुल पेठे, योगेश सोमण मार्गदर्शन करणार आहेत. साहित्य, नाट्यक्षेत्रात कार्यरत मंडळींना एकत्र आणण्यासाठी गेट टूगेदरचे आयोजन करण्यात येणार आहे.

*** 'मृत्युंजय प्रतिष्ठान'तर्फे प्रवीण दवणे, हरिभाऊ लिमये यांचा गौरव**

साहित्याचा कोणताही प्रवाह आकाशातून पडत नाही. साहित्य हे समाजाचे प्रतिबिंब असते. एक काळ असा होता की, साहित्य समाजाला जन्म देत होते. आता समाज साहित्याला जन्म देत आहे,'' असे डॉ. सुनीलकुमार लवटे म्हणाले.

'मृत्युंजय प्रतिष्ठान'तर्फे शिवाजी सावंत यांच्या नवव्या स्मृतिदिनानिमित्त शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या हस्ते प्रसिद्ध साहित्यिक प्रा. प्रवीण दवणे यांना साहित्य पुरस्कार आणि मसाजच्या माध्यमातून रुग्णसेवा करणाऱ्या हरिभाऊ लिमये यांना सामाजिक कार्याबद्दलचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

डॉ. लवटे म्हणाले, ''हिंदी, इंग्रजी प्रमाणे मराठीमध्ये आता लेखन होत नाही. प्रकाशन संस्थांच्या सूचीतून ललित साहित्य हरवत आहे. अनुवादित साहित्याची मागणी वाढत आहे. पूर्वी लेखक लिहायचे, ते वाचले जायचे. आता आधुनिक काळात वाचले जाते ते लिहायचे, असा प्रवाह निर्माण झाला आहे. अर्थात याला काही लेखक अपवाद आहेत. श्याम मनोहरांसारखे लेखक नवीन प्रयोग करीत आहेत. तसेच ग्रामीण भाग राजकीय पक्षांमध्ये विभागला जात आहे. त्यातून एक संकुचित जग निर्माण होत आहे. त्यामुळे खंडखंड भारत होण्याचा धोका आहे.

*** 'अनुवाद : एक उज्ज्वल करीअर' पुस्तकाचे प्रकाशन**

कॉंटिनेंटल प्रकाशन आणि बिट्स या अनुवाद क्षेत्रातील कंपनीतर्फे संदीप नूलकर यांच्या 'अनुवाद : एक उज्ज्वल करीअर' या अनुवादित पुस्तकाचे प्रकाशन केदार इंदुरकर च्या हस्ते झाले. माजी महापौर डॉ. सतीश देसाई, कम्प्युटर तज्ज्ञ डॉ. दीपक शिकारपूर, ज्येष्ठ साहित्यिक अनंत मनोहर, देवयानी अभ्यंकर आदी उपस्थित होते. प्रा. अनंत मनोहर यांनी नूलकर यांच्या 'ट्रान्स्लेशन ॲज अ करिअर' या पुस्तकाचा अनुवाद केला आहे.

*** 'जेम्स बॉंड'साठी 'नो एंट्री**

'माय नेम इज बॉंड... जेम्स बॉंड' असं म्हणत शत्रूंचा खातमा करण्यासाठी प्रसिद्ध असलेल्या जेम्स बॉंडच्या आगामी सिनेमातील काही सीन्सचे शूटिंग गोव्याच्या रेल्वे परिसरात केले जाणार होते. मात्र त्याची लोकप्रियता लक्षात घेऊन शूटिंगसाठी होणारी गर्दी, रेल्वे प्रशासन तसेच प्रवाशांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन शूटिंगला परवानगी नाकारण्यात आली. भारतीय रेल्वेची महती जगभरात पसरलेली आहे.

त्यामुळे 'बाँड २३' या जेम्स बाँडच्या बहुचर्चित ब्रिटिश सिनेमांतले काही ॲक्शन सीन्स करण्यासाठी भारतीय रेल्वे परिसराची निवड केली होती. शूटिंग दरम्यान होऊ शकणाऱ्या गर्दीला आवरण्यासाठी सुरक्षा अधिकाऱ्यांना आणि रेल्वे कर्मचाऱ्यांनाही जादा तासांची ड्युटी करावी लागणार होती. मंत्रालयाने शूटिंगला नकार दिल्याने निर्मात्याने ॲक्शन सीन्सच्या शूटिंगसाठी दक्षिण आफ्रिकेची निवड केली.


*** आयआयटी चा दर्जा घसरत आहे.**

न्यूयॉर्क मध्ये माजी 'आयआयटीयन्स'च्या मेळाव्यात नारायण मूर्ती यांनी 'आयआयटी'मधील ८० टक्के इंजिनिअर दुय्यम दर्जाचे असल्याची टीका केली होती. 'कोचिंग क्लासेस'मध्ये घोकंपट्टी करुन प्रवेश परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांमुळे आयआयटीचा दर्जा घसरत आहे, त्यामुळे ही प्रवेश पद्धत बदलण्यात यावी, असे मूर्ती यांनी म्हटले होते.'बॉडीशॉपिंग' करणारी कंपनी चालविणाऱ्यांनी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीसारख्या (आयआयटी) प्रतिष्ठित संस्थांच्या दर्जाबाबत बोलू नये, अशा शब्दांत प्रसिद्ध लेखक चेतन भगत यांनी आयआयटीवरील टीकेचा समाचार घेतला.

कर्मचाऱ्यांना परदेशात नोकरीसाठी परदेशात पाठविताना, संबंधित संस्थेकडून आणि त्या कर्मचाऱ्यांकडून टक्केवारीच्या स्वरूपात पैसे स्वीकारणारी 'बॉडीशॉपिंग'करणारी कंपनी चालविणाऱ्या व्यक्तीने आयआयटी सारख्या संस्थेच्या दर्जाबाबत केलेल्या टीकेत थोडे सत्य असले तरी तो दोष व्यवस्थेचा आहे, विद्यार्थ्यांचा नाही, असे मत चेतनने व्यक्त केले.

*** स्टीव्हच्या मृत्यूनंतर फेसबुक व ट्विटरवर 'डेडलॉक'**

'ॲपलचा सहसंस्थापक स्टीव्ह जॉब्स यांचे निधन', अशी बातमी ट्विट झाली आणि ट्विटर व फेसबुक या दोन्ही सोशल नेटवर्किंग साइट्सवर प्रतिक्रियांचा अक्षरश: पाऊस पडला. या प्रतिक्रियांचा ओघ इतका प्रचंड होता की, दोन्ही साइट्स काही काळासाठी ब्लॉक झाल्या. विशेष म्हणजे फेसबुकचा संस्थापक मार्क झुकेरबर्ग याने फेसबुकवर आपले मनोगत व्यक्त केल्यानंतर दोन मिनिटांत त्याच्या त्या

# गर्भसंस्कार

८वी आवृत्ती

**डॉ. गौरी बोरकर**

गर्भवती स्त्रीच्या आहार, आचरण, विचार यांच्या योग्य समन्वयाने बाळाच्या गुणात्मक वाढीवर उत्तम परिणाम होतो हे सांगणारे पुस्तक

१५०रु. पोस्टेज २५रु.

कमेंटवर तब्बल दहा हजार 'लाइक्स' आले. तंत्रज्ञानातील विविध कल्पना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी झटलेल्या स्टीव्हच्या निधनाची बातमीही त्याने तयार केलेल्या संगणकावरच पहिल्यांदा झळकली. ट्विटरवर ही बातमी आल्यानंतर स्टीव्ह जॉब्सच्या असंख्य चाहत्यांनी एकाच वेळी ट्विट करण्यास सुरवात केली त्यामुळे ट्विटर ब्लॉक झाले. फेसबुकचीही तीच गत होती. जगातील पहिला खाजगी वापरासाठीचा संगणक, आयपॅड, आयपॉड, आयफोन अशा अनेक उपयुक्त गोष्टींचा प्रवर्तक, अशी स्टीव्ह जॉब्सची ओळख आहे. त्याच्या या सर्व संशोधनांमुळे जग जवळ आल्याची प्रतिक्रिया अनेकांनी व्यक्त केली.

*** डॉ. आंबेडकरांच्या खंडांचे पुनर्मुद्रण**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या साहित्याचा एकही नवीन खंड गेल्या सात वर्षात प्रकाशित झालेला नाही. डॉ. आंबेडकरांच्या जुन्या खंडांचेच पुनर्मुद्रण केले जात आहे. विदर्भ विकास कार्यक्रमांतर्गत तत्कालीन मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी २३ डिसेंबर २००९ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे साहित्य प्रकाशित करण्यासाठी दोन कोटी रुपयांची तरतूद आणि डॉ. आंबेडकर फाऊंडेशनच्या स्थापनेची घोषणा केली. माहिती अधिकार कायद्याखाली मिळालेल्या माहितीनुसार २०१०-११ या वर्षात शासनपत्राप्रमाणे एक कोटी रुपयांचा निधी सामाजिक न्याय विभागाने उच्च व तंत्रशिक्षण विभागाला उपलब्ध करून दिला. या निधीचा उपयोग डॉ. बाबासाहेब आंबेडकर खंड क्रमांक तीन (इंग्रजी), खंड क्रमांक दोन (इंग्रजी), खंड क्रमांक दोन (मराठी अनुवाद) यांच्या पुनर्मुद्रणासाठी केला गेला.

यापूर्वी २००७-०८ मध्ये केंद्रीय योजना आयोगाने ४ कोटी ७० लाख रुपयांची रक्कम दिली होती.

२००९-१० या आर्थिक वर्षात उपलब्ध झालेल्या ३ कोटी रकमेपैकी अडीच कोटी रुपये पुनर्मुद्रणावर खर्च करण्यात येतील. ऑगस्ट २००४ पासून बाबासाहेबांच्या साहित्यावरील एकही नवीन खंड प्रकाशित झालेला नाही. केवळ पुनर्मुद्रण, मराठी व इंग्रजी अनुवाद आणि कार्यालयीन खर्च यावरच कोट्यवधींचा निधी वापरला जात आहे. या संदर्भात २२ ऑक्टोबर २००८ पासून एकही बैठक झालेली नाही. डॉ. आंबेडकर प्रकाशन समितीवर रामदास आठवले, ॲड प्रकाश आंबेडकर, प्रा. जोगेंद्र कवाडे, टी.एम. कांबळे, डॉ नितिन राऊत, लक्ष्मण माने, डॉ. रावसाहेब कसबे, प्रा. जनार्दन चांदुरकर, डॉ. एम.एल. कासारे, एन.जी. कांबळे इत्यादी मंडळी आहेत. यापैकी काहीजण एकाही बैठकीला उपस्थित राहिले नसल्याचे उघड झाले आहे.

*** बालभारतीतल्या १८१ कवितांचे ई-प्रकाशन**

सुरेश शिरोडकर आणि ई-साहित्याचे सुनील सामंत यांनी अक्षरप्रेमींच्या भेटीला 'बालभारती-आठवणीतल्या कविता' हे ई-पुस्तक आणले आहे.

फुलपाखरू, कणा, फटका, पैठणी, खोपा, गणपत वाणी, खंड्या अशा कविता या ई-बुकवर आहेत. बालकवींची ‘श्रावणमासी’ कविता काव्यांजली या कम्युनिटीवर शिरोडकरांनी शेअर केली. ही कविता वाचून अनेकांनी आपल्या कविता काव्यांजलीवर शेअर केल्या तेव्हा शिरोडकरांनी स्वतंत्र ब्लॉग सुरू केला. ई साहित्य प्रतिष्ठानचे सुनील सामंत यांनी इ-बुक साकार केले.

१९६० पासून बालभारती आणि कुमार भारतीमध्ये प्रसिद्ध झालेल्या साडेचारशे कवितांपैकी १८१ कविता पहिल्या भागामध्ये आल्या आहेत. अधिक माहितीसाठी www.esahiyta.com, http:/sureshshirodkar.blogspot.com येथे संपर्क करावा.


*** शासकीय कर्मचारी साहित्य संमेलन**

भाबड्या व मनोरंजक गोष्टींना बळी पडू लागल्याने मराठी साहित्याचा विकास खुंटला आहे. वास्तवाचे भान हरपल्यामुळे साहित्यात विचारांची कोंडी निर्माण झाली आहे, असे मत कोल्हापूरचे जिल्हाधिकारी लक्ष्मीकांत देशमुख यांनी व्यक्त केले.

प्रेरणा आर्ट फाउंडेशनच्या वतीने शासकीय कर्मचारी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव धनंजय धवड यांच्या हस्ते संमेलनाचे उद्‌घाटन करण्यात आले. कार्यक्रमास निवृत्त पोलिस महानिरीक्षक सुरेश खोपडे, व्यंगचित्रकार मंगेश तेंडुलकर, नगररचना विभागाचे संचालक श्रीरंग लांडगे, मुख्य अभियंता ना.ह. जळकोटे, कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक दीपक कंदी, कोकण विभागाचे आयुक्त एस. एस. संधू, फाउंडेशनचे अध्यक्ष अनिल कांबळे आदि उपस्थित होते.

ऐतिहासिक, धार्मिक अशी ढोबळ मांडणी करणारे लिखाण सवंग लोकप्रियतेसाठी केलेले असल्याने यातून प्रगल्भ वाचक निर्माण होत नाहीत, अशी खंत देशमुख यांनी व्यक्त केली.

खोपडे म्हणाले, पुस्तकातील कविता व जीवनातील वास्तव यामध्ये तफावत वाढते आहे. शिक्षणव्यवस्था विद्यार्थ्यांना कारकून बनवत असल्याने सामान्यांच्या मनात संभ्रमावस्था निर्माण झाली आहे.




गोष्टी माणसांच्या

१४वी आवृत्ती

अनु. लीना सोहोनी

सुधा मूर्ती यांना भेटलेली माणसे
आणि त्यांचे अस्सल अनुभव यांचे मार्मिक चित्रण

१४०रु. पोस्टेज २५रु.

*** 'सावळ्या घना' सीडीचे प्रकाशन**

''कलाकार म्हणून स्वत:चे गाणे गायला मिळते तेव्हा स्वानुभवातून खूप काही शिकता येते. तो एक अवर्णनीय अनुभव असतो. त्यामुळे कलाकाराने नवीन गाणी आवर्जून गायली पाहिजेत आणि प्रेक्षकांनी ती ऐकण्याची तयारी दाखविली पाहिजे,'' असे मत गायिका देवकी पंडित यांनी व्यक्त केले.

गायिका सुवर्णा माटेगावकर यांच्या 'सावळ्या घना' या सीडीचे प्रकाशन देवकी पंडित यांच्या हस्ते झाले. या सीडीतील गीतांना, स्वरबद्ध करणारे ज्येष्ठ संगीतकार अशोक पत्की, आनंद मोडक, नरेंद्र भिडे, पराग माटेगावकर, फाउंटन म्युझिकचे कांतिभाई ओसवाल, गीतकार वैभव जोशी या प्रसंगी उपस्थित होते.

पंडित म्हणाल्या, ''स्वत:च्या गाण्यातून मिळालेला अनुभव हा मौल्यवान असतो. हा अनुभवच कलाकाराला प्रगतिपथावर नेतो. कलाकारांनी स्वत:ची नवीन गाणी आवर्जून गायली पाहिजेत आणि प्रेक्षकांनीही ती नवी गाणी ऐकण्याची तयारी ठेवली पाहिजे.''

पत्की म्हणाले, ''प्रत्येक गाण्याचे स्वत:चे असे भविष्य असते. 'सावळ्या घना' यातील गाण्यांमध्ये सुवर्णा माटेगावकर यांनी जीव ओतलेला आहे. त्यामुळे त्या कामाचे चीज झाल्याची भावना आहे. शंभर वर्षांत एखादे छान गाणे जन्माला येते असे म्हणतात  सावळ्या घनाचे शीर्षकगीत त्यातलेच एक आहे.''

सुवर्णा माटेगावकर यांनी 'सावळ्या घना' अल्बममधील गीते सादर केली आणि अमृता गोगटे व सहकाऱ्यांनी त्यातील काही गीतांवर नृत्य सादर केले.

*** 'मटा' आता मोबाइलवर**

'महाराष्ट्र टाइम्स डॉट कॉम' ही न्यूजसाइट इंटरनेट वाचकांमध्ये लोकप्रिय आहे. लोकल महाराष्ट्रापासून ग्लोबल घडामोडींपर्यंतचे २४ तास अपडेट देणारी ही न्यूजसाइट मोबाइलवरही mtmobile.in या साइटवर उपलब्ध आहे.

इंटरनेट सुविधा असणाऱ्या कोणत्याही मोबाइलवरून 'मटा' वाचता येईल. ही मोबाइल साइट उघडण्यासाठी विशिष्ट फॉन्टची आवश्यकता नाही. कोणत्याही मोबाइल फोनमधून, कोणत्याही ब्राउझरमधून ही साइट वाचता येईल.

*** वस्त्यांमधील मुले अनुभवणार वाचनाचा फंडा**

शहरातील सधन मुलांबरोबरच वाड्या-वस्त्यांमधील मुला-मुलींना वाचनाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आयडेंटिटी फाउंडेशन या स्वयंसेवी संस्थेने पुढाकार घेतला आहे.

फाउंडेशनतर्फे २००३ पासून नॉन फॉर्मल एज्युकेशनल सपोर्ट ग्रुपच्या माध्यमातून वस्त्यांमधील शाळेत जाणाऱ्या मुलांसाठी मार्गदर्शन वर्ग घेतले जातात. मुलांचा शाळेचा अभ्यास घेण्यासाठी हा ग्रुप मदत करतो. मुलांमध्ये वाचनाची गोडी निर्माण

व्हावी, यासाठी शहरातील वस्त्यांमध्ये नोव्हेंबरपासून वाचनवर्ग सुरू करण्यात येणार आहेत, अशी माहिती संचालिका निर्मला दाते यांनी दिली. 'मोबाईल लर्निंग सेंटरच्या माध्यमातून फाउंडेशन फिरते शैक्षणिक केंद्र चालविते. मुलांना रोज शाळेत पोहोचवणे आणि सुखरूप वस्तीवर आणण्याचे कामही केले जाते. व्हॅनमधील लॅपटॉपवर माहितीपूर्ण फिल्म दाखवल्या जातात.

*** साहित्य महासंघाचे उद्‌घाटन**

'महाराष्ट्रात साहित्याची परंपरा असल्याने साहित्यात समाजाचे स्पंदन दिसून येत असले, तरी इतर राज्यांत दिसणारे साहित्यप्रेम दिसून येत नाही. त्यामुळे विविध साहित्य संस्थांनी एकत्र येऊन समाज साहित्याभिमुख होण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत,' असे मत ज्येष्ठ साहित्यिक डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

आडकर फाउंडेशन, साहित्यप्रेमी भगिनी मंडळ, कथाभारती इ. बावीस साहित्यिक संस्थांचा सहभाग असलेल्या महासंघाचे उद्‌घाटन कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रा. द. मा. मिरासदार, प्रा. रतनलाल सोनग्रा, द्वारकानाथ लेले, अ‍ॅड. प्रमोद आडकर आदी उपस्थित होते.

'कलाकारांचे मोहळ असलेल्या पुण्यात अशा महासंघाची स्थापना होणे ही अभिनंदनीय बाब आहे. आज अनेकांना मराठी भाषा, साहित्य यांची नीट माहिती नाही. त्यामुळे या साहित्य संस्थांनी विविध उपक्रम राबवले पाहिजेत', असे प्रा. मिरासदार यांनी सांगितले.

*** गेमचे पॉइंट वाढविण्यासाठी 'मध्यस्थ'**

सोशल नेटवर्किंग साइट्‌सवरील वेगवेगळ्या गेम्समध्ये जास्तीत जास्त पॉइंट्‌स जमविण्यासाठी मदत करणारे 'मध्यस्थ' सध्या तयार झाले असून, या मध्यस्थांना पैसे देणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ होत आहे.

इंटरनेटचे व्यसन लागलेल्या व्यक्तींना आता थेट व्यसनमुक्ती केंद्रात जाऊन उपचार घ्यावे लागत आहेत. व्यसनाचा हा नवा 'खेळ' 'लॉग इन' झाला आहे. इंटरनेट अँड मोबाईल असोसिएशन ऑफ इंडियाकडे (आयएएमएआय) अशी प्रकरणे आल्याचे 'आयएएमएआय' चे सल्लागार रक्षित टंडन यांनी सांगितले.

शालेय विद्यार्थ्यांना इंटरनेटपासून दूर ठेवणे शक्य नसल्याने किमान त्याचा सुरक्षित वापर करण्याबाबत त्यांच्यामध्ये जागरूकता निर्माण व्हावी, या हेतूने शाळांत संवादसत्रे आयोजित केली जात आहेत.

शालेय विद्यार्थ्यांमध्ये फेसबुक आणि ऑर्कुट या सोशल नेटवर्किंग साइट्‌सचे इतके वेड आहे, की मुले घरी आल्यावर दफ्तर फेकून पहिल्यांदा आपले फेसबुकवरील स्टेट्‌स तपासतात. अनेक मुले या साइट्‌सवरील गेम्सच्या आहारी गेली आहेत.

'सोशल साइट्‌सवरील हे गेम्स खेळणारी मुले या साइट्‌सवर आधीपासून

असलेल्या काही अपप्रवृत्तींकडून हेरली जातात. त्यांना जास्तीत जास्त पॉइंट्स मिळवून देण्याचे आश्वासन दिले जाते. त्या बदल्यात हे 'मध्यस्थ' मुलांकडून चक्क पैसे उकळतात. जितके जास्त पॉइंट्स तेवढे जास्त पैसे असे सरळ गणित आहे, अनेक विद्यार्थी याला फशी पडतात.'

'इयत्ता पाचवी ते आठवीच्या बहुतेक विद्यार्थ्यांकडे मोबाईल फोन असून वयाच्या नवव्या वर्षापासून विद्यार्थी इंटरनेट वापरायला सुरुवात करत आहेत. देशपातळीवर बोलायचे, तर मोबाईलवर इंटरनेट वापरणाऱ्यांपैकी ६५ टक्के विद्यार्थी आहेत.'

*** पाठ्यपुस्तके विसरा, ई-बुक्स वापरा!**

'पाठ्यपुस्तके विसरा आणि ई-बुक्स वापरा' हा मंत्र सध्या कुवेतमध्ये आळवला जात आहे. पाठ्यपुस्तके वाचण्याबाबत विद्यार्थ्यांमध्ये असलेली उदासीनता लक्षात घेऊन त्यांच्यात वाचनाची रुची आणि उत्सुकता वाढविण्यासाठी कुवेतच्या शिक्षण विभागाने पाठ्यपुस्तकांऐवजी ई-बुक्सचा पर्याय उपलब्ध करून दिला आहे.

ई-बुक्ससाठी असलेले विशेष सॉफ्टवेअर विकसित करण्यात आले असून पाठ्यपुस्तकांऐवजी इ-बुक्सचा पर्याय देणाऱ्या उपक्रमासाठी ३९ लाख डॉलर्सची तरतूद केली आहे. आत्तापर्यंत ९०८ पाठ्यपुस्तकांचे ई-बुक्समध्ये रूपांतर करण्यात आले असून ७१ हजार फ्लॅश मेमरी युनिट्स वितरीत केली जाणार आहेत.

*** सेतूमाधवराव समग्र खंडासाठी दहा लाख अनुदान**

आंध्र प्रदेशातील मराठी साहित्य परिषदेने पगडी यांच्या जन्मशताब्दीनिमित्त गेल्या वर्षी 'समग्र सेतुमाधवराव पगडी खंडां'ची निर्मिती केली. त्यांच्या विस्तृत कार्याची मराठी जनांना माहिती व्हावी, या उद्देशाने प्रकल्पासाठी सुमारे ३६ लाख रुपये खर्च केला. यासाठी पहिल्या टप्प्यात दहा लाख रुपये तत्कालीन मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी दिले, तसेच खंडाच्या प्रकाशन समारंभात आणखी दहा लाखांचे अनुदान देण्याची घोषणा केली. मात्र ते अद्याप न मिळाल्यामुळे संस्थेवर आर्थिक ताण वाढत आहे. राज्य शासनाने शंभर समग्र खंड खरेदी करून ज्ञानोपासना करणाऱ्यांना त्याचा लाभ द्यावा, अशी मागणी साहित्य परिषदेने केली आहे.

आयुष्यातील ८४ पैकी ७० वर्षे मराठी भाषा व इतिहासावर संशोधन आणि लेखन, मराठी आणि इंग्रजीमध्ये एकूण ६६ पुस्तके, उर्दू आणि पर्शियन भाषेचाही गाढा अभ्यास, १९९२ मध्ये 'पद्मविभूषण' हे त्यांचे कार्य संस्मरणीय आहे.

त्यांची गाजलेली पुस्तके

'शिवछत्रपती : एक अभ्यास', 'मराठे व औरंगजेब', 'पानिपतचा संग्राम', '१८५७ चे आणखी काही पैलू', 'मोगल-मराठा संघर्ष'

*** मराठी विश्वकोश वेबसाइटवर**

वैश्विक माहिती मराठी भाषेत आणण्यासाठी भाषातज्ज्ञांनी प्रयत्न करावेत

तसेच जुने संदर्भ असलेले ज्ञान मल्टिमीडिया स्वरूपात उपलब्ध करून द्यावे असे प्रतिपादन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी 'घराघरात विश्वकोश' या प्रकल्पांतर्गत युनिकोडमधील पहिल्या खंडाचे लोकार्पण करताना केले.

विश्वकोशाच्या सीडीनंतर हा ज्ञानसाठा वेबसाइटवर आणण्याचे मंडळाने ठरवले आहे. चित्रांसह पहिला खंड आता वेबसाइटवर आला असून यानंतर दरमहा एक खंड वेबसाइटवर टाकण्यात येईल. या प्रकल्पासाठी सीडॅकने सहकार्य केले आहे.

विश्वकोशाच्या संकेतस्थळाचा पत्ता www.marathivishwakosh.in असून लवकरच ही साइट विश्वकोशाच्या www.vishwakosh.org.in या साइटलाही जोडली जाणार आहे.

*** पुण्यात सात आश्चर्ये**

आयफेल टॉवर, झुलता मनोरा, ताजमहाल, चीनची भिंत, इजिप्तमधील पिरॅमिड्स, रोमचे स्टेडियम, अमेरिकेतील स्टॅच्यू ऑफ लिबर्टी आणि इंग्लंडमधील महाकाय शिळा... अशी जगातील सात आश्चर्ये शिवदर्शन अरण्येश्वर परिसरात पुणे महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण उद्यानामध्ये कलादिग्दर्शक नितीन देसाई उभी करीत आहेत.

तसेच या उद्यानात तंत्रज्ञानाचा अनोखा अनुभव देणारे चित्रमहर्षि दादासाहेब फाळके चित्रमंदिर हे फोर डायमेन्शन (फोर डी) थिएटरही सुरू करण्यात येत आहे.

जगप्रसिद्ध नायगारा धबधब्याची प्रतिकृतीही येथे असेल. लोखंड आणि फायबरपासून बनविण्यात आलेल्या या प्रतिकृती आणि थिएटर यांसाठी दोन कोटी रुपये खर्च येणार आहे.

भीमसेन जोशी आर्ट गॅलरी, फुलपाखरू उद्यान, म्युझिकल फाऊंटन ही या भागाची वैशिष्ट्ये आहेत. त्यात तारांगण आणि वॅक्स म्युझियम यांचीही भर पडणार आहे.

*** ब्रेल लिपीतील दिवाळी अंक**

पुण्यातील माऊस मल्टीमीडियातर्फे अंधांसाठी ब्रेल लिपीतील दिवाळी अंक प्रकाशित करण्यात आला आहे.

अनेक लेखकांना बालसाहित्य निर्माण करण्याची प्रेरणा देणाऱ्या भा. रा. भागवत यांच्या जन्मशताब्दीनिमित्त 'माऊस' हा दिवाळी अंक तयार केला असून अंध व्यक्तींसाठी खास ब्रेल आवृत्तीही प्रकाशित करण्यात आली आहे. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कार्याध्यक्षा डॉ. माधवी वैद्य व निवांत अंध संस्थेच्या मीरा बडवे यांच्या हस्ते या अंकाचे प्रकाशन झाले. यावेळी मैथिली चव्हाण या अंध युवतीने एका कथेचे वाचन केले. कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायतींचे अध्यक्ष मोहन ननावरे, संपादक अमृता वाळिंबे, प्रशांत खुंटे यावेळी उपस्थित होते.

बडवे म्हणाल्या की, अंधांच्या ज्ञानात भर पडावी म्हणून अनेक पुस्तके ब्रेल

लिपीमध्ये रूपांतरित केली आहेत. मात्र, दिवाळी अंकांचे ताजेपण मनाला फुलविणारे असते. माऊसने दिवाळी अंकांचे ब्रेल लिपीत रूपांतर केल्याने अंधांच्या जीवनात एक प्रकाशाचा किरण येणार आहे. महाराष्ट्र आणि गोव्यातील 'निवांत'च्या ग्रंथालयातून १५०० मुलांपर्यंत हा अंक पोहचविला जाईल.

*** ई-दिवाळी अंक**

छान छान कविता, कथा, चारोळ्या, पाककृती व अन्य साहित्य वाचायला देणाऱ्या दिवाळी अंकांच्या ई-रूपाला तितकीच लोकप्रियता मिळत आहे. अमेरिका व युरोपमधील मराठीजनांमुळे ई-दिवाळी अंक उपलब्ध करून देणाऱ्या संकेतस्थळांना लाखो 'हिट्स' मिळत आहेत.

www.netbhet.com हे संकेतस्थळ चालविणारे सलील चौधरी म्हणाले, ''ई-दिवाळी अंक वाचणाऱ्यांची संख्या झपाट्याने वाढत आहे. या काळात तब्बल तीन लाख वाचक संकेतस्थळाला भेट देतात आणि त्यावरील प्रत्येक पान वाचण्यासाठी सरासरी सहा मिनिटे घालवतात. गुगलसारख्या सर्च इंजिनवर ई-दिवाळी अंक म्हणून शोध घेतला तर लाखाहून अधिक रिझल्ट्स मिळतात. इंटरनेटवर प्रसिद्ध होणारी पुस्तके व अन्य साहित्यासाठी ही खूप मोठी गोष्ट आहे.''

''ई-अंकांमध्ये बहुतांश ब्लॉगर्सच्या लेखनाचा समावेश होतो. प्रतिसाद वाढत असल्याने आता ई-अंकांमध्ये एखाद्या विषयाला वाहून घेण्याची पद्धत सुरू झाली आहे. ई-अंकाचा दर्जा टिकवण्यासाठी साहित्य निवडण्याचे काम जाणकारांकडून होण्याची गरज आहे.''

''पुणे, मुंबई तसेच अमेरिका, ऑस्ट्रेलिया, युरोपमध्ये कामानिमित्त गेलेल्या किंवा स्थायिक झालेल्या मराठी वाचकांकडून ई-दिवाळी अंकासाठी सर्वाधिक 'हिट्स' मिळतात. विशेषत: सॉफ्टवेअर किंवा बीपीओ कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या लोकांमध्ये ई-अंकाची 'क्रेझ' अधिक आहे,'' अशी माहिती www.ediwaliank.com चालविणाऱ्या ललिता अकोलकर म्हणाल्या, ''ई-अंक काढताना त्यातील मजकूर संकलित व अपलोड करण्याचे काम जिकिरीचे असते. युनिकोड प्रणालीचाच वापर करावा लागत असल्याने अनेकदा कामामध्ये अडचणी येतात.''

*** भ्रष्टाचारमुक्त भारतासाठी 'ई-हत्यार'**

भ्रष्टाचाराच्या विरोधात आवाज उठवण्यासाठी पुण्यातील आदित्य पळणीटकर हा विद्यार्थी www.corruptionfree.in हे वेबपोर्टल विकसित करीत आहे. केवळ एका 'एसएमएस' किंवा 'ई-मेल'च्या मदतीने तक्रार नोंदविण्याची सुविधा हे या वेबपोर्टलचे वैशिष्ट्य आहे. अभिनव प्रशालेत (इंग्रजी माध्यम) इयत्ता दहावीत शिकणारा आदित्य, 'भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी अगदी बेसिक गरज म्हणून 'हॉर्लिक्स विझ किड्स' या स्पर्धेतील एका प्रोजेक्टचा भाग म्हणून हे वेबपोर्टल तयार

केले आहे. त्यासाठी 'पर्सिस्टंट, 'पारी रोबोटिक्स', 'रेणू इलेक्ट्रिकल्स', 'एअरटाइट नेटवर्क' या कंपन्यांकडून आर्थिक मदत मिळाली आहे.

'सर्वसामान्य नागरिकांबरोबरच मोबाईल वापरणारे शाळा-कॉलेजमधील विद्यार्थीही भ्रष्टाचाराविषयी तक्रार देऊ शकतात. त्यासाठी '८४४६३२४६७०' या क्रमांकावर शहराचे नाव, एसएमएस करणाऱ्या व्यक्तीचे नाव आणि घटना अशी माहिती पाठवावी. माहिती देणाऱ्याचे नाव गुप्त ठेवण्याची सुविधाही पोर्टलवर आहे. माहितीची शहानिशा करण्यासाठी पोर्टलवर काही फिल्टर्स लावण्यात आले आहेत. पोर्टलवरील माहिती 'लाचलुचपत प्रतिबंधक विभाग' आणि प्रसारमाध्यमांपर्यंत पोचविली जाईल.

*** 'गुरू' दर्शनासाठी गर्दी**

ज्योतिर्विद्या परिसंस्थेतर्फे 'गुरू' ग्रह पाहण्याच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनीच गुरू ग्रह पाहण्यासाठी एकच गर्दी केली.

शुक्रानंतर तेजस्वी असणारा गुरू ग्रह बारा वर्षांमध्ये सूर्याला प्रदक्षिणा घालत असतो. तर दर १३ महिन्यांनंतर गुरू ग्रहाची सूर्याबरोबर प्रतियुती होते. यामध्ये सूर्यास्ताच्या वेळेला गुरू उगवतो. या कालावधीत गुरू पृथ्वीच्या सर्वाधिक जवळ असल्यामुळे तो इतर वेळेपेक्षा जास्त ठळक आणि प्रकाशमान दिसतो. हाच प्रतियुतीचा योग २९ आणि ३० ऑक्टोबर रोजी आला.

अनघा ही चौथीतली मुलगी म्हणाली, ''गुरू अगदी आपल्या चंद्रासारखा दिसत आहे. दुर्बिणीमधून गुरू आणि त्याचे चंद्र पाहायला मिळाले म्हणून छान वाटले.''

नववीत शिकणारी आरती जांभळे म्हणाली, ''गुरूवरील वायूचे ढगही या वेळी पाहायला मिळाले. गुरू ग्रह हा वायूचा बनलेला आहे, हे पुस्तकात वाचले होते; पण दुर्बिणीमधून त्यावरील वायूचे ढग असल्याचे जाणवते. गुरूच्या चंद्राची सावलीही मला पाहायला मिळाली.''

तीस वर्षांपासून ग्रहांचा अभ्यास करणारे संस्थेचे कार्यवाह दीपक जोशी म्हणाले, ''मुलांमध्ये खगोलशास्त्राची आवड निर्माण व्हावी, हा आमचा हेतू आहे. ग्रहांबद्दल मुलांमध्ये जिज्ञासा जागृत व्हायला हवी आणि यामधूनच या क्षेत्रात आणखी संशोधन व्हावे, यासाठी विविध उपक्रम राबवत असतो.''

*** 'सकाळ' दिवाळी अंक**

''एरवी लहान दिसणारे शब्द प्रकाशाने उजळून टाकणारे दीप होतात, तेव्हा वाचकांना आकृष्ट करतात. 'शब्ददीप' हा दिवाळी अंक असाच आकृष्ट करणारा आहे. या अंकात पुण्याची वाङ्मयीन पुण्याई आहे; त्याचबरोबर पुण्याबाहेरील महाराष्ट्राची संस्कृतीही आहे,'' असे विचार ज्येष्ठ समीक्षक आणि माजी संमेलनाध्यक्ष डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

'सकाळ'चे कार्यकारी संपादक नवनीत देशपांडे अध्यक्षस्थानी होते.

कुलकर्णी म्हणाले, ''दैनिक हे वाचकाचे सामाजिक आत्मचरित्र असते. दैनिक हा 'प्रवाह' असतो; तर त्याच्या वतीने निघणारा वार्षिक दिवाळी अंक हा 'डोह' असतो. त्यामध्ये सभोवतालच्या वनश्रीचे प्रतिबिंब पाहावे आणि हिंमत असेल तरच उडी मारावी. 'शब्ददीप' हा दिवाळी अंक चांगल्या आणि वाईट अशा दोन्ही अर्थांनी 'सदाशिवपेठी' नाही. राज्यातील लेखक आणि त्यांचे लेखन याचे प्रतिनिधित्व या अंकामध्ये दिसते आहे. घरातील दिवा घर उजळून टाकतो. घराबाहेरचा दिवा बाहेरील लोकांना वाट दाखवत असतो. त्यामुळे दिवा नेहमी उंबरठ्यावर ठेवायचा असतो. हा दिवा घरातल्यांनाही प्रकाश देतो आणि बाहेरच्या लोकांनाही वाट दाखवितो. असाच 'शब्ददीप' हा दिवा उंबरठ्यावर ठेवण्यात आलेला आहे.''

''वयाच्या बाराव्या वर्षांपासून मी दिवाळी अंक आवडीने वाचतो आहे. दिवाळीच्या पहिल्या दिवशी स्टॉलवर जाऊन अंक विकत घेताना, मी पवित्र कृत्य करतो आहे, अशीच माझी भावना असते.'' असेही कुलकर्णी यांनी सांगितले.

*** सोळा ऑक्टोबर आता 'स्टीव्ह जॉब्ज दिन'**

तंत्रज्ञानाचा किमयागार स्टीव्ह जॉब्जच्या नावे आता कॅलेन्डरमधील एक दिवस राखीव असेल. दर वर्षी १६ ऑक्टोबरला 'स्टीव्ह जॉब्ज दिन' साजरा करण्याचा निर्णय 'ॲपल'च्या मायभूमीने, कॅलिफोर्नियाने घेतला आहे. कॅलिफोर्नियाचे गव्हर्नर जेरी ब्राऊन यांनी ही घोषणा केली. स्टीव्ह जॉब्जचे वयाच्या ५६ व्या वर्षी पाच ऑक्टोबरला निधन झाले. 'ॲपल'ने जॉब्जची जीवनमूल्ये जपण्यासाठी 'सेलिब्रेट जॉब्ज लाइफ' कार्यक्रम हाती घेतला आहे.

*** आर. के. लक्ष्मण यांचा 'अनकॉमन' वाढदिवस**

'कॉमन मॅन'च्या रूपाने गेली अनेक वर्षे समाजाचे चित्रण करणारे ज्येष्ठ व्यंगचित्रकार आर. के. लक्ष्मण यांनी एक्याण्णवाव्या वर्षात प्रवेश केला. त्यानिमित्ताने त्यांचा वाढदिवस 'अनकॉमन' पद्धतीने साजरा करण्यात आला.

जीवनात अनेक व्यक्तींची आणि अनेक प्रसंगांची व्यंगचित्रे रेखाटणाऱ्या 'आरकें'ना यंदा त्यांच्यावरच चितारलेल्या व्यंगचित्रांचा नजराणा सादर करण्यात आला आहे.

शि. द. फडणीस, विकास सबनीस, संजय मिस्त्री, विजय पराडकर, चारुहास पंडित, प्रभाकर वाडेकर, वैजनाथ दुलंगे, खलील खान या व्यंगचित्रकारांसह रवी परांजपे आणि रविमुकुल या चित्रकारांच्या उपस्थितीत त्यांच्या राहत्या घरी 'आरके' यांची व्यंगचित्रे रेखाटून हा वाढदिवस साजरा करण्यात आला. सिंबायोसिसचे संस्थापक शां. ब. मुजुमदार, राज्याचे प्रभारी माहिती आयुक्त विजय कुवळेकर, कृष्णकांत कुदळे, गझलकार प्रदीप निफाडकर आदी यावेळी हजर होते.

*** लघुपट महोत्सवात २४ लघुपट**

देशभरातील तरुण 'फिल्म मेकर्स'ना प्रोत्साहन देण्यासाठी व प्रेक्षकांनादेखील

नवीन माध्यमाचा आनंद देण्यासाठी राजा परांजपे प्रतिष्ठानतर्फे ‘शॉट टू शॉट’ या डिजिटल लघुपट महोत्सवाचे आयोजन केले गेले.

या महोत्सवात एकूण २४ लघुपट दाखवले गेले. त्यातील पहिल्या तीन लघुपटांना पारितोषिके देण्यात आली. परीक्षक म्हणून अशोक राणे व समर नखाते यांनी काम पाहिले.

*** हृदयनाथ मंगेशकर - अमृतमहोत्सव**

मंगेशकर कुटुंब ही जगाला मिळालेली एक अलौकिक देणगी आहे. त्यांची गाणी ऐकण्यासाठी स्वतंत्र कानच असावा लागतो, असे गौरवोद्‌गार शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी काढले.

पं. हृदयनाथ मंगेशकर यांचा अमृतमहोत्सवी सोहळ्याचा कार्यक्रम मंगेशकर यांचे शिष्य मुकुंद फणसळकर, स्वरानंद प्रतिष्ठान आणि ‘नुपूर’ या संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. यावेळी ज्येष्ठ गायक अरुण दाते, ज्येष्ठ कवी सुधीर मोघे, कॉसमॉस बँकेचे उपाध्यक्ष कृष्णकुमार गोयल यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. मानपत्र, पुष्पगुच्छ, शाल देऊन हृदयनाथ मंगेशकर यांचा सत्कार करण्यात आला.

ज्ञानेश्वरांच्या रचनांना मंगेशकरांनी दिलेल्या चाली सुंदर आहेत. गाण्याच्या ‘मूड’मध्ये नेऊन सोडणे, हे तसे अवघड काम आहे; परंतु मंगेशकरांच्या संगीतात ते सोपे होते, असेही पुरंदरे म्हणाले.

ज्ञानेश्वरांच्या प्रत्येक ओवीतून प्रत्येक संगीतकाराला वेगळा अर्थ गवसला आहे. ‘गेले द्यायचे राहूनि तुझे नक्षत्रांचे देणे’ असे सत्काराला उत्तर देताना हृदयनाथ म्हणाले. ‘कानडा ओ विठ्ठलू कर्नाटकू’, ‘ये रे घना’, ‘गेले द्यायचे राहूनी’, ‘माझ्या सारंगा’, ‘समईच्या शुभ्र कळ्या’ अशी गाणी यावेळी फणसळकर आणि सहकाऱ्यांनी सादर केली. अरुण नूलकर यांनी सूत्रसंचालन केले.

*** आयफोन ५ : स्टीव्हचा ड्रीम ‘जॉब’**

‘आयफोन’ची पुढची आवृत्ती ‘फोर एस’च्या माध्यमातून बाजारात आली. ॲपलच्या या अपत्यासाठी स्टीव्ह जॉब्ज आपल्या अखेरपर्यंत कार्यरत होता. पण स्टीव्हची अविश्रांत लढाई केवळ ‘फोर एस’साठीच नाही, तर ‘आयफोन ५’ साठीही सुरू होती असे त्याच्या सहकाऱ्यांनी बोलून दाखविले. ‘आयफोन ५’ हा स्टीव्हसाठी ड्रीम ‘जॉब’ होता. ‘आयफोन ५’ हा वजन, आकार आणि स्लिमनेस या बाबतीत ‘फोर एस’सारखाच असणार आहे. ‘आयफोन ५’ हा फोर जी या तंत्रज्ञानावर आधारीत असेल.

*** पत्त्यांच्या पानांवर दिवाळी अंक**

दिवाळी अंक म्हटले की विशिष्ट आकाराचे, कथा, व्यंगचित्रे, कवितांनी भरगच्च असलेले पुस्तक असा आपला आजवरचा अनुभव. पण या सर्वांना छेद देत यंदा

मुंबईच्या राजेंद्र प्रकाशनाने दिवाळी अंक चक्क पत्त्यांच्या आकारात प्रसिद्ध केला. खेळायचे पत्ते आणि चार लेखकांच्या कथा, असे या अंकाचे स्वरूप आहे.

या इवलुशा दिवाळी अंकात प्रभाकर पेंढारकर('एक छोटीसी भूल'), शिरीष गोपाळ देशपांडे ('चौकट चाल!'), अनंत मनोहर ('हायकमांडचा माणूस') आणि सुधाकर कौशिक ('व्हायरस') यांच्या कथा आहेत. त्याशिवाय चार हुकमांच्या कथा आहेत. प्रत्येक कथा तेरा भागांमध्ये विभागलेली आहे. विशेष म्हणजे हे पत्ते नेहमीच्या पत्त्यांसारखे खेळता येतील.

प्रत्येक कथा हुकमाच्या एक्क्यावर सुरू होते, मग दुर्री, तिर्री... करत राणीपर्यंत येईल आणि राजावर संपते. परंतु, हा राजा अर्थात कथेचा शेवट, गुप्तहेर वाचकांना शोधायचा आहे. त्याशिवाय 'नॉट ॲट होम'प्रमाणे एकमेकांकडे पत्ते मागायचे. जो प्रथम चारही कथा अर्थात सर्व बावन्न पाने जमवेल तो जिंकेल. त्याशिवाय बदाम सातप्रमाणेसुद्धा या पत्त्यांवर खेळ खेळता येईल. विशेष म्हणजे या पत्त्यांच्या माध्यमातून आणखी नव-नवीन खेळही मुलांना शोधून काढता येतील. या बावन्न पत्त्यांमधून अनेक कथा निर्माण होऊ शकतात.

या कॅटमध्ये तीन जोकर असतील. यातील पहिल्या जोकरवर प्रस्तावना असेल. दुसऱ्या जोकरवर या दिवाळी अंकातील कथा कशा वाचाव्यात याविषयी सूचना आणि तिसऱ्या जोकरवर विविध उपक्रमांविषयी माहिती असेल.

*** फ्रेंड रिक्वेस्टमधून 'सायबर अटॅक'**

फेसबुकवरील फ्रेंड रिक्वेस्ट ॲक्सेप्ट करताना जरा काळजी घ्या. कारण त्या माध्यमातून सायबर अटॅक होण्याची शक्यता आहे. ट्रोजनचा वापर करून अशाप्रकारचे सायबर अटॅक केले जात असल्याचे सायबरोम या आयटी कंपनीने नुकतेच स्पष्ट केले.

या माध्यमातून घोटाळेबहाद्दर आपली सर्व माहिती मिळवत असतात. युजर्सच्या फेसबुक वापरासंदर्भात केलेल्या एका सर्वेक्षणानुसार बहुतांश लोक फ्रेंड रिक्वेस्ट त्या व्यक्तीची माहिती न घेता ॲक्सेप्ट करतात. यामुळे घोटाळेबहाद्दरांचे फावते आणि ते स्पॅम मेसेजच्या साहाय्याने आपल्या अकाऊंटचे आणि माहितीचे मॉनिटरिंग करत असतात. आपल्या माहितीचा दुरुपयोग करतात, असे सायबरोमचे अभिलाष सोनावणे यांनी सांगितले. ऑगस्ट महिन्यात अशा प्रकारच्या हल्ल्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर माहितीची चोरी झाल्याचे उघड झाले आहे. याचबरोबर फेसबुकवर येणाऱ्या विविध ऑफर्सच्या माध्यमातूनही एका व्यक्तीच्या फ्रेंडलिस्टमधील फ्रेंडसमध्ये स्पॅम पसरवला जातो. फेसबुकवरील विविध पेजेसच्या 'लाइक' बटनवर क्लिक केले तरी स्पॅम पसरत जातो. हॅकर्स आता सोशल नेटवर्किंग साइटवरून लोकांना टार्गेट करत आहेत. हॅकर्ससाठी सोशल नेटवर्किंग साइट्सचे हत्यार सोपे झाले असून भविष्यात

अधिकाधिक सायबर हल्ले होऊ शकतील असा इशारा देण्यात आला आहे.

*** 'आयपॉड'ची दशकपूर्ती**

तुमच्याकडे असणारा संगीताचा संग्रह आता तुमच्या खिशात राहू शकणार आहे, असे उद्‌गार काढत ॲपलचे जनक स्टीव्ह जॉब्स यांनी २३ ऑक्टोबर २००१ ला 'आयपॉड' बाजारात आणला आणि संगीतक्षेत्रात क्रांती झाली. नुकतीच या छोटेखानी म्युझिक इन्स्ट्रुमेंटने दशकपूर्ती केली. पहिला 'आयपॉड' केवळ ५ जीबी क्षमतेचा होता. जगभरात स्मार्टफोन्स आणि टॅब्लेट पीसीच्या क्षेत्रात अव्वल असणाऱ्या आयफोन आणि आयपॅडमध्ये वापरण्यात येणाऱ्या तंत्रज्ञानाची सुरुवात या छोट्याशा 'आयपॉड'मधूनच झाली.

पूर्वी एखाद्या म्युझिक अल्बममधून एकच गाणे आवडले असेल, तर त्या एका गाण्यासाठी संपूर्ण अल्बमच विकत घ्यावा लागे. केवळ एका गाण्यासाठी तीनशे-साडेतीनशे रुपये मोजावे लागत असत. पण 'आयपॉड'च्या निमित्ताने तयार झालेल्या 'आयट्यून्स'ने ही संकल्पनाच मोडीत काढली. लोकांना हवे ते गाणे स्वस्त दरात मिळण्याची सोय या नव्या म्युझिक लायब्ररीने केली. अशा पद्धतीने गाणी किंवा इतर उपयुक्त सुविधांना एककेंद्री करणे 'आयट्यून स्टोअर'ने शक्य करून दाखवले. डिजिटल म्युझिकला या नव्या प्रकाराने वेगळेच वळण प्राप्त झाले. मुळात म्युझिक प्लेयर ही संकल्पना लोकांसाठी नवी नव्हती. पण आयपॉडने मात्र या व्याख्येला अंतर्बाह्य बदलवून टाकले.

सुरुवातीला तयार करण्यात आलेला आयपॉड केवळ मॅक ऑपरेटिंग सिस्टिमसोबतच काम करू शकत होता. पण, पुढे मायक्रोसॉफ्टच्या विण्डोज ऑपरेटिंग सिस्टिमसोबतही तो जोडला गेला. २००१ नंतर आत्तापर्यंत आयपॉडचे क्लासिक, टच, नॅनो आणि शफल, असे प्रकार बाजारात आले. पहिल्या आयपॉडमध्ये असणारी बटणे हळूहळू गायब झाली आणि त्यांची जागा टचस्क्रीनने घेतली. गाणी स्टोअर करण्याची क्षमताही पाच जीबीवरून १६० जीबीपर्यंत गेली. गाण्यांबरोबरच व्हिडिओचा अंतर्भावही त्यामध्ये करण्यात आला. कॅसेट, वॉकमनच्या सहाय्याने ऐकली जाणारी गाणी छोट्या इलेक्ट्रॉनिक गॅजेटच्या माध्यमातून ऐकू येऊ लागली. गाणी ऐकण्याच्या पद्धतीतच बदल घडवण्यात आयपॉडचा फार मोठा वाटा आहे.

*** 'सोशल' शर्यतीत गुगल प्लसची मोठी झेप**

आपल्या आयुष्यातील सुखदु:खं शेअर करण्याचं व्यासपीठ बनलेल्या सोशल नेटवर्किंग क्षेत्रावर गेली पाच-सात वर्षे अधिराज्य गाजवणाऱ्या फेसबुकला गुगल प्लसने खडतर आव्हान उभे केले आहे.

'गुगल प्लस'ने अल्पावधीतच चार कोटी युजर्सचा आकडा गाठला आहे. जो आकडा गाठण्यासाठी फेसबुकला तीन वर्षे लागली तो आकडा गुगल प्लसने काही

महिन्यांत पार केला.

गुगल प्लसची आकर्षक रचना, रंगसंगती, सहज हाताळणीची सुविधा आणि जी मेलच्या युजर्सचा अतिप्रचंड डेटाबेस यामुळे अल्पावधीतच गुगल प्लसने मोठी मजल गाठली आहे. फेसबुक लॉंच झालं तेव्हा सोशल नेटवर्किंग हे क्षेत्र कुणाच्या गावीही नव्हतं. 'माय स्पेस' ही एकच वेबसाइट तेव्हा कार्यरत होती. फेसबुकने सोशल नेटवर्किंगमध्ये क्रांती घडवून आणली. सोशल नेटवर्किंग घराघरात पोहोचलं ते फेसबुकमुळेच! गुगल प्लसची वाढती 'युजर' संख्या याचेच फलित आहे.

*** आशा भोसले गिनीज् बुकात**

रसिकांच्या हृदयसिंहासनावर सहा दशकांहून जास्त काळ अधिराज्य गाजवणाऱ्या आशा भोसले यांना 'गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स'ने जगातील सर्वाधिक ध्वनिमुद्रणे केल्याबद्दल कुर्निसात केला आहे.

सुमारे ८००० हिंदी गाणी, १६०० हून अधिक मराठी गाणी, सुमारे ८०० बंगाली आणि हजाराहून अधिक इतर भाषांतील गाणी अशी देदीप्यमान कारकीर्द असणाऱ्या ज्येष्ठ पार्श्वगायिका आशा भोसले यांना सर्वोच्च बहुमानाचा 'मोस्ट स्टुडिओ रेकॉर्डिंग्ज इन द वर्ल्ड' हा किताब लंडन येथे झालेल्या एशियन ॲवॉर्ड्समध्ये प्रदान केला.

'आज खऱ्या अर्थी माझ्या कारकिर्दीला जागतिक पातळीवर मान्यता मिळाली आहे असे मी मानते. सगळ्यात जास्त पार्श्वगायन मी केले आहे, हे मला स्वत:ला ठाऊक होते; पण मी कुठे बोलले नव्हते. संगीत अभ्यासक विश्वास नेरूरकर यांनी हे सगळे रेकॉर्ड शोधून काढले आणि 'गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स'ला पुरविले. माझ्या चाहत्यांचे प्रेम यामागे आहे. त्यांनी ते असेच कायम ठेवावे या शब्दांत आशाबाईंनी आपले मनोगत व्यक्त केले.

*** 'माझ्या मुलांना कळावे... म्हणून'**

'ॲपल'चे दिवंगत सहसंस्थापक स्टीव्ह जॉब्ज हे केवळ 'टेक्नोक्रॅट'च नव्हे तर प्रेमळ आणि कनवाळू पितादेखील होते. आपल्या मुलांना वेळ देणे कोणत्या कामामुळे जमले नाही हे त्यांना कळावे यासाठी जॉब्ज यांनी स्वत:चे चरित्र लिहिण्यास परवानगी दिली, असे लेखक वॉल्टर आयझॅकसन यांनी सांगितले.

''माझ्या मुलांना ज्यावेळी माझी गरज होती, त्यावेळी कधीच मी वेळ देऊ शकलो नाही. त्यामुळे त्या वेळेत मी नेमके काय काम करीत होतो, याची जाणीव त्यांना व्हावी, यासाठी पुस्तक लिहायचे असे जॉब्ज यांनी स्पष्ट केले होते. मृत्यू उंबरठ्यावर दिसत असतानाही जॉब्ज यांची बुद्धिमत्ता आणि विनोदबुद्धी तेवढीच प्रखर होती. आपला अंत आता जवळ आला आहे, याची जाणीव त्यांना होती. आपला अनंताच्या प्रवासाला जाण्याचा दिवसही जवळच्या सहकाऱ्यांना सांगितला होता.'

असा उल्लेख या चरित्रात आला आहे.

वॉल्टर आयझॅकसन लिखित 'आयस्टीव्ह : द बुक ऑफ जॉब्ज' हे पुस्तक आता प्रसिद्ध झाले आहे.

*** डॉ. माशेलकर यांच्या मातोश्रींच्या नावे पुरस्कार**

अत्यंत हलाखीची स्थिती, अशिक्षितपणा व वैधव्य अशा समस्यांच्या जंजाळात अडकल्यानंतरही त्यावर मात करीत आपल्या एकुलत्या एक मुलाला, म्हणजेच डॉ. रघुनाथ माशेलकर यांना संशोधक म्हणून घडविले, त्या अंजली माशेलकर यांच्या नावाने पुरस्कार सुरू करण्यात आला आहे.

डॉ. रघुनाथ माशेलकर अध्यक्ष असलेल्या 'इंटरनॅशनल लाँजिव्हीटी सेंटर' या संस्थेच्या माध्यमातून हा पुरस्कार देण्यात येणार आहे. 'अंजली माशेलकर इन्क्लुझिव्ह इनोव्हेशन ॲवार्ड' असे या पुरस्काराचे नाव आहे. एक लाख रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे सर्वसमावेशक नावीन्याच्या (इन्क्लुझिव्ह इनोव्हेशन) माध्यमातून भारतातील गरीब जनतेचे जीवन उंचाविण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या व्यक्ती, संस्था यांना हा पुरस्कार देण्यात येणार आहे. अंजली माशेलकर यांना गोरगरिबांबद्दल तळमळ होती व लोकांसाठी काही तरी करायला हवे, अशी भावना त्या नेहमी व्यक्त करायच्या. http.//www.ilcindia.org या संकेतस्थळावर अर्ज उपलब्ध आहेत.

*** 'आकाश' टॅब्लेट संगणक**

'आकाश' हा टॅब्लेट संगणक पुण्यामध्ये लौकरच उपलब्ध होणार आहे. त्याची किंमत तीन ते साडेतीन हजारांच्या घरात राहील, असे शहरातील टॅब्लेट संगणक वितरकांनी सांगितले.

डेटाविंड या कंपनीने तयार केलेल्या आकाश टॅब्लेट पीसीची किंमत तीन हजार रुपये असेल. दर महिन्याला एक लाख टॅब्लेट पीसी तयार करून ते प्रथम विद्यार्थ्यांना मोफत देण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. अशी घोषणा केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री कपिल सिब्बल यांनी ता. ५ ऑक्टोबरला केली.

'आकाश' टॅब्लेट पीसीमध्ये फक्त २५६ मेगाबाईट रॅम आहे. ही रॅम वाढवण्याची सोय नसल्यामुळे मेमरी कार्डची क्षमता ३२ गीगाबाईटपर्यंत वाढवता येईल.

'आकाश'प्रमाणेच स्वस्तातले टॅब्लेट संगणक तयार करण्याचा प्रयत्न यापूर्वीही झाला. एमआयटी स्कूल ऑफ टेलिकॉम आणि स्विंगटेल कम्युनिकेशन्स कंपनीचे प्रकल्प प्रमुख मिलिंद पांडे यांनी आठ ते दहा हजारांत 'एक्स-स्मार्ट' हा टॅब्लेट संगणक थ्री-जी वाय-फाय सुविधेसह बाजारात आणला. रिलायन्सचा थ्री-जी टॅब्लेट बाजारात तेरा हजारांत उपलब्ध आहे.

टॅब्लेटमध्ये काय आहे?

* अँड्राईड २.२, २५६ मेगाबाईट रॅम

* ७ इंच टचस्क्रीन, दोन यूएसबी पोर्ट
* एक वर्षाची गॅरंटी
* तीन तास चालणारी बॅटरी

तंत्रज्ञानात झालेल्या बदलानंतर बाजारामध्ये विविध बँकांची एटीएम, क्रेडिट आणि डेबिट कार्डे आली. परिणामी बँकेमध्ये दिसणारी गर्दी हळूहळू कमी होत गेली. विविध कार्डांच्या वापरामुळे रोख रक्कम जवळ बाळगण्याचे प्रमाणही कमी होत गेले. त्याहीपुढे जाऊन आता एका फोनवर देवाण-घेवाण व संभाषणाची कामे झाली, तर विशेष वाटायला नको. यासाठी 'गुगल'ने पुढाकार घेत 'गुगल वॉलेट्स' बाजारात आणले आहे. त्यामुळे भविष्यात नो कार्ड्स, नो कॅश; फक्त एक फोन असे चित्र दिसेल.

आधुनिक स्मार्टफोनमध्ये 'गुगल'चे नवीन सॉफ्टवेअर असणार आहे. त्यामुळे कोणत्याही प्रकारचे कार्ड सोबत बाळगण्याची आवश्यकता नाही. केवळ एका फोनवर तुमची सर्व कामे होऊ शकतील. या सेवेसाठी 'गुगल अॅण्ड्रॉइड' या ऑपरेटिंग सिस्टिमची आवश्यकता आहे. 'गुगल'तर्फे मोबाईलमध्ये 'एन.एफ.सी.' (निअर फील्ड कम्युनिकेशन) चिप बसविली जाते. 'अॅण्ड्रॉइड' सॉफ्टवेअर असणाऱ्या काही कंपन्यांच्या मोबाईलमध्ये ही चिप बसविण्याची सुविधा असल्याची माहिती यापूर्वीच 'गुगल'ने दिली होती. 'मास्टर कार्ड'प्रमाणे या कार्डचा आपण विविध ठिकाणी उपयोग करू शकतो. छोट्या-छोट्या दुकानांपासून ते टॅक्सी, मॉलमध्येही या कार्डचा उपयोग करता येतो. युरोप व आशिया खंडातील काही ठिकाणी ही सेवा सुरूही झाली आहे. अमेरिकेतही नागरिकांचाही मोठा प्रतिसाद मिळत आहे. या कार्डामार्फत केलेल्या देवाण-घेवाणीची माहितीही तत्काळ मिळत राहते. शिवाय, या कार्डवरून  खरेदी केल्यानंतर 'गुगल'कडून वेगवेगळ्या स्वरूपात बक्षीसही दिले जाते. त्यासाठी चार अक्षरांचा 'पासवर्ड' आवश्यक असणार आहे. मोबाईल बंद करून ठेवल्यास अथवा बॅटरी संपल्यास 'एन.एफ.सी.'मार्फत होणारा व्यवहार बंद राहतो.

❐





**शेतकऱ्याचा असूड** **६वी आवृत्ती**

संपादन व प्रस्तावना : **डॉ. नागनाथ कोतापल्ले**

शेतकऱ्यांवरही राज्यकर्ते आणि एकूण समाजाबरोबरच आसूड ओढणारे लेखन

९०रु. पोस्टेज २०रु.

**८ वी आवृत्ती आता नव्या रूपात**




# राजा रवि वर्मा

**रणजित देसाई**

३२०रु. पोस्टेज ३०रु.

मानवी जीवनाला सांस्कृतीक, भावनिक समृद्धतेकडे घेऊन जाणाऱ्या विविध कलांचे महत्त्व महान कलाकारांनीच सिद्ध केलेले असते. जीवनात येणाऱ्या सुखदु:ख, अभिव्यक्ती कलात्मकतेचे दर्शन घडवते. भारतीय चित्रकलेला एक वेगळे वळण लावणाऱ्या थोर चित्रकाराच्या जीवनाचे कलात्मक व भावात्मक दर्शन ही कादंबरी घडवते.

काव्यमय भाषाशैली आणि नाट्यपूर्ण अभिव्यक्ती ही देसाईंची लेखन वैशिष्ट्ये.

'राजा रविवर्मा' मध्ये रणजित देसाई यांच्या मधल्या कलावंताचे आणि माणसाचे उत्स्फूर्तपण कारंजासारखे उसळताना आढळते.


माणसाला कलेची भूक का लागते? जीवन आणि कला यांचा संबंध कोणत्या प्रकारचा असतो? अशा अनेक प्रश्नांचे मोहोळ वाचकांच्या मनात उठते आणि एक वेगळ्या प्रकारचा आनंद वाचकाला मिळतो.

# विशेषवार्ता

## * डॉ. अ. ह. लिमये जन्मशताब्दी

डॉ. अनंत हरी तथा काका लिमये यांचे हे जन्मशताब्दी वर्ष. काका लिमये म्हणजे भरपूर वाचन, व्यासंग आणि बहुश्रुतता यांचा मिलाफ. दांडगा लोकसंग्रह, अनेक जणांना केलेली आर्थिक मदत, मराठी ग्रंथ प्रदर्शन भरवणे, संशोधन, साहित्य प्रसार आणि संघटनाकार्य अशा सर्व क्षेत्रात कर्तृत्व त्यांच्या स्मृतीला वंदन करण्यासाठी, त्यांच्या जन्मशताब्दी वर्षात त्यांच्या आठवणींना उजाळा देणाऱ्या 'जिद्दी अनंतराव' या ग्रंथाचा प्रकाशन समारंभ १८ सप्टेंबर २०११ रोजी महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या माधवराव पटवर्धन सभागृहात पार पडला.

मेहता पब्लिशिंग हाऊसचे श्री. अनिल मेहता या समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते 'जिद्दी अनंतराव' या स्मृतिग्रंथाचे विमोचन करण्यात आले. अनिल मेहता यांनी आपल्या मनोगतात ''डॉ. अ.ह. लिमये हे एक अग्रणी प्रकाशक, ग्रंथव्यावसायिक होते. या ग्रंथातून त्यांच्या कारकिर्दीचा मागोवा घेतला



गेल्याबद्दल समाधान वाटते.'' असे ते म्हणाले.

या ग्रंथात अनेक समव्यावसायिक, सुहृद आणि नातेवाईक यांचे लेख समाविष्ट केलेले आहेत. सदर ग्रंथाचे संकलन श्री सुरेश नवरे यांनी केले आहे.

## * 'द व्हाइट टायगर' पुस्तकाला उत्कृष्ट अनुवादाचा बाळशास्त्री जांभेकर पुरस्कार

मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे प्रकाशित, अरविंद अडिगा लिखित आणि लीना सोहोनी अनुवादित 'द व्हाईट टायगर' या पुस्तकाला यंदाचा आंतरभारती अनुवाद सुविधा केंद्रातर्फे दिला जाणारा उत्कृष्ट अनुवादाचा 'बाळशास्त्री जांभेकर पुरस्कार' प्राप्त झाला आहे.

शनिवार दि. २२ ऑक्टोबर २०११ रोजी धुरु सभागृह, दादर या ठिकाणी पुरस्कार वितरण समारंभ पार पडला. कार्यक्रमास डॉ. रामदास भटकळ व प्रा. दीपक घारे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.



पुरस्कार स्वीकारताना  लीना सोहोनी

# साहित्य चिंतन

## वाचनाच्याद्वारे एकाच जन्मात आपण अनेक जन्मांचे अनुभव कल्पनेनं अनुभवू शकतो.

**तिसऱ्या शासकीय कर्मचारी साहित्य संमेलनात श्री. लक्ष्मीकांत देशमुख यांनी केलेल्या अध्यक्षीय भाषणातील काही भाग**

साहित्य हा जीवनाचा आरसा मानला जातो. घेतलेल्या, पाहिलेल्या व स्फुरलेल्या अनुभवाला चिंतन-मनन आणि प्रतिभेची जोड देत केलेले लेखन हे सकस साहित्य असते. किमानपक्षी तसे निर्माण होण्याची दाट शक्यता असते. नुकतेच कन्नड भाषेला आठवे ज्ञानपीठ जाहीर झाले त्याखालोखाल हिंदी भाषेला पाच-सहा ज्ञानपीठ पुरस्कार मिळाले. त्या मानाने मराठीच्या वाट्याला केवळ तीन वेळा हा सन्मान आला. यामागच्या कारणांचा आपण तटस्थपणे वेध घेणार आहोत का? असं म्हटलं जातं की, मराठी साहित्याचे अनुभवक्षेत्र हे अत्यंत सीमिते, थिटे व चाकोरीबद्ध आहे. ते जीवनाच्या रोमहर्षक, संघर्षाच्या अत्त्युच्च शिखराला कधी भिडत नाही. जोरकस दलित सहित्याचा प्रवाह जमेस धरूनही असं म्हटलं तर अतिशयोक्ती होणार नाही की, मराठी साहित्याचं अनुभवविश्व हे प्रामुख्यान मध्यमवर्गीय व मोजक्याच वर्तुळात फिरणारं आहे. आजही बहुसंख्य लेखक-कवी हे शिक्षक-प्राध्यापक आहेत. आज नव्यानं ग्रामीण भागात राहून टवटवीत लेखन करणारे काही मोजके ग्रामीण साहित्यिक सोडले तर बहुसंख्य लेखकांची ग्रामीण जीवनाची नाळ केव्हाच तुटलेली आहे. गेल्या वीस वर्षांत आर्थिक क्षेत्रातील खासगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण म्हणजेच खाऊजा नीतीमुळे आणि बाबरी मशिदीचं पतन, मंडल आयोग, अयोध्या यात्रा, धार्मिक दहशतवाद, आय.बी./बी.टी.ची क्रांती, मनोरंजन व प्रसार माध्यमे आणि माहितीचा झालेला स्फोट यामुळे महानगरं, छोटी-मोठी शहरं ते छोटी-मोठी गावे यामध्ये प्रचंड वेगाने जे बदल घडून आले आहेत, त्याचं पुरेसं भान इतर भाषिक लेखकांइतकं मराठी भाषिकांना आलेलं नाही. त्यामुळे आपलं लेखन थिटं ठरतं, यात नवल ते काय? आजची मराठीतील लोकप्रिय पुस्तके व लेखक मंडळी पाहिली तर

ऐतिहासिक, धार्मिक आणि सत्-असत्‌ची ढोबळ मांडणी करणाऱ्या मनोरंजन शरणतेला बळी पडून केलेल्या साहित्यालाच वाचकमान्यता दिसून येते.

वाचक प्रगल्भ का नाही तर लेखक त्यांचं मन, स्वप्नं कुरवाळीत त्यांचं मनोरंजन करणारं लिहितो आणि लेखन प्रगल्भ का नाही तर वाचकांना वेगळं फारसं रुचत नाही. त्याला तेवढी लोकप्रियता मिळत नाही, असा हा दुहेरी पेच आहे.

मोठ्या व महान कलाकृतीचं पहिलं व्यवच्छेदक लक्षण म्हणजे अनुभवाचा व्यापकपणा व जिवंतपणा. जीवन हे नाना रंगांचं, बहुपेडी असतं. आज जगात काय, भारतात काय, जीवन प्रचंड गुंतागुंतीचं व धकाधकीचं झालं आहे. मी तर असं म्हणेन की, भारतातील प्रचंड समस्या आणि गुंतागुंत, एकाच वेळी सतराव्या ते एकविसाव्या शतकात वावरणारा भारत आणि इंडिया असे दोन देश इथं एकाच वेळी नांदत आहेत; तिथलं जीवन हे तुलनेने अधिक व्यामिश्र, गुंतागुंतीचं व जटिल आहे. पुन्हा भारतीय राजकारण-समाजकारण व प्रशासनाची अगडबंब व अनेकपद समाजव्यवस्था व तिच्या कांचात भरडला जाणारा माणूस-आमआदमी व त्याची सुख-दुःखं, हर्ष-खेद याला अक्षरशः अनेक पैलू आहेत. अलिबाबाच्या गुहेसारखी ही समाज व्यवस्था नानाविध जीवनसंघर्षांनी खच्चून भरली आहे. ती जर लुटायची असेल तर अनुभवाचा 'तिळा उघड' हा मंत्र पाहिजे. आणि तो मंत्र शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांना ऑफिसबसल्या अनुभवता येऊ शकतो.

थोडक्यात सांगायचं तर, शासकीय अधिकारी व कर्मचारी असणाऱ्या लेखकाचं सर्वात मोठं भांडवल कोणतं असेल तर त्याच्या अनुभवाची श्रीमंती होय. मी तर नेहमीच म्हणतो की, महसूल अधिकारी म्हणून मला गरीब-श्रीमंत, लहान-थोर अशा सर्व प्रकारची माणसं अक्षरशः त्यांच्या मूळ रूपात-नग्न स्वरूपात भेटली. त्यातून मी थोडं लिहिलं, पण अजून खूप काही लिहिता येईल एवढा अनुभवाचा, प्रसंगांचा व व्यक्तिरेखांचा ऐवज शिल्लक आहे.

मित्रांनो, शासकीय कर्मचारी/अधिकाऱ्यांना अनुभवाची शिदोरी सहजतेनं सजग राहून टिपता येते. पण नुसता अनुभव लिहिला म्हणजे कथा होत नाही. त्यासाठी भाषा प्रभुत्व, रचनेवर हुकूमत, व्यक्तिचित्रण आदींची पण गरज असते. पण अनुभव जर सच्चा व सार्वत्रिक स्वरूपाचा असेल व कथाकथनाची हातोटी असेल तर त्यातून निश्चितपणे उत्तम व सकस कलाकृती निर्माण होऊ शकतात.

आत्मचरित्र हा मराठीत अलिकडच्या दोनचार दशकातला सर्वांत लोकप्रिय लेखनप्रकार ठरला आहे. दलित साहित्याचा बहर हा आत्मचरित्रामुळे होता, हे लक्षात ठेवा. शासकीय कर्मचाऱ्यांनी आत्मचरित्र लेखनाचा गांभीर्याने विचार करावा. तलाठी, रस्त्यावर बंदोबस्त करणारा पोलीस कॉन्स्टेबल, धरणं बांधणारा अभियंता, मंत्र्याचे पी.ए. असलेले कर्मचारी/अधिकारी, कलेक्टर, पोलीस अधीक्षक, ग्रामपंचायतीचा

ग्रामसेवक, जनावरांचा डॉक्टर, किती भिन्न अनुभव ही मंडळी घेतात! त्याचं सत्य, परखड व विश्लेषणात्मक लेखन केलं तर किती वेगवेगळ्या प्रकारची आत्मचरित्रे निर्माण होतील. मी सहज कल्पना करतो की, एखाद्या तलाठ्यानं उद्या आत्मचरित्र लिहिलं तर? वरिष्ठांची करावी लागणारी सरबराई, जमिनीच्या नोंदीचे अधिकार व त्यामुळे मिळालेले प्रचंड अधिकार, गावगन्ना पुढाऱ्यांचा येणारा संपर्क, कामाचे प्रचंड ओझे, कधी पूर, कधी दुष्काळ, कधी जनगणना तर कधी रोजगार हमीचे काम... त्याचा गांवगाड्याशी दररोज संबंध येतो. हे सारं तो जर सजगतेनं लिहू शकला तर किती प्रचंड ताकदीचं आत्मचरित्र निर्माण होईल!

माझं सर्व कर्मचाऱ्यांना आणखी एक आवाहन आहे की, त्यांनी माहितीपर, जीवनोपयोगी व ललितेतर साहित्य लेखनाचा गांभीर्यानं विचार करावा. येथे प्रतिभेपेक्षाही अनुभव व विषयाची जाण महत्त्वाची असते. रिझर्व बँक, नाबार्डसारख्या सरकारी बँकातील कर्मचारी/अधिकाऱ्यांना भारतीय अर्थकारण, शेती-लघुउद्योग यासारख्या विषयांवर कितीतरी माहितीपूर्ण लिखाण करता येईल. त्याची आज वाचकांना भूक आहे. विज्ञानाशी संबंधित विभागात (प्रदूषण मंडळ, अणु ऊर्जा, रासायनिक कारखानदारी इ.) काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना,अभ्यासपूर्वक पर्यावरण, जलसंधारण व कारखानदारीवर लिहिता येईल. जलसिंचन, विद्युत, बांधकाम, टेलिफोन, आय. टी. क्षेत्रातील अभियंत्यांना या विषयाच्या विविध पैलूंचं लेखन सहज करता येईल. शिक्षण, आरोग्य, कुपोषण, दारिद्र्य, शेती-भूविकास, लघुउद्योग, कृषी उद्योग अशा अनेक क्षेत्रांवर फारसं माहितीपर लेखन झाले नाही. तेथे लेखनाला बराच वाव आहे आणि वाचकांना ते हवं आहे.

ललित लेखनाचा हेतू माणूस अधिक जाणणे व इतरांचं जगणं पाहून अनुभवसमृद्ध होणं हा आहे. त्यामध्ये शासकीय कर्मचारी नक्कीच मोलाची भर टाकू शकतील. मुख्य म्हणजे ललित साहित्य वाचून ते काम करताना समोरच्या माणसाचे प्रश्न अधिक संवेदनशीलपणानं जाणू शकतील आणि त्यांचं निराकरण करू शकतील. ललितेतर लेखनानं कर्मचारी-अधिकारी अधिक अभ्यासू व बहुश्रुत होतील. त्याच्या लेखन-वाचनानं आपलं काम ते अधिक चांगलं करू शकतील व राष्ट्र-समाजाच्या प्रगतीसाठी भरीव योगदान देऊ शकतील! त्यामुळे तुम्ही कर्मचारी असा किंवा वाचक, तुम्हांला उत्तम रीतीनं आपलं शासकीय काम करताना त्याचा जरूर फायदा होईल. आणि तुमचं-आमचं काम अधिक उत्तम झालं तर समाज व राष्ट्राचा फायदा होणार आहे. यासाठी हे संमेलन तुम्हां आम्हां अधिकारी-कर्मचाऱ्यांना प्रेरणा देवो!

आता माझ्या अध्यक्षीय भाषणाच्या दुसऱ्या पैलूकडे वळतो. तो पैलू आहे वाचनसंस्कृतीचा. आपण सारे उच्चविद्याविभूषित कर्मचारी-अधिकारी आहोत. आपला पगार चांगला आहे. त्यामुळे आपण स्वत:ची ग्रंथसंपदा वाढवली पाहिजे. प्रत्येकानं

आपली स्वत:ची किमान शे-पाचशे ग्रंथांची लायब्ररी तयार केली पाहिजे.

आपण नाटक-सिनेमासाठी, सहलीसाठी व हॉटेलिंग-पार्ट्यांसाठी वेळ काढतो. तसाच वाचनासाठी जाणीवपूर्वक वेळ काढायला शिकलं पाहिजे. कारण वाचन ही सुसंस्कृत माणसाची खूण आहे. आपल्या उच्च शिक्षणाला वाचनाच्या व्यासंगाची जोड मिळाली तर आपण अधिक कार्यक्षम कर्मचारी-अधिकारी होऊ शकू, यावर माझा नितांत विश्वास आहे.

वाचन का करायचं? एक तर इतर कुठल्याही भौतिक आनंदापेक्षा वाचन आणि ज्ञानसंपादन हा उच्चतर श्रेष्ठ बौद्धिक आनंद आहे. प्रत्येकाचं जीवन हे तसं चाकोरीबद्ध असतं. पण वाचनाच्याद्वारे एकाच जन्मात आपण अनेक जन्मांचे अनुभव कल्पनेनं अनुभवू शकतो. कधी आपण वाचताना शिवाजी महाराज होतो, तर कधी गौतम बुद्ध. कधी सिंदबाद होतो तर कधी राजपुत्र, कधी नायक तर कधी खलनायक. माणूस हा जसा उदात्त सुसंस्कृत आहे, तसाच तो स्खलनशील व क्रूर पण आहे. ही जाणीव पुस्तके देतात, त्यातून माणूस हा अधिक कळतो, त्यामुळे काम करताना तुम्हा-आम्हास त्याचा फायदा होतो. ज्या सामान्य माणसांच्या कामासाठी आपली नेमणूक आहे, त्यांची कामे सहृदयतेने करण्यासाठी मनाची संवेदनशीलता हवी ती, वाचनामुळे वाढते. त्यामुळे आपणां सर्वांना वाचनाची सवय लावून घेतली पाहिजे, असं माझं आग्रहाचं प्रतिपादन आहे.

शेवटी तुमच्या-माझ्या कामाच्या व प्रतिमेच्या संदर्भात माझं चिंतन जाहीरपणे तुमच्यासमोर ठेवणार आहे. थोर समाजसेवक अण्णा हजारेंच्या आंदोलनामुळे भ्रष्टाचाराचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. इतरांचं जाऊ द्या, आपल्या प्रशासनातल्या, नोकरशाहीच्या भ्रष्टाचारावर आपण कधी एकत्र येऊन चर्चा, चिंतन करणार आहोत की नाही? आवाज उठवणार आहोत की नाही? सहाव्या वेतन आयोगाच्या निर्णयानंतर आपल्या सर्वांचे वेतनमान आकर्षक झाले आहे. त्यामुळे एक पैचाही भ्रष्टाचार न करता आपण चांगलं जीवन जगू शकतो. मग हा भ्रष्टाचार का? तो रोखण्यासाठी आपण प्रयत्न करणार आहोत की नाही? या प्रश्नांचा गांभीर्याने व पुरेशा सजगतेनं विचार करण्याची वेळ आली आहे. वरिष्ठांनी ठरवलं तर आपल्या विभागातला भ्रष्टाचार नियंत्रित करणं सहज शक्य आहे. तसेच कर्मचाऱ्यांनी 'व्हिसल-ब्लोअर' होत खात्यातला भ्रष्टाचार वरिष्ठांपुढे उघड केला पाहिजे. त्याला आता कायद्याने संरक्षण आहे. पुन्हा वेळकाढूपणा न करता प्रशासन पारदर्शी करणं म्हणजे भ्रष्टाचार कमी करणं होय. त्यासाठी माहितीच्या कायद्याच्या तरतुदीप्रमाणे सर्व माहिती खुली-जाहीर करणं, ती वेबसाईटवर टाकणं तसंच आय.टी. चा वापर करीत पारदर्शी प्रशासन केले तर भ्रष्टाचारावर नियंत्रण मिळवणं सहज शक्य आहे. त्यासाठी शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेतला पाहिजे आणि त्याची सुरुवात स्वत:पासून केली पाहिजे. मी भ्रष्टाचार

करणार नाही व इतरांना करू देणार नाही. माझ्या रास्त कामासाठी कुणी मला पैसा मागितला तर त्याला पकडून देईन. मुख्य म्हणजे तो मी कधीच देणार नाही. माझं काम होण्यासाठी थोडा वेळ लागला तरी चालेल; पण मी 'स्पीड मनी' चा भ्रष्ट मार्ग वापरणार नाही, असं आपण ठरवलं पाहिजे.

आपण समाजाचे एक महत्त्वाचे उपयुक्त व अपरिहार्य असे घटक आहोत याचे भान ठेवून आपले काम व वर्तन हे उच्च नैतिक दर्जाचे ठेवले पाहिजे. हा काही भाबडा आशावाद नाही. मी काही अप्राप्य अशी गोष्ट अपेक्षित नाही; तर ही जाणीव करून देत आहे की हे आपले घटनात्मक कर्तव्य आहे.

आपल्याला आता उद्याच्या सुंदर भारतासाठी बदलाचे भागीदार व्हायचे आहे. जो बदल मला जगामध्ये अपेक्षित आहे, तो बदल प्रथम मी स्वत:मध्ये घडवून आणला पाहिजे.

हे आपणच का करायचे असाही कुणी प्रश्न विचारेल.

माझे उत्तर आहे की, आपण सुदैवी आहोत. कारण शिक्षण, पूर्ण आयुष्याची हमी देणारी सुरक्षित नोकरी व समाजाच्या लेखी मान्यता प्राप्त झालेल्या मूठभरातले आपण आहोत. पण तरीही आपण जनसेवक आहोत. पीपल्स सर्व्हंट आहोत. जनतेची सेवा करणं हा आपला धर्म आहे. तो मनापासून निभावला पाहिजे. तो कसा निभावता येईल? त्यासाठी महात्मा गांधींनी दिलेला जादूचा ताईत-तलिस्मात मी तुम्हांला देतो. ते असं म्हणत की, जेव्हा तुम्ही संभ्रमावस्थेत असाल, तेव्हा भारतातला तळागाळाचा गरीब माणूस नजरेसमोर आणा. आणि स्वत:ला विचारा की, माझ्या कृतीमुळे त्याच्या जीवनात काही फरक पडणार आहे का? चांगला फरक पडणार असेल तर तुमचं काम चांगलं, जर फरक पडणार नसेल किंवा वाईट फरक पडणार असेल तर ते चुकीचं काम आहे असं समजा. ते कधीच करू नका आणि ते चुकीचे काम कधीच कायदेशीरपण असणार नाही...

मित्रहो, महात्मा गांधींचा विचार एवढा परिपूर्ण आहे की, तो सतत प्रेरणा देत राहील. तो जमेल तेवढा आचरा. तुमचं जीवन सफल होईल आणि समाजालाही त्याचा फायदा होईल! त्यांच्या प्रिय भजनाप्रमाणे तुम्ही 'पीड पराई' जाणणारे 'वैष्णव जन' व्हा.


❐

लक्ष्मीकांत देशमुख
बी-२, श्रीनिवास गार्डन, केदारनाथ मंदिराजवळ,
मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५.
मोबाईल : ९३२५२९७५०९

नवे कोरे

# शत्रूशी दोन हात

मूळ लेखक
**मोआइझम बेग**
सह लेखिका
**व्हिक्टोरिया ब्रिटन**




अनुवाद
**योगिनी वेंगुर्लेकर**


४००रु. पोस्टेज ३०रु.

ग्वांटानामो बे मधील छावण्यांमध्ये जे नऊ ब्रिटिश नागरिक डांबले गेले होते, त्यापैकी मोआइझम बेग हे एक होते.
जो गुन्हा त्यांनी केलाच नव्हता आणि
ज्या गुन्ह्यांचं नेमकं स्वरूप कधीही स्पष्ट झालं नाही,
त्यासाठी त्यांना तिथे डांबून ठेवण्यात आलं.
९/११च्या हल्ल्यानंतर जे एक
वातावरण तयार झालं, त्या काळात पाकिस्तानमधे तात्पुरतं राहात असताना त्यांचं अपहरण करण्यात आलं.
मोआइझम बेग तीन वर्षं तुरुंगात राहिले.
यातला बराच मोठा काळ एकांतवासात गेला.
तिथे डांबलेल्या दोघांचे खून झाले त्याचे
ते प्रत्यक्षदर्शी साक्षीदार होते. त्यांना
मृत्यूच्या धमक्या दिल्या गेल्या तसंच भयंकर छळालाही सामोरं जावं लागलं.
२००५ साली कुठल्याही प्रकारचं स्पष्टीकरण वगैरे न देता किंवा त्यांची माफी न मागता त्यांची सुटका करण्यात आली.

# पुस्तक परिचय

**शस्त्रक्रिया, रेडिओथेरपी, केमोथेरपी, वेदनाशामके, वगैरेंच्या आत्यंतिक वापरामुळे आपण आपल्या शरीराच्या नैसर्गिक हीलिंग पॉवरकडे साफ दुर्लक्ष करतो.**

## कॅन्सर रोखू या




**डॉ. डेव्हिड सर्व्हन-श्रायबर / अनु. वन्दना अत्रे, डॉ. चंद्रकांत संकलेचा**

'ॲन्टी-कॅन्सर : ए न्यू वे ऑफ लाइफ' हे डॉ. डेव्हिड सर्व्हन-श्रायबर यांचे पुस्तक इ.स.२००७ मध्ये प्रकाशित झाले.

फिजिशिअन आणि शास्त्रज्ञ म्हणून कार्यरत असणाऱ्या डॉ. डेव्हिन यांना एके दिवशी स्वत:लाच मेंदू कॅन्सर असल्याचे निदान झाले आणि कॅन्सर पेशंट म्हणून प्राप्त परिस्थितीला सामोरे जावे लागले. परंतु या आजाराची वाच्यता करण्याचे त्यांनी टाळले. या रोगाशी संबंधित साहित्य वाचून, सहकारी तज्ज्ञ आणि रुग्ण यांच्याशी चर्चा करून स्वत:वरच काही प्रयोग तसेच उपचार केले. आपल्या कौशल्यांचा वापर करीत काही आडाखे बांधले.

कॅन्सरशी लढण्यासाठी आपल्या शरीरातील नैसर्गिक प्रतिकारशक्ती सशक्त, सक्षम, करता येते; पोषक आहार घेऊन शरीर व मन यांचे नाते नीट जाणून घेऊन ती वाढवता येते. कॅन्सर संदर्भातील असहायतेची भावना प्रबळ असेल तर नकारात्मक परिणामात भर पडते. त्या उलट पत्नी-मुले-मित्र यांचे प्रेम आणि आयुष्यात समाधानाची भावना,यांचाही कॅन्सरवर उपचार म्हणून उपयोग होऊ शकतो असे डॉ. डेव्हिड यांना प्रयोगान्ती आढळून आले.

प्लम-पीच सारखी फळे, ऑलिव्ह ऑइल, ग्रीन टी, अकॅशियाचा मध, नारळाची साखर, व्हिटॅमिन डी-३ वगैरेंचा आहारात वापर केला तर तोही औषधासारखा उपयुक्त ठरतो; असे त्यांना दिसून आले.

या आपल्या निरीक्षणांवर आधारित एक पुस्तक त्यांनी लिहिले. त्याच्या दहा लाखावर प्रती विकल्या गेल्या. ३५ भाषांमध्ये अनुवाद झाले. त्याची सुधारित आवृत्ती निघाली. त्या आवृत्तीत मोबाईल, पॉलिकार्बोनेट प्लॅस्टिक (बिसफेनॉल ए), बेकरी उत्पादनांमधील असेंद्रीय फॉस्फेट, रेड वाइन, वगैरेंचा कॅन्सरशी असणारा संबंध यावरचे नवे संशोधन समाविष्ट केले गेले. कॅन्सरच्या प्रतिबंधासाठी 'स्वभूमी' या संकल्पनेची उपयुक्तताही लक्षात आली. **निद्रितावस्थेतील कॅन्सर पेशींना रोखणारी शरीराची नैसर्गिक प्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी स्वभूमी- म्हणजे आपले शरीर-सुदृढ करणे आवश्यक आहे असे त्यांना आढळून आले.** 'कॅन्सर' विषयक एक नकारात्मक, नैराश्याचा संदेश, रुग्णाच्या मनाचा ठाव घेतो आणि तो त्याची लढण्याची क्षमता कमकुवत करतो. खरे तर या भीतीमुळे स्वत:ला कॅन्सरपासून वाचविण्याची आणि कॅन्सरशी लढण्याची क्षमता कमकुवत होते. **वस्तुतः स्वत:ला कॅन्सरपासून वाचविण्याची आणि तो आपापल्या मार्गाने बरे करण्याची क्षमता आपल्याकडे, प्रत्येकाकडे असते.** पण निराशात्मक विचारांच्या आणि भयाच्या आहारी जाऊन ती क्षमता प्रभावीपणे वापरण्याची इच्छाच आपण सोडून देतो.

डॉ. डेव्हिड यांच्या 'ॲन्टीकॅन्सर' या पुस्तकाचा अनुवाद पत्रकार वंदना अत्रे

यांनी केला आहे. त्या स्वत:च कॅन्सरच्या अनुभवातून गेलेल्या असल्याने या अनुवादातील शब्दाशब्दांत कळकळ, तळमळ, आणि आस्था जाणवते. अनुभवामुळे अनुवादाला भावनात्मक अधिष्ठान लाभले आहे. वैद्यकीय तपशील आणि परिभाषा अचूक असावी म्हणून डॉ. चंद्रकांत संकलेचा यांनाही वंदना अत्रे यांनी अनुवाद प्रक्रियेत सामील करून घेतले. त्यामुळेही अनुवाद ऑथेन्टिक, विश्वासार्ह झाला आहे असे म्हणता येईल. डॉ. संकलेचा यांनी ''या पुस्तकाने मला नवे शिकवले'' असे म्हटले असून कॅन्सरला आधुनिक जीवनशैली मोठ्या प्रमाणात जबाबदार आहे, या मताला पुष्टी दिली आहे.

''एका हातात आधुनिक उपचार आणि दुसऱ्या हातात मानसिक संतुलन शिकवणारी पारंपरिक भारतीय शिकवण या दोघांचा मेळ घातल्यास कॅन्सरशी सामना करणे तुलनेने सोपे जाते'' अशी दृष्टी हे पुस्तक देते असे मत ते व्यक्त करतात. एमआरआय तंत्रज्ञान वापरून मेंदूच्या कार्याबद्दल थेट मानसरोगशास्त्रातील एक नवा सिद्धान्त मांडण्याच्या दिशेने डॉ. डेव्हिड श्रायबर आणि जोनाथन यांचे पीटर्सबर्ग येथे संशोधन चालू होते.

डॉ. डेव्हिड हे स्वत:च्याच मेंदूच्या पुढच्या टोकाला एमआरआय स्कॅनरद्वारे उद्दीपित करण्यासाठी आवश्यक ती मानसिक कामे करीत होते. परंतु अपेक्षित रचनादर्शक प्रतिमा मिळत नव्हत्या, तेव्हा त्यांचा सहकारी जोनाथन म्हणाला, ''डेव्हिड, या प्रतिमांमध्ये काहीतरी गडबड आहे. हे काम पुन्हा करावे लागेल.'' डेव्हिडच्या मेंदूच्या टोकाकडील भागाच्या उजवीकडे अक्रोडाच्या आकाराची एक गाठ दिसत होती. ही गाठ कॅन्सरची होती हे कळताच स्वत: डॉ. डेव्हिड एकदम हवालदिल होतात. इतरही काही डॉक्टर्सच्या केसेस त्यांना आठवतात. कॅन्सर झालेले निम्मे रुग्ण आठ महिन्यात दगावतात, तर निम्मे रुग्ण आठ महिन्यांपेक्षा जास्त काळ - अनेक वर्षे- जगू शकतात ही आकडेवारी मात्र त्यांना आश्वासक वाटते. हार्वर्ड विद्यापीठातील डॉ. स्टीफन गोल्ड यांनी या आकडेवारीवर 'द मेडियन इज नॉट मेसेज' हा निबंधही लिहिलेला आहे.

आपल्याला ब्रेन कॅन्सर झाला आहे हे कळताच डॉ. डेव्हिड यांना धक्का बसतो आणि मृत्यूच्या शंकेने ते अस्वस्थ होतात.

मृत्यू समीप आल्याची जाणीव त्यांच्या मानसिकतेत कायापालट घडवून आणते. शस्त्रक्रिया करणे हा एक मार्ग असतोच, परंतु जीवनविषयक दृष्टिकोनातही बदल होतो. बुद्ध आणि येशूख्रिस्त हे कालबाह्य झालेली नीतिमत्ता शिकवणारे गुरू किंवा मध्यमवर्गीयांचे नैतिक दमन करणारे दलाल आहेत असे त्यांचे मत होते.

कॅन्सरवरील वेगवेगळ्या पुस्तकांचे त्यांचे वाचन चालूच होते.

शस्त्रक्रियेनंतर ते पूर्ववत प्रॅक्टिस करू लागले. परंतु आता वैद्यकीय सेवा

म्हणजे रुग्णाला वाचवण्याची एक संधी असे त्यांना वाटू लागले. अशी संधी देऊन हे रुग्ण आपल्यालाच उपकृत करीत आहेत, आपल्या जीवनाला अर्थपूर्ण करीत आहेत, आपल्या आयुष्यात आनंद आणत आहेत असे त्यांना जाणवू लागले. आयुष्य क्षणभंगुर आहे; परंतु माणूस म्हणून परस्परांशी जोडले जाण्यात जीवनाचे सार्थक आहे, अशी प्रचीती येऊ लागली. आपल्याला दुसरा जन्म लाभला आहे, आपल्याला सेवेचा आनंद मिळत आहे, आपले आयुष्य सत्कारणी लागत आहे अशी अनुभूती दैनंदिन जीवनात त्यांना मिळू लागली.

डॉ. डेव्हिड श्रायबर यांच्या पुस्तकातील विवेचनाची महत्ता या पार्श्वभूमीवर अधिकच प्रभावी आणि परिणामकारक ठरते.

कॅन्सरचा दुबळेपणा, कॅन्सरविरोधी वातावरण, कॅन्सर उलटण्याचे धडे, कॅन्सरविरोधी आहार आणि अन्न, कॅन्सरविरोधी मन, कॅन्सरविषयक भीतीशी मुकाबला, कॅन्सरविरोधी शरीर, कॅन्सरला वाढीसाठी लागणारी योग्य अशी भूमी मिळू नये म्हणून आपल्या स्वभूमीत (आपल्या देहभूमीत) घडवून आणायचे बदल, अशा प्रकरणांद्वारे कॅन्सर एकतर होऊच नये आणि झालाच तर कोणती दक्षता घ्यावी याबद्दलचे अनुभवसिद्ध ठोकताळे या पुस्तकात देण्यात आले आहेत. त्यांचा सारांश निष्कर्ष या छोटेखानी प्रकरणात देण्यात आला आहे. हे प्रकरण पुन:पुन्हा पारायण करावे असे आहे.

त्यातील विवेचन तीन मुख्य सूत्रांवर आधारलेले आहे.

१. स्व-भूमीचे महत्त्व.

२. स्व-जागृतीचा परिणाम.

३. नैसर्गिक शक्तींचा समन्वय.

आपण ज्या पृथ्वीवर राहतो ती पृथ्वी, तिच्यावरचा निसर्ग हा दिवसेंदिवस प्रदूषित होत आहे. या प्रदूषणामुळे आपण आजारी पडणे हे स्वाभाविक किंवा अटळ आहे. खरे तर आजारी पडू नये आणि आजारी पडल्यास कसे सावरावे यासाठी काही पथ्ये पाळणे आवश्यक आहे. **''आधुनिक वैद्यकशास्त्राच्या प्रचंड यशाचे आपण सर्वजण बळी आहोत,''** असे एक धक्कादायक पण वस्तुनिष्ठ, परखड विधान डॉ. डेव्हिड यांनी केले आहे.

शस्त्रक्रिया, रेडिओथेरपी, केमोथेरपी, वेदनाशामके, वगैरेंच्या आत्यंतिक वापरामुळे आपण आपल्या शरीराच्या नैसर्गिक हीलिंग पॉवरकडे साफ दुर्लक्ष करतो. ''डॉक्टर आणि त्याचा रुग्ण या दोघांनीही आपल्या मानसिक आणि शारीरिक ऊर्जा (जोर-फोर्स) पूर्णपणे उपयोगात आणल्या तर हीलिंग पॉवरने वैद्यकशास्त्र खऱ्या अर्थाने शास्त्रीय होईल,'' असे डॉ. रेने ड्युबास या पर्यावरणवादी विचारवंताचे प्रतिपादन आहे त्यांना ते लक्षात घेण्याजोगे वाटते.

स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाची, शरीराची, मनाची किंमत आपल्याला कळत नाही.

त्यातील सौंदर्याची जाणीव आपल्याला होत नाही. एखाद्या बाळाची घ्यावी तशी काळजी आपण आपल्या शरीराची, मनाची, व्यक्तिमत्त्वाची घ्यायला हवी. आपल्या अस्तित्वाबद्दल, आपल्या आयुष्याबद्दल आपण संवेदनशील असायला हवे. आपल्या आयुष्याचे मोल किंवा सौंदर्य कळण्यासाठी आपण कॅन्सर होईपर्यंत थांबण्याची, वाट बघत बसण्याची गरज नाही. यासाठी प्रथम आपण आपल्या आहाराकडे लक्ष द्यायला हवे. योग्य तऱ्हेने वाढवलेल्या प्राण्यांपासून मिळालेले अन्नच खाण्याचे पथ्य आपण ठेवले पाहिजे. **कीटकनाशके, कृत्रिम खाद्य, रासायनिक खते वगैरे दूषित घटकांमुळे निकृष्ट व घातक अन्न खाऊन आपण अनेक प्रकारच्या व्याधींसाठी आपल्या शरीराची भूमी खुली करीत असतो.** कचराडेपो, कारखाने, नाले वगैरेजवळ राहणाऱ्या नागरिकांना प्रदूषित घटक असलेल्या पदार्थांचा जास्त त्रास होऊ शकतो.

**आपले शरीर ही एक प्रचंड कार्यक्षम यंत्रणा आहे. अनेक परस्पर संवादी कामे या यंत्रणेत चालू असतात; या संपूर्ण यंत्रणेत एक प्रकारचे संतुलन असते.** यातली एक गोष्ट बदलली तरी तिचे परिणाम सगळीकडे जाणवतात. आहार, व्यायाम, मानसिकता, इच्छा, आकांक्षा-यांच्यातील बदलाचे परिणाम विविध घटकांवर होतात. एका विभागातला बदल, प्रगती, जागृती ही आपोआप शरीराच्या इतर भागात जागृती घडवून आणते. ध्यान किंवा योग संपूर्ण शरीरावर परिणाम घडवतात. असंतुलित आहार नकोसा वाटू लागतो. जीवनशैलीतच बदल होतो.

कॅन्सरपासून बचाव व्हावा असे ज्यांना वाटते त्यांनी आपल्या आहाराबाबत काळजी घ्यायला हवी. त्या दृष्टीने अनेक प्रयोग डॉ. डेव्हिड यानी केले. त्याबाबत अनेक तक्ते देऊन काय खावे, काय टाळावे याबद्दल त्यांनी मार्गदर्शन केले आहे.

१. साखर आणि मैदा कमीत कमी खा. त्याऐवजी पर्यायी पदार्थ वापरा. (उदा. धिरडी, अनेक धान्यांचे पीठ, भाजणीचे थालीपीठ). साखरेचा वाढता वापर कॅन्सरला कारण ठरत आहे. पांढरी शुभ्र साखर पचायला जड असते. साखरेमुळे रक्तातील ग्लुकोजचे प्रमाण झपाट्याने वाढते. ते पचवण्यासाठी इन्शुलिन तयार होण्याचे प्रमाण वाढते. त्यातील आयजीएफ हा घटक पेशींना सूज आणतो. त्यामुळे गाठी तयार होतात. त्या गाठींमुळे कॅन्सरच्या पेशी वाढतात. म्हणून साखर आणि मैदा यांचा वापर कमीतकमी हवा.

२. सर्व प्रकारचे वनस्पती तूप बंद करा. ओमेगा-६ युक्त वनस्पतिजन्य तेल आपल्या आहारात जास्त वापरले जाते. ते कर्करोगाला गती देते.

३. साखर, कोंडाविरहित पांढरे पीठ, वनस्पती तेल (सोया, सूर्यफुल, मका) हे पदार्थ आपल्या आहारात नव्याने आले आहेत. ते ५६ टक्के कॅलरीज् पुरवतात.

**मानवी शरीराच्या जीन्समध्ये प्राचीन काळापासून फळे, कंदमुळे, मांस, अंडी हे पचविण्याचे भरपूर सामर्थ्य आहे. मैदा, साखर हे पदार्थ तेव्हा नव्हतेच.** या मानवनिर्मित पदार्थांमध्ये क्षार, फॅटी ॲसिड, प्रथिने, व्हिटॅमिन्स हे घटक जास्त प्रमाणात आहेत. ते कॅन्सरला मदत करणारे आहेत. ते टाळायला हवेत.

४. टाळायचे पदार्थ - साखर, गोड पाक, पांढरे प्रक्रियायुक्त पीठ, मैदा, तांदूळ, केक, पॅनकेक, बटाटे, मसूर, शेंगा, रताळे, घेवडा, कॉर्नफ्लेक्स, जाम, जेली, दारू, वाइन.

५. कर्बोदके कमी प्रमाणात असणारे पदार्थ भरपूर खावे- नैसर्गिक साखर, डार्क चॉकलेट, मिश्र धान्याची चपाती, पाव, कोनफळ, सुरण, कोंडायुक्त पीठ, फळे, चेरी, रासबेरी, लसूण, कांदा.

६. दूध आणि दुधातील बदललेले घटक स्थूलपणाला कारण ठरतात. गायींचे दूध वाढण्यासाठी त्यांना जे पदार्थ खायला देतात त्यात ओमेगा-६ युक्त वनस्पती तेलाचे प्रमाण जास्त असते. शिवाय इस्ट्रोजन आणि झेरोनॉल हार्मोन्स त्यांचे वजन वाढवण्यासाठी देण्यात येतात. ही हार्मोन्स प्राण्यांच्या चरबीत जमा होतात व दुधातही त्यांचे स्रवण होते. या हार्मोन्समुळे गायीच्या शरीरात आयजीएफ तयार होते. ते दुधात येते. त्यामुळे चरबीच्या पेशींची वाढ होते. कॅन्सरची वाढ होते.

७. मार्गारीन आणि हायड्रोजनयुक्त तूप आणि तेल यांचे आपल्या आहारातील प्रमाण १९६० नंतर वाढले. हृदयविकार, स्थूलपणा, कॅन्सर यांचा रक्तातील ओमेगा-६ या घटकांशी संबंध आहे हे इस्राइलचे आहारशास्त्रज्ञ इलियट बेरी यांनी दाखवून दिले.

८. प्रक्रिया केलेले अन्न (पिझ्झा, केक, पेस्ट्री, बिस्किटे, वेफर्स) हे त्यातील ट्रॅन्स फॅटस् मुळे सूज आणि दाह वाढवते. मांसाहार आणि दुग्धजन्य पदार्थांचा आहार यांचा थेट संबंध कॅन्सरशी आहे हे अनेक प्रयोगांद्वारे सिद्ध झाले आहे. भाजीपाला, कडधान्ये, वाटाणा खाणाऱ्यांमध्ये कर्करोगाचे प्रमाण कमी आढळते.

९. ज्यामुळे कॅन्सर होऊ शकतो असे अनेक पदार्थ चरबीत साठून राहतात. ते कॅन्सरला कारणीभूत ठरतात. स्तन, बीजांडे, प्रोस्टेट, मोठे आतडे, लिम्फ नोड हे जास्त चरबी साठवू शकणारे अवयव; त्यांच्या कॅन्सरचे प्रमाण जास्त दिसते.

१०. **कीटकनाशकांचा जास्त वापर करणाऱ्या पीकांचा वा फळांचा वापर टाळावा.** ऑरगॅनिक फूडला प्राधान्य द्यावे . केळी, संत्री, अननस, टरबूज, खरबूज, आंबा, पपई, कोबी, फ्लॉवर, टोमॅटो, कांदे, मुळा, बीट, वाटाणे, मनुके हे जास्त सुरक्षित असतात. तर सफरचंद, पीच, कलिंगड, द्राक्ष, बटाटे, पालक, काकडी इ. कीटकनाशकांचा जास्त वापर असणाऱ्या फळभाज्या टाळाव्यात.

डॉ. डेव्हिड सर्व्हन-श्रायबर यांनी आहार आणि कॅन्सर यांचा संबंध यावर प्रकाश टाकला आहे त्याचप्रमाणे आपले वातावरण, आपले मन आणि कर्करोग यांचा संबंध कसा असू शकेल याबद्दलही भाष्य केले आहे. आपले शरीर आणि आपले मन यांच्यामध्ये सुसंवाद हवा. आपण असहाय आहो, हतबल आहो असा न्यूनगंड असणाऱ्या व्यक्तीला कॅन्सरचा तडाखा जोरदार बसतो.

मानसिक स्थिती खचलेली असेल, लाचारीची भावना उदासीन करीत असेल तर शरीरात कॅन्सरचा शिरकाव सोपा होतो.

मन:स्वास्थ्य उत्तम असेल, मन आनंदी असेल तर कॅन्सरच्या पेशींची वाढ कमी होते. मानसिक ताणतणावामुळे शरीरात काही हार्मोन्स स्रवतात; ती शरीराची अत्यावश्यक सेवाकेंद्रे उद्दीपित करतात आणि कॅन्सरच्या गाठींच्या वाढीसाठी तसेच प्रसारासाठी पोषक वातावरण निर्माण करतात. शरीराची झीज भरून काढण्याची क्षमता, अन्नपचन क्रिया, रोगप्रतिकारक शक्ती यावर प्रतिकूल परिणाम करतात. रोगप्रतिबंधक शक्ती सज्ज असेल तर कॅन्सरशी ती टक्कर देऊ शकते. रुग्णाची इच्छाशक्ती तीव्र असेल तर कॅन्सरशी मुकाबला करणे सोपे जाते. श्वसनक्रिया, मंत्रपठण, ध्यानधारणा, योगासने यामुळे आपल्यातील शारीरिक ताल, लय यामध्ये एकात्मता आणि सुरेलपणा निर्माण होतो.

कॅन्सर या शब्दाच्या उच्चाराबरोबर मनात भीतीची भावना उत्पन्न होते. ही भीती मृत्यूची असते. मृत्यू अटळ आहे हे ठाऊक असूनही मृत्यूला सामोरे जाण्याची आपल्या मनाची तयारी नसते. कॅन्सर म्हणजे याक्षणी मृत्यू नाही; तर मृत्यूची छाया आहे. मृत्यू येईल तेव्हा येवो, त्याकडे ताठ मानेने बघत शांत मनाने आयुष्याचा निरोप घेता यावा अशी मानसिकता विकसित करायला हवी. मन:शक्ती वाढवत न्या. त्यासाठी सोपे व्यायाम करा. गट-समूहात सहभाग, हास्यविनोद-क्रीडा करमणूक, चित्रपट-नाटक कलास्वाद यात रस घ्या. आपले शरीर, आपण आणि आपली औषधे या तिघांनी मिळून संयुक्तपणे कर्करोगाशी सामना करायचा आहे हे लक्षात ठेवा.स्वभूमीचे महत्त्व, स्वजागृतीची ओढ आणि नैसर्गिक शक्तींचा समन्वय या तिघांची सांगड घातली तर आत्मज्ञानाचा प्रकाश तुमच्या जीवनाला उजळून टाकील.


मोबाइल फोनचा अतिवापर हा कॅन्सरचा धोका वाढवू शकतो याकडे शेवटी डॉ. डेव्हिड श्रायबर यांनी लक्ष वेधले आहे. फोन छातीजवळच्या खिशात ठेवू नका. झोपताना उशाशी ठेवू नका. त्याच्या रेडिओलहरी अपायकारक असतात.

कॅन्सरविषयक भीती दूर करणारे, जबरदस्त प्रभावी युक्तिवाद करणारे हे पुस्तक संग्रही ठेवून पुन:पुन्हा वाचण्याजोगे आहे. ❐

**किंमत : १८०रु.  सभासदांना : सवलतीत  पोस्टेज : २५रु.**

**नवे कोरे**

# वेदना आणि व्याधींसह चांगलं जीवन




मूळ लेखिका

**विद्यमाला बर्च**

अनुवाद

**डॉ. सुभाष दांडेकर**

२४०रु. पोस्टेज ३०रु.

'वेदना आणि व्याधींसह चांगलं जीवन' हे एक प्रेरणादायी आणि व्यावहारिक मार्गदर्शक पुस्तक आहे. सजगता आणि एका वेळी तेवढ्याच क्षणापुरतं जगणं यांद्वारे जुनाट वेदना आणि व्याधी कशा ताब्यात ठेवाव्यात, हे या पुस्तकात सांगितलं आहे.

पुरातन सजग ध्यानाची परिणामकारकता अलीकडच्या काळात जगन्मान्य झाली आहे. विशेषत: आरोग्य आणि तणाव यांबाबतीत वेदना आणि ध्यान या आपल्या वैयक्तिक अनुभवातून विश्वास देणाऱ्या या पुस्तकामध्ये विद्यमाला बर्च यांनी डॉ. जॉन कबाट-झिन आणि इतर यांचं काम पुढे नेलं आहे.

आरोग्याच्या कोणत्याही तक्रारींसह सजगतेने जगणं शिकल्यामुळे आत्मविश्वास, शहाणपण आणि दयाळूपणा कसा मिळतो, हे त्यांनी दाखवून दिलं आहे. विद्यमाला यांनी तयार केलेल्या अभ्यासक्रमाने हजारो व्याधिग्रस्तांना अधिक अर्थपूर्ण जीवन जगण्यास मदत केली आहे.

तुमच्या शरीराची शांत आणि सजग जाणीव प्रत्येक क्षणी निर्माण केल्यामुळे, वैफल्य आणि दु:ख नाहीसं करणं शक्य आहे, हे त्या दाखवून देतात.

जुनाट वेदना आणि व्याधी यांच्या दुय्यम आणि भावनिक परिणामांना योग्य रीतीने हाताळून तुम्ही अधिक सकारात्मक जगू शकता.

सहज करण्याजोग्या श्वसनाच्या पद्धती, सामर्थ्यशाली सजग ध्यानप्रकार, उपयुक्त आकृत्या आणि यांपासून फायदा झालेल्या व्यक्तींचे प्रेरणादायी अनुभव यांचा समावेश 'वेदना आणि व्याधींसह चांगलं जीवन' या पुस्तकात आहे.

व्याधिग्रस्तांनी हे पुस्तक वाचलंच पाहिजे.

# पुस्तक परिचय

**शंभरावर शास्त्रज्ञांची धावती ओळख करून देणारे महत्त्वपूर्ण संकलन**

# शास्त्रज्ञांचे जग




**निरंजन घाटे**

निरंजन घाटे यांचे विज्ञानविषयक लेखन गेली तीसपस्तीस वर्षे सातत्याने चालू आहे. मुख्यत: वृत्तपत्रांच्या आणि मासिकांच्या मागणीमुळे हे लेखन होत असल्याने त्याचे स्वरूप रंजनप्रधान आणि माहितीपूर्ण तसेच त्रोटक  आणि मुद्देसूद असते. फार खोलात जाऊन एखाद्या विषयाचा सर्वांगीण परिचय करून देण्याचा, पाठ्यपुस्तकाच्या अंगाने तपशीलवार विवेचन करण्याचा आटापिटा न करता लोकाभिमुख, पॉप्युलर, सर्वसामान्य वाचकांचे कुतूहल चाळवणारे चटपटीत विषय शोधून ते हलक्याफुलक्या शैलीत पेश करण्याचे कौशल्य वृत्तपत्रीय लेखन करणाऱ्याला आत्मसात करावे लागते. इंग्रजी वृत्तपत्रात आणि नियतकालिकात विज्ञानावर सहजसोप्या भाषेत प्रासंगिक विषयांवर झटपट लिहिणाऱ्यांना मोठी मागणी असते. विज्ञानातील चमत्कृतिपूर्ण घटना वा टॉपिक्स निवडून त्यावर प्रकाश टाकण्याचा, त्यामागची शास्त्रीय कारणपरंपरा उलगडून दाखवण्याचा प्रयत्न वाचकांनाही आकृष्ट करतो. कारण गेल्या काही वर्षात विज्ञानाच्या विविध शाखांमध्ये नवनव्या संशोधनाचे प्रकल्प मोठ्या प्रमाणावर राबविले जात आहेत. महाविद्यालये आणि विद्यापीठे, कारखानदार आणि उत्पादक, लष्कर आणि वाहतूकदार, संगणक-इंटरनेट सेवा पुरवठादार, विविध व्याधींवरच्या औषधांचे निर्माते, पदार्थांवर प्रक्रिया करणारे उद्योग हे सर्व  नव्या ज्ञानाच्या, नव्या तंत्रज्ञानाच्या शोधासाठी लक्षावधी डॉलर्स गुंतवत आहेत. पूर्वी  अमेरिका-यूरोपमध्ये बाजारात आलेले उत्पादन भारतासारख्या देशात यायला दहावीस वर्षांचा काळ सहज जात असे; आज हे अंतर जागतिकीकरणामुळे कमी होत चालले आहे. मोबाइलसारखे साधन दहा वर्षात भारतातील सत्तरऐंशी कोटी जनतेपर्यंत पोचू शकते; हे नव्या तंत्रज्ञानाचे एक प्रभावशाली उदाहरण आहे. विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रात आज द्रुतगतीने शोध लागत आहेत आणि त्याबद्दलच्या बातम्यांनी वृत्तपत्रे-नियतकालिकांची पानेच्या पाने आज भरलेली दिसतात. विज्ञानविषयक रंजक लेखन करणाऱ्या लेखकांना त्यामुळे प्रादेशिक भाषांमध्येही खूप महत्त्व आले आहे. प्रादेशिक भाषांमध्ये विज्ञानाची परिभाषा घडवण्याचेही काम या विज्ञानलेखनाद्वारे होत आहे.

निरंजन घाटे हे या प्रकारच्या विज्ञान लेखकांचे एक प्रातिनिधीक उदाहरण आहे.

विज्ञानक्षेत्रातील विविध शाखांमध्ये चाललेल्या घटनांचा मागोवा घेत, नवी परिभाषा घडवत, मराठी वाचकांची विज्ञानविषयक जिज्ञासा आणि जाणीव ते प्रज्वलित करीत आहेत. हे काम ते गेली चार दशके सातत्याने करीत आहेत; त्यातून त्यांची शंभरावर पुस्तके सिद्ध झाली आहेत. निरंजन घाटे हे मराठी विज्ञानतंत्रज्ञान लेखनक्षेत्रातले एक ब्रॅन्डनेम झालेले आहे.

'शास्त्रज्ञांचे जग' या त्यांच्या ताज्या पुस्तकात शंभरेक शास्त्रज्ञांचे अल्पपरिचय

संकलित केले गेले आहेत. गेल्या काही दशकात हे परिचय लिहिले गेले असल्याने आणि प्रासंगिक लेख किंवा दैनंदिन सदराचा मजकूर अशा स्वरूपात त्यांचे लेखन झाल्याने त्यात विविधता आहे. चरित्रकोशासारखी पद्धतशीर चौकट वा शिस्त त्यात नाही, तरीही शंभरेक शास्त्रज्ञ-संशोधकांची धावती ओळख हे या पुस्तकाचे एक आकर्षण निश्चितच मानावे लागेल. चरित्रकोशासारखे स्वरूप नसल्याने शास्त्रज्ञाची प्राथमिक माहिती (जन्म, शिक्षण, संशोधन कार्य, नवे शोध, कौटुंबिक तपशील, व्यक्तिमत्त्व, पुरस्कार, मान्यता, संशोधनाचे महत्त्व, पुढच्या संशोधनाला मिळालेली दिशा, संस्थात्मक कार्य, मृत्यू, मूल्यमापन) देण्याबाबत काटेकोरपणा नाही; काही परिचय तर पंधरावीस ओळीतच देऊन भागवले आहे. काही संशोधकांना चारपाच पृष्ठे मिळाली आहेत; त्यामुळे हे परिचय आपल्या मनात कुतूहल निर्माण करून, अधिक माहितीसाठी योग्य त्या संदर्भग्रंथांकडे जाण्यासाठी प्रवृत्त करतात.

शंभरेक संशोधकांचे, शास्त्रज्ञांचे परिचय एकत्र मिळणे हे या पुस्तकाचे एक वैशिष्ट्य आहे. आर्किमिडिज, थालेस, एंपेडोक्लेस यामध्ये गामा, कोपर्निकस, टायको बाहे, न्यूटन, मार्कोपोलो, ब्लेझ पास्कल वगैरे इ.स. पूर्वकाळ ते सतराव्या शतकातील व्यक्तींप्रमाणेच विक्रम साराभाई, कार्ल सागान, आर्थर सी. क्लार्क पर्यंतच्या व्यक्तींचा समावेश आहे.

शंभरेक व्यक्तींचे परिचय करून देताना कालानुक्रमे किंवा अकारविल्हे मांडणी वाचकांच्या दृष्टीने सोपी होऊ शकली असती. परंतु जसे लेख मिळाले तसेच ते छापून वाचकांनी कुठलेही पान उघडून वाचावे, मागचे पुढचे संदर्भ किंवा सूत्र लक्षात न घेता क्लाउड कॉम्प्युटिंग चा अनुभव घ्यावा अशी सोय साधली आहे.

संशोधकांचे परिचय देताना किंवा संशोधनाची माहिती देताना महत्त्वाच्या बाबींकडे घाटे वाचकांचे लक्ष वेधतात.

न्यूटनबद्दल ते दहा ओळीत पुढीलप्रमाणे माहिती देतात, ''न्यूटनने पडणारे सफरचंद पाहून गुरुत्वाकर्षणाबद्दल विचार सुरू केला, ही दंतकथा नसून सत्य आहे. मात्र न्यूटन झाडाखाली बसला असताना त्याच्या डोक्यात सफरचंद पडलं ही केवळ दंतकथा आहे. सफरचंद पडलं तेव्हा न्यूटन संध्याकाळच्या आकाशात चंद्रकोर पाहत होता. त्याचवेळी झाडावरून सफरचंद खाली पडलं. ज्या बलामुळं सफरचंद खाली पडलं तेच बल चंद्राला पृथ्वीभोवती फिरायला लावत असेल का हा विचार न्यूटनच्या मनात डोकावला, त्यामुळंच पुढं विज्ञान आमूलाग्र बदलून टाकणारे शोध न्यूटनच्या डोक्यातून कागदावर उतरले. एखाद्या किरकोळ गोष्टीनंसुद्धा शास्त्रज्ञाच्या मनातलं कुतूहल जागृत होतं. त्या घटनेमागचा कार्यकारण भाव शोधण्याचा तो

प्रयत्न करतो आणि त्यातून युगप्रवर्तक शोध लागतो तो असा!'' (२११)

मराठी बालवाचकांची कल्पनाशक्ती जागृत व्हावी आणि साध्या घटनेतूनही विश्वाचे गंभीर गूढ रहस्य शोधण्याचे युगप्रवर्तक कर्तृत्व आविष्कृत व्हावे याबद्दलची तळमळ या पुस्तकात सर्वत्र दिसून येते.

मायकेल फॅरडे याने बेंझिनचा शोध लावला. गंजविहीन पोलादाची प्रथम निर्मिती केली. विद्युत विघटनाचे आणि ध्रुवीकृत प्रकाशाच्या पातळीच्या चुंबकीय परिवलनाचे नियम सिद्ध केले. विद्युत प्रवर्तन (इंडक्शन) शोधून काढले. आधुनिक वास्तववादाचा पाया घातला. वगैरे वैशिष्ट्ये सांगून घाटे म्हणतात,''शालेय शिक्षण आणि गणिताशी संबंध न येताही फॅरडे याने कल्पनाशक्ती वापरून विद्युतीय आणि चुंबकीय शोध लावले, त्यासाठी सोप्या व अगणिती स्पष्टीकरणांचा वापर केला. अंत:प्रवृत्ती (इन्ट्युशन) आणि वैचारिक स्वातंत्र्य यांचा उपयोग करून महान कार्य करून दाखवले.''

१९८३ साली बार्बरा मॅकलिंटॉक हिला अनुवंशशास्त्रातील उड्या मारणाऱ्या गुणसूत्रांच्या संशोधनाबद्दल नोबेल पुरस्कार मिळाला. याबद्दलचे संशोधन तिने १९५३ मध्ये प्रसिद्ध केलेले होते. कॉर्नेल विद्यापीठात सशोधन करीत असताना मक्याच्या कणसांच्या रंगसूत्रांचा सूक्ष्मदर्शक यंत्राखाली अभ्यास करून बार्बराने मक्याच्या दाण्यावरील चित्रविचित्र ठिपक्यांची कारणे शोधून उत्परिवर्तनाची व्याप्ती जाणून घेऊन डिटरमिनेशन इव्हेंटचा सिद्धान्त मांडला. या संशोधनाला त्यावेळी कोणी फारसे महत्त्व दिले नाही. तीस वर्षांनी त्याचे महत्त्व जाणत्यांना कळले. बार्बराला नोबेल पुरस्कार देण्यात आला. घाटे म्हणतात, ''खरे सोने मातीत पडले तरी त्याची झळाळी लपत नाही असेच बार्बराच्या संशोधनाबाबत म्हणता येईल. निष्काम कर्मयोगाचे बार्बरा हे एक उत्तम उदाहरण आहे.''

निरनिराळ्या संशोधकाच्या आयुष्यातले गमतीदार किस्से, त्यांचे यश-अपयश, भाग्याचे चढउतार यावरही घाटे प्रकाश टाकतात. संगणक क्षेत्रातील आद्यपुरुष म्हणून ओळखला जाणारा चार्ल्स बॅबेज याने खगोलशास्त्रीय गणित आणि दिशादर्शन यासाठी आकडेमोड करणारे यंत्र तयार करण्यासाठी ब्रिटिश सरकारची मदत घेतली. पण हे यंत्र कधीच पूर्ण झाले नाही. २३ हजार पौंडांचा खर्च होऊनही यंत्र अपूर्णच आहे हे बघून सरकारने मदत देण्याचे थांबवले.पुढे बॅबेजचे निधन झाले. (१९७१) त्याचा तो संगणक खोलीएवढा मोठा होता. तो केनसिंग्टनच्या म्युझियममध्ये ठेवला आहे. त्याच्या या संगणकाने आजच्या छोट्या संगणकाचा मार्ग खुला करून दिला. कवी बायरनची कन्या लेडी ॲडा लव्हलेस हिने बॅबेजला बरीच मदत केली.

तिच्या या निरपेक्ष मदतीसाठी आद्य संगणकी भाषेला ॲडा असे नाव देण्यात आले.

बेंजामिन फ्रँकलिनने (जन्म १७०६) विद्युत प्रवाहाचे संशोधन करून वीजेपासून उंच इमारतींचे संरक्षण करण्यासाठी संरक्षकाची कल्पना विकसित केली. १७५७ मध्ये इंग्लंडला जाऊन त्याने राजकीय प्रतिनिधी म्हणून अमेरिका-इंग्लंडच्या संबंधात सहकार्याचे पर्व सुरू केले. अमेरिकन क्रांतीबाबत फ्रान्समध्ये जाऊन पाठिंबा मिळवला. १७८६ पर्यंत तो फ्रान्समध्ये राहिला. परतल्यावर पेनसिल्व्हानिया राज्याचा अध्यक्ष झाला. तीन वर्षांनी स्वेच्छेने निवृत्त झाला. १७९० मध्ये त्याचे निधन झाले. अमेरिकेच्या विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्राचा पाया घालण्याचे श्रेय त्याला देण्यात येते.

अशा माहितीच्या वैपुल्यामुळे या पुस्तकाचे वाचन सुखद होते.


वृत्तपत्रीय तगाद्यामुळे हे लेखन झालेले असल्याने त्याचे संपादन किंवा माहितीचे अचूकपण हे काळजीपूर्वक तपासून घेणे श्रेयस्कर ठरेल. निकोला टेस्लाचा जन्म कुठे झाला याबद्दल पृष्ठ १६, आणि १८ वर आलेले उल्लेख वाचकांच्या गोंधळात भर टाकतील. पृष्ठ १६ वर म्हटले आहे,''... जन्म पूर्व युरोपात आता झेकोस्लोव्हाकिया आणि युगोस्लाव्हिया मधून विभागलेल्या सैबेरियात झाला.'' सैबेरिया रशियात आहे. त्याच्याऐवजी सर्बिया असे हवे. टेस्लाचे कुटुंब सर्बियामधले पण क्रोएशियामध्ये त्याचे वास्तव्य होते; परंतु तो तेथे जन्मला तरी स्वत:ला क्रोएशियन म्हणवून घेत नसे. पृष्ठ १८ वरच ''११जुलै १८५६ रोजी क्रोएशियात जन्मलेला हा शास्त्रज्ञ जानेवारी १९४३ मध्ये न्यूयॉर्कमध्ये मृतावस्थेत सापडला'' असे वाक्य आले आहे. न्यूयॉर्कमधील न्यूयॉर्कर हॉटेलमध्ये तो दीर्घकाळ राहत होता. तब्येत बरी नसल्याने रूमबाहेर डू नॉट डिस्टर्बचा बोर्ड लावून तो झोपला. चार दिवसानंतर त्याच्या मित्राच्या आग्रहाने दरवाजा उघडण्यात आला तेव्हा तो मृतावस्थेत आढळला. आदल्या दिवशीच त्याचे निधन झाले, असे डॉक्टरांनी सांगितले. 'न्यूयॉर्कमध्ये मृतावस्थेत सापडला' हे विधान त्यामुळे गैरसमज निर्माण करते.

रंजक विज्ञानशैलीमुळे वाचनीय ठरलेल्या अशा पुस्तकांमध्ये तपशीलाबाबत काटेकोरपणा हवाच. कुठे कुठे त्याबाबत कमतरता असली तरी एकूण शास्त्रज्ञांचे जग गुंतवून ठेवणारे आहे.

❐

**किंमत : २००रु. सभासदांना : सवलतीत पोस्टेज : ३०रु.**

**नवे कोरे**



# सेक्रेड हार्ट्स

मूळ लेखक
**सारा ड्युनांट**

अनुवाद
**सुनीति काणे**

४००रु. पोस्टेज ३०रु.

१५७० साल. इटलीतील एक बेनेडिक्टीन मठ.
त्या मठात जोगीण म्हणून इच्छेविरुद्ध डांबली गेलेली
एक उच्चकुलीन, देखणी, तरुण, बंडखोर युवती.
मठातून निसटून आपल्या प्रेमिकाशी विवाह करण्यासाठी ती
हजार हिकमती लढवते परंतु मठातील राजकारणामुळे
तिच्या प्रयत्नांमध्ये विघ्नं येतात.
पाकळीपाकळीनं उमलत उत्कंठा वाढवत नेणारं कथानक तुम्हाला
सोळाव्या शतकातील इटलीच्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक
पार्श्वभूमीचं यथार्थ दर्शन घडवून मंत्रमुग्ध करेल.
देवतार्पण झालेल्या जोगिणींची 'सेक्रेड हार्ट्स'–
पवित्र अंत:करणं– कशी राजनैतिक खेळी खेळतात
ह्यात गुंगलेला वाचक कादंबरीच्या अनपेक्षित
सुखान्त समारोपानं हर्षोत्फुल्ल होईल.
वेगळ्या विषयावरील अनोखी कादंबरी!

# पुस्तक परिचय

**सर्व सामान्यांचा ‘आवाज’ बनून त्यांच्या जीवनात परिवर्तनाची पहाट जागवणाऱ्या उत्तर प्रदेशातील एका भारतीय स्त्रीचं प्रांजळ आत्मकथन**

## मी संपत पाल




**ॲनी बरथॉड / अनु. सुप्रिया वकील**

उत्तर प्रदेशातील असहाय, वंचित महिलांची 'गुलाबी गँग' स्थापन करून संपत पाल या धनगर महिलेने रेशनवर धान्य पुरवठा नियमित होणे, सरकारी योजनांचा लाभ महिलांना मिळणे यासाठी आंदोलन उभारून अधिकाऱ्यांना जेरीस आणले. तिची जीवन कहाणी विलक्षण आहे.

भारतातील नोकरशाही खूप नाठाळ आणि चलाख आहे. स्वातंत्र्य संग्रामात जनतेच्या मनात ज्या स्वप्नांचे बीजारोपण केले गेले, त्यांची पूर्तता करण्याऐवजी या नोकरशाहीने स्वातंत्र्योत्तर काळातील बहुविध जनकल्याणाच्या योजनांचा फायदा त्या त्या समाज घटकांपर्यंत पोचवण्याऐवजी झारीतले शुक्राचार्य बनून स्वत:च्या आर्थिक सुबत्तेसाठी करून घेतला. अनुदानाच्या योजनांमधील पैसा भ्रष्टाचार आणि काळा बाजार या मार्गाने स्वत:ची घरे भरण्यासाठी वापरला. समाजवादी समाजरचना हे नेहरू सरकारचे धोरण, त्याचा पार धुव्वा उडवून लायसेन्स-परमिट राज्याची बंदिस्त चौकट नोकरशाहीने निर्माण केली आणि आपले पद तसेच अधिकार कुठल्याही जनहिताच्या योजनेला खीळ घालण्यासाठीच वापरण्याचे एक अडवणुकीचे तंत्र विकसित केले. या तंत्रामुळे भ्रष्टाचाराशिवाय शासकीय काम न होण्याची कडेकोट व्यवस्था उभी केली गेली. इंदिरा गांधी यांच्या आणीबाणीच्या घोषणेने या नोकरशाहीच्या अरेरावीला अधिक सार्वत्रिक कुरण उपलब्ध झाले. बॅ. अंतुले यांच्यासारख्या आमदार-खासदार नेत्यांना या नोकरशाहीने आपल्या कार्यपद्धतीची दीक्षा देऊन परस्पर हिताची नवी व्यूहरचना करून अधिकाराचा सरसहा वापर निवडणूक निधी संकलनासाठी करण्याची मानसिकता पक्की केली. सत्ताधारी काय किंवा विरोधी पक्षीय पुढारी-कार्यकर्ते काय, आपल्या नेतेगिरीची, आपल्या उपद्रवशक्तीची किंमत खंडणीच्या रूपात वसूल करण्याची अलिखित सनदच मिळाल्यासारखे वावरू लागले. सायकलदेखील न घेऊ शकणारा 'पुढारी' नगरपालिकेत निवडून आला तरी पाच वर्षांत पाचदहा कार्सचा ताफा घेऊन हिंडू लागला; शेकडो एकराच्या भूखंडांचा मालक बनू लागला. इमारतीला परवानगी देताना एक फ्लॅट आणि एक गाळा माझा - अशी अट घालू लागला. जेथे जेथे खरेदी असेल, कामाचे टेंडर काढायचे असेल, नोकरी देणे वा बदली करण्याचे काम असेल, कुणाला सब्सिडी द्यायची असेल, एखादी योजना राबवायची असेल तर नगरसेवक आणि नोकरशाही यांचा वाटा बिनबोभाट पोचवण्याचा प्रघात पडला. जनहितासाठी आखलेल्या कुठल्याही योजनेतील जेमतेम १५ टक्के रक्कम खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत पोचली तरी नशीब; ८५ टक्के रक्कम नगरसेवक, आमदार-खासदार, मंत्री आणि नोकरशाहीतील उच्चपदस्थ यांच्या बेनामी खात्यात भर टाकू लागली आणि ती स्विस बँकांपर्यंत हनुमान उड्या मारू लागली. किती लक्ष कोटी रुपये भारतातून स्विस बँकांत गेल्या ३०/४० वर्षांत जमा झाले आहेत, त्याचा हिशोब उद्यापरवा जाहीर झाला तर जनसामान्यांचे डोळे पांढरे होतील. जनतेची अडवणूक

करून गरजूंच्या न्याय्य हक्कांची पायमल्ली करणाऱ्या नेत्यांच्या आणि अधिकाऱ्यांच्या युतीच्या पापाचा घडा कधी भरेल कुणास ठाऊक, परंतु सर्वसामान्य लोकांमधूनच या भ्रष्टाचाराविरुद्ध, अन्यायाविरुद्ध संघर्ष करणारे स्त्री-पुरुष कार्यकर्ते आता जागोजाग निर्माण होऊ लागले आहेत आणि त्यांचा आवाज ऐकल्याशिवाय अधिकाऱ्यांना आता आपल्या खुर्च्या सांभाळून राखणे अधिकाधिक कठीण होत जाणार आहे.

संपत पाल या अल्पशिक्षित धनगर महिलेने उत्तर प्रदेशात शासकीय अधिकारी आणि काळाबाजारवाले व्यापारी यांचे पितळ उघडे पाडून, दडपशाहीला सोकावलेल्या भ्रष्ट अधिकाऱ्यांना वठणीवर आणले. तिच्या या कर्तृत्वाची पताका सोनिया गांधींपर्यंत पोचली. तिला तिकिट द्यायच्या दृष्टीने चाचपणी सुरू झाली. राहुल गांधींनी तिला दिल्लीला बोलावले तेव्हा या निर्भीड महिलेने परखडपणे म्हटले, ''त्यांना जर माझ्याशी बोलायचे असेल तर ते इकडे येऊ शकतात. मला दिल्लीला जायची गरज वाटत नाही. मला न भेटताही ते मला थेट मतदारसंघ देऊ शकतात. माझे कार्य त्यांना ठाऊक आहे. त्यासाठी भेटायला येण्याची गरजच काय?''

संपत पाल राजकारणापासून सावध असते. खरे कार्य प्रत्यक्ष जागेवर केले जाते, कार्यालयात बसून नाही. महिलांना ३३ टक्के राखीव जागा मिळाल्या पण प्रत्येक निर्णयप्रक्रियेत त्यांना काही स्थान आहे का असा प्रश्न त्या विचारतात. मायावती मुख्यमंत्री झाल्या, पण त्यांनी जनतेचा विश्वासघात केला असा स्पष्ट आरोप त्या करतात.

संपत पालचा जन्म १९४७ मध्ये बुंदेलखंडमधील बांदा भागात झाला. भारतातील अत्यंत दरिद्री अशा २०० जिल्ह्यांपैकी हा जिल्हा आहे. संपत ही गडरिया म्हणजे धनगर. पशुपालन आणि भात शेती हे रोजगाराचे मुख्य साधन. आईवडील निरक्षर. आजीकडून तिला घारे डोळे मिळाले असावेत. मांजरासारखे डोळे म्हणजे लबाडी आणि दुटप्पीपणा असा समज आहे. एकत्र कुटुंब. आईवडील, चुलते-चुलत्या, आजी. तशात घरात लहान मूल म्हणजे एकटी संपत. त्यामुळे तिच्यावर काका-आजींचा खूप जीव. शेताजवळच्या शाळेत ती दूरदूर राहून मुळाक्षरे आणि पाढे शिकते. पुढे तिला तिचे काका रीतसर शाळेत घालतात. स्मरणशक्ती तल्लख. त्यामुळे हुशार विद्यार्थ्यांत तिची गणना होई. शंभरपैकी शंभर गुण मिळाले म्हणून शाळा तपासणीसांपुढे तिला पुढे करण्यात येई. पुढे संपतच्या पाठोपाठ पाच-पाच वर्षांच्या अंतराने उर्मिला, रामलाल, शिवनरेश ही भावंडे घरात आली. ही भावंडे गावभर भटकत. झाडावर चढत. दगड मारून कैऱ्या पाडत.

शेताजवळच्या एका सरकारी मालकीच्या जागेत गावातले लोक प्रातर्विधीला जात. त्या जागेपलीकडे राहणाऱ्या धनिक धनगराने लोकांना मनाई केली. तेव्हा दोन्ही

गावात संघर्ष सुरू झाला. संपतने संघटित ताकदीचा प्रभाव त्यावेळी पहिल्यांदा अनुभवला. प्रतिस्पर्धी मुलींच्या गँगला मारामारीत चीत केले. संपतचे तिच्या काकाने कौतुक केले. ''तू केलंस ते योग्य केलेस. त्यांना चोपायलाच हवे होते. कधीही कुणाचा मार खाऊन तसेच यायचे नाही. कुणी एक थप्पड दिली तर त्याला तशीच थप्पड उलट द्यायची.'' संपतला आपल्या या कक्कांबद्दल खूप अभिमान वाटतो. कक्कांनी तिला शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले. संघर्षासाठी उत्तेजन दिले. इतरांपेक्षा पुढे जा असा मंत्र दिला. त्यासाठी नैतिक पाठबळ दिले. योग्य कारणासाठी, न्यायासाठी लढायची प्रेरणा दिली. चोरी करू नये, खोटे बोलू नये, अशी मूल्ये मनावर बिंबवली. संपत म्हणते, ''काळाच्या ओघात माझ्या काकांनी रुजवलेली ती मूल्ये मला आजही बळ देतात. त्यांनी दिलेली नियमांची चौकट आजही मी शिरोधार्थ मानते. अन्याया विरुद्ध लढा देणारी एकेकाळची ती छोटी छोटी मुलगी-आज लोकांना न्याय मिळवून देत आहे ही गोष्ट - काकांच्या शिकवणीमुळेच शक्य झालेली आहे.''

बाराव्या वर्षी संपतचे लग्न झाले. नवरा मुन्नीलाल उंचापुरा, सडपातळ, धीरगंभीर पण संपतला आणखी तीन वर्षांनी, ती पंधरा वर्षांची झाल्यावर सासरी पाठवायचं, आधी नाही हे आजोबांनी कबूल करून घेतलेले होते. तीन वर्षे जातात. संपत सासरी जाते. पण तिला पहिली रात्र, समागम वगैरे काहीच ठाऊक नसते. नवऱ्याने केलेली धसमुसळ तिला आवडत नाही. पुन्हा तिची माहेरी रवानगी होते. ''अजून संपत फार लहान आहे. लग्न म्हणजे काय हेच तिला कळत नाही. तिला कुणीतरी सगळं सांगायला हवं.'' सासू म्हणाली, ''माझ्या सुनेला काहीच कसं कळत नाही? तिला पोरबाळ होणार कसं?'' काही दिवसांनी मुन्नीलाल परत संधी साधतो. रक्तस्त्रावाने संपत बेजार होते. डॉक्टरांना बोलावण्यात येते... अजून हिचं शरीर पूर्णपणे उमललेलं नाही. अजून ही वयात आलेली नाही. हिचा योनिमार्ग फाटून गंभीर जखम झाली आहे. काळजी घ्यायला हवी. पहिल्या रात्रीचा हा रक्तरंजित अनुभव मागे टाकून कालांतराने संपत नवऱ्याशी सूर जुळवते. समाजात वावरताना मात्र ब्राह्मण आणि ठाकूर यांच्याशी संपतचा संघर्ष सुरू होतो. त्यातून कुटुंबात वाद होतो. पाच भावांच्या वाटण्या होतात. मुन्नीलालच्या वाटणीला लाकडी शेड येते. पण संपत खूष असते. सासू-सासरे यांच्यापासून मिळालेले स्वातंत्र्य तिला लाखमोलाचे वाटते. संपत शिलाई मशीन घेऊन टेलरिंगचे काम करू लागते. भाजीपाला, पानसुपारी विक्रीचेही खोके ती थाटते. बऱ्यापैकी कमाई होऊ लागते. ती मुलींसाठी शिलाईचे वर्ग सुरू करते. एकतास शिलाईबरोबर दोन तास लेखनवाचनही! तिची शाळा सुरू होते.

या शाळेतून पुढे संपतच्या समाजकार्याचा पाया मजबूत होत जातो.

चित्रकूट येथील तीन दिवसांच्या महिला मेळाव्याला ती जाते. नवऱ्याला न सांगता.

त्या तीन दिवसांत तिच्या कानावर सामाजिक समतेचा संदेश, समाज कार्याचे स्वरूप आणि मार्ग, क्रियाशील नेत्यांचे विचार-खूप काही येत राहते. उपस्थितांसमोर परिचय करून देण्याची संधी मिळते. ती आत्मविश्वास वाढवते. आत्मसन्मान पुष्ट करते. स्त्रियांची पुरुषांकडून होणारी पिळवणूक, आपल्या हक्कांची जाणीव, अन्यायाविरुद्ध लढण्याची गरज, त्यासाठी संघटन उभारण्याची गरज, चर्चा-विमर्श करून मार्ग काढण्याची पद्धत हे सर्व संपतला नव्याने कळते.

नवऱ्याला पूर्वकल्पना न देता संपत या मेळाव्याला आलेली असल्याने नवरा खवळतो. तो कार्यक्रमाच्या वेळी संपतवर शिव्यांचा भडिमार करतो. 'हा असंस्कृत निर्बुद्ध प्राणी माझा नवरा आहे' हे सांगण्याऐवजी मरण आलेले बरे असे तिला वाटते... ती त्याच्याबरोबर बाहेर पडते. पण एवढे सगळे ज्ञान मिळाल्यावर घरी जायचे हे तिला पटत नाही. घरी गेल्यावर हा नवरा आपल्याला मारझोड करणार, त्रास देणार. नकोच ते!

ती नवऱ्याला सांगते, ''हे बघ मुन्नीलाल तू घरी परत जा. हा मेळावा माझ्यासाठी जीवनमरणाचा प्रश्न आहे. तू मला इथं थांबू दिलं नाहीस तर मी तुझ्याबरोबर घरी येणार नाही. माहेरीही जाणार नाही. दोन्ही मुलींना माझ्याबरोबर घेऊन वेगळी राहीन... मी चुकीचं काही करत नाहीय. इतक्या बायका इथं जमल्यात, त्या अडाणी नाहीत. तू मला देऊ शकणार नाहीस अशा गोष्टी हे उच्चशिक्षित लोक येथे देत आहेत. मला चांगला माणूस बनवत आहेत. इथं येऊन तमाशा करून माझा अपमान केलास तर मी सहन करणार नाही.''

- आणखीही काही चर्चा दोघांमध्ये होते.

एक मुद्दा मुन्नीलाल काढतो, ''तुझ्यासारख्या स्वतंत्र बाईला लोक नावे ठेवतात. धंदेवाली म्हणतात.''

''म्हणून काय झालं? मेळाव्याला एकटी हजर राहिल्याने माझ्या चारित्र्याबद्दल शंका घेता; तर शेतात तुम्ही एकटे जाता तेव्हा तुमच्याबद्दल अशी शंका का घेऊ नये? माझ्या मनात दुसरा पुरुष भरेल असे का समजता? मी समोर नसताना तुम्ही इतर बायकांकडे बघत बसता असा संशय मी घेत राहिले तर?''

त्यावर मुन्नीलाल गोंधळतो. ''असा उठसूट संशय घेणे वेडेपणाचे आहे. आपण एकमेकांच्या नैतिकतेबद्दल विश्वास ठेवायला हवा.''

त्या दिवसापासून मुन्नीलाल संपतला मोकळीक देतो. तिच्याबद्दल संशय घेणे थांबवतो. महिलांचे संघटन, आरोग्य, शिक्षण, स्वातंत्र्य याबद्दल संपतचे काम सुरू होते. छोटे छोटे महिलांचे गट ती उभे करते. बचत गटांकडून निधी संकलन सुरू करते. गरजू महिलांना कर्जाऊ रक्कम देऊ लागते. शिवणकामाचे वर्ग, प्रशिक्षण वर्ग,

यातूनही उत्पन्न येत राहते. नवऱ्याची तक्रार उरत नाही. संसार सुरळीत चालू राहतो.

संपतला महिलांच्या संघटित शक्तीची जाणीव करून देणाऱ्या काही घटना घडतात.

एका ब्राह्मणाने एका चमार तरुणाला मारहाण केली. तेव्हा संपतने त्या ब्राह्मणाला जाब विचारला. त्यावर त्या ब्राह्मणाने तिला म्हटले,

''तू कोण मला जाब विचारणार? मी वाटेल ते करीन. या फडतूस चमार पोराची बाजू घेऊ नकोस.''

संपत चमार वस्तीत जाऊन चमार बायकांना एकत्र करते. पोलीस चौकीवर त्या ब्राह्मणाविरुद्ध तक्रार दाखल करायला सांगते. पोलीस तक्रार नोंदवत नाहीत. तिलाच बाहेर काढतात. महिला तेथेच ठिय्या देऊन बसतात. शेवटी पोलीस शरण येतात. तक्रार नोंदवतात. पोलीस ब्राह्मणाला अटक करायला जातात. अटक करतात. तो जामीनावर सुटल्यावर संपतची क्षमा मागायला येतो. तिचे पाय धरतो. ती तक्रार मागे घेते. संपतचा चमारांमध्ये दबदबा वाढतो.

गावच्या 'प्रधान' पदाच्या निवडणुकीत ब्राह्मणाविरुद्ध चमार उमेदवार उभा करते, त्याला निवडून आणते.

नव्या चमार प्रधानाच्या घरी संपत जेवायला जाते. चमाराच्या घरी जेवण केल्याबद्दल तिच्यावर गावकरी अघोषित बहिष्कार टाकतात. तिच्या मस्तकात संतापाच्या लाह्या तडतडतात. काकाची शिकवण तिला आठवते. कोणी थप्पड मारली तर उलट थप्पड मारा.

ती वृक्षदेवतेच्या पूजेच्या दिवशी प्रत्येकीच्या हातातली पूजेची थाळी उडवून लावते.

कोणी ब्राह्मण दहा हजार रुपये देऊन तिला मारण्याची सुपारी गुंडांना देतो.

त्या मारेकऱ्यांचा पाहुणचार संपत करते. ते मारेकरी तिचे कार्य समजून तिला अभय देतात.

**''मी लोकांच्या मदतीला धावते पण लोक मला मारण्यासाठी सुपारी देतात. आपण मेलो तर मुलांचे कोण बघणार?'' या प्रश्नाने ती सुन्न होते.**

संपत ते गाव सोडते. नव्या गावात ती शिवणवर्ग सुरू करते. एक सायकल विकत घेऊन मुन्नीलाल भाजी विकू लागतो. रोज दोन-तीनशे रुपये मिळवू लागतो. एक छोटा प्लॉट ४०० रुपयांना विकत घेऊन झोपडी बांधते. पण ती जागा सरकारी मालकीची असल्याचे कळल्यावर एक लाकडी खोके रस्त्याकडेला उभारून भाजी विक्री केंद्र सुरू करते. त्या सरकारी प्लॉटवर रात्री बांधकाम करून दोन खोल्या उभ्या करते. छप्पर टाकून तेथे राहण्यास जाते.

रौली या तिच्या मूळ गावी ब्राह्मण-चमार वाद पुन्हा उफाळतो. संपतला बोलावणे येते.

ती आल्याबरोबर ब्राह्मणाविरुद्ध खटला दाखल करून चमाराला न्याय मिळवून देते. ते १९७६ साल होते. आणीबाणी. गावातली मोकळी सरकारी जमीन दारिद्र्य रेषेखालील चमार भूमिहीनांना मिळावी असा प्रस्ताव गावच्या प्रधानामार्फत पाठवते. जमिनीच्या पुनर्वाटपासाठी ग्रामसभा बोलावते.

मॅजिस्ट्रेट लेखी अर्ज स्वीकारण्यास नकार देतो तेव्हा ''तुम्हाला जर या कामाचा पगार मिळतो तर ते काम करा'' असे ती खडसावून सांगते. वृत्तपत्रात तशा बातम्या देते.

जमिनी मंजूर होतात, पण त्यांचा ताबा मिळवण्यासाठी पोलीस मदत लागते. त्यासाठी ठिय्या आंदोलन करावे लागते.

६३ घुसखोरांच्या ताब्यातून ती जमीन गरीब चमारांना मिळते.

इ.स. २००३ संपत द ऑर्गनायझेशन फॉर द प्रमोशन ऑफ ट्रायबल वुमेन इन सरल इंडस्ट्री ही एनजीओ स्थापन करते. जयप्रकाश या सामाजिक कार्यकर्त्याच्या मदतीने अतार्रा येथे राहून काम करायचे ती ठरवते. घरभाडे वाचवण्यासाठी जयप्रकाश तिच्याच बरोबर राहतात. मुन्नीलालला स्पष्ट कल्पना देते.

एका श्रीमंत जमीनदाराने खेड्यातील मुख्य रस्त्यावर एक भिंत उभारली. दलित वस्तीकडे जाणारा रस्ता बंद केला. संपतने रातोरात शंभर महिलांच्या मदतीने ती भिंत जमीनदोस्त केली.

त्यातून गुलाबी साडीवाल्या महिलांची गँग तयार झाली.

दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना सवलतीच्या दरात ठराविक दुकानातून रेशनवरचे धान्य न मिळणे हा प्रकार वर्षानुवर्षे चाललेला. हे धान्य काळ्याबाजारात विकले जाई. संपतने अशा दुकानदारांच्या गोदामांवर छापे घालायला लावून कलेक्टरपर्यंत सर्वांना कामाला लावले. अनेक पोलिसांना सस्पेंड होणे भाग पडले. गुलाबी साडीतल्या या रणरागिणींचा सर्वांनीच धसका घेतला.

विद्यापीठात एकदा एका मेळाव्यात संपतला बसायला कोणी जागा देत नाही. तिला स्टेजवर बोलावण्यात येते. ती भाषण करते.

''नमस्ते. ज्या ठिकाणी मला कधी पाऊलही ठेवता आलं नाही अशा ज्ञानाच्या या प्रतिष्ठित संस्थेत तुमच्या समवेत उपस्थित राहण्याची संधी - हा माझा मोठा सन्मान आहे. मला शिक्षण घेता आलं नाही. त्यामुळे समाजाच्या प्रगतीसाठी शिक्षणाचं महत्त्व किती आहे ते मी जाणते. मात्र बहुसंख्य सुशिक्षित स्वत:चं उदाहरण लोकांसमोर आदर्श म्हणून राहावं असा प्रयत्न करीत नाहीत ही खेदाची गोष्ट

आहे. जे शिक्षक स्वत:च दुसऱ्या व्यक्तींना आदराने वागवू शकत नाहीत ते इतरांपुढे कसला आदर्श ठेवणार? एखाद्यानं झक्पक् पोशाख केलेला नाही म्हणून त्याला तुच्छ लेखण्याची शिकवण भावी पिढ्यांना दिली तर त्यांच्याजवळ काय संचित उरणार? मी तुम्हाला माझं घोषवाक्य सांगते. **सर्वप्रथम स्वत:ला सुधारा तरच इतरांना सुधारण्याचा विचार करता येईल. नाहीतर आपणच आपला देश रसातळाला नेऊ... वाईट शिक्षण हे निरक्षरपणा इतकेच क्लेशकारक मानायला हवे.''**

या छोटेखानी भाषणाने विद्यापीठातील उच्च शिक्षितांना चांगल्याच मिरच्या झोंबल्या. हे भाषण खूप गाजले.

... ॲनी बरथॉड या फ्रेंच लेखिकेने संपत पाल हिच्या अंतरंगात शिरून हे शब्दांकन केले आहे. ते खूपच प्रभावी आणि मर्मस्पर्शी, हृदयाला हात घालणारे उतरले आहे. सामान्य स्त्रिया एखाद्या महत्त्वाच्या संघर्षासाठी सज्ज होतात तेव्हा त्यांच्यात रणरागिणींचे बळ संचारते.

भ्रष्टाचार, नोकरशाहीची लाचलुचपत खाण्याला सोकावलेली कार्यपद्धती, नेत्यांची स्वत:ची तुंबडी भरण्यासाठी चाललेली धडपड, शासकीय योजनांचा विचका करण्याची प्रवृत्ती, यांनी स्वातंत्र्योतर भारत खिळखिळा झाला आहे. लोकशाहीला त्यामुळे धोका आहे. तळागाळातील लोकांनाही न्याय्य मानवी हक्क व प्रतिष्ठा यापासून वंचित ठेवले जाता कामा नये. जनकल्याणाच्या योजनांची अंमलबजावणी प्रामाणिकपणे झाली पाहिजे. प्रत्येक जिल्ह्यात संपत पाल यांच्यासारख्या झुंजार कार्यकर्त्यांची गरज आहे. ❐

**किंमत : १७०रु.  सभासदांना : सवलतीत  पोस्टेज : २५रु.**

**वाचकमित्रहो,**


**आपल्या** अखंड प्रेमामुळे **'मेहता मराठी ग्रंथजगत'** हे वाङ्मयीन मासिक चांगलेच लोकप्रिय झाले आहे. या अंकातील 'वाचकांचा प्रतिसाद' या सदरासाठी आपण 'मेहता पब्लिशिंग हाऊस'च्या वाचलेल्या पुस्तकांविषयी प्रतिक्रिया जरुर कळवाव्या.

पत्ता : मेहता पब्लिशिंग हाऊस, द्वारा-मेहता मराठी ग्रंथजगत, १९४१, सदाशिव पेठ, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३०.

# पुस्तक परिचय

## गुर्जर संस्कृतीच्या व्यामिश्रतेचे
## ह्दयस्पर्शी चौफेर दर्शन

# कथा गुर्जरी




**अनु. अंजनी नरवणे**

मराठीला गुजराती भाषा तशी फार जवळची आहे. मराठी आणि गुजराती साहित्य अनुवादाच्या माध्यमातून एकमेकांना परिचित आणि प्रिय आहे. अनेक गुजराती लेखक मुंबईत स्थायिक आहेत. वि. स. खांडेकर यांच्यासारखे लेखक गुजराती वाचकांना मूळ गुजरातीच वाटावेत इतक्या त्यांच्या कादंबऱ्या घरोघर पोचलेल्या आहेत. अनेक गुजराती लेखकांचे साहित्यही मराठीत मोठ्या प्रमाणावर आलेले आहे आणि ते आवडीने वाचले जाते. मराठीत गाजलेल्या नाटकांचे गुजराती रंगभूमीवरही सादरीकरण होते. या दोन्ही भाषांमध्ये सतत देवाण-घेवाण चालू आहे.

'कथा गुर्जरी'मध्ये गुजराती लेखकांच्या निवडक कथांचा मराठी अनुवाद वाचायला मिळतो. हा अनुवाद अंजनी नरवणे यांनी केला आहे. दीर्घकाळ त्यांचे वास्तव्य बडोदा येथे होते. सध्या त्या पुणेकर झाल्या आहेत. गेल्या तीस चाळीस वर्षांत त्यांचे गुजरातीतून मराठी अनुवाद कार्य चालू आहे. भारतीय भाषांमधील उत्तमोत्तम साहित्य मराठीत यावे, चांगल्या भारतीय साहित्यापासून आपण वंचित राहू नये, विविध राज्यांमधले आणि जाती-जमातीमधले रीतिरिवाज, वातावरण, सामाजिक-सांस्कृतिक वेगळेपण साहित्याद्वारे जाणून घेता यावे, विविधतेतील एकतेचा, एकात्मतेचा साक्षात्कार व्हावा यासाठी अनुवाद कार्याचे महत्त्व अजोड आहे. आपल्याला जे जे साहित्य आवडते, त्याचा आस्वाद आपल्या समानधर्मी रसिकांना देता यावा ही प्रेरणाही भाषांतराला पोषक ठरते. अनुवाद करण्याचे काम दुय्यम मानले जाते; परंतु अनुवादामुळेच जागतिक साहित्याशी आपला संबंध दृढ होत असतो. अनुवाद झाले नाहीत तर आपल्याला अन्य भाषांतील साहित्य आणि ज्ञान जाणून घेताच येणार नाही. रामायण-महाभारत ही आपली राष्ट्रीय महाकाव्ये, पण ती फारच थोडे लोक मूळ संस्कृतमधून वाचतात. बहुसंख्य वाचक भाषांतरातूनच त्यांचा आस्वाद घेतात. आपण रामायण मराठीत वाचतो तेव्हा मूळ रामायणाचा (संक्षिप्त) अनुवाद वाचत असतो याचे विस्मरण नसावे. अनुवादामुळेच विश्वसाहित्य ही संकल्पना वास्तवात उतरते. अनुवादाशिवाय तिला अस्तित्वच नाही.

अंजनी नरवणे यांनी त्यामुळे अनुवाद कार्यावर आपले बरेचसे लक्ष केंद्रित केले आहे, याचे अप्रूप वाटते. मेहतांसारखे उत्तम मार्केटिंगचे रहस्य अवगत असणारे प्रकाशक लाभल्याने एकापाठोपाठ एक अनुवाद करण्याचा त्यांचा झपाटा चालू आहे.

'कथा गुर्जरी'मध्ये प्रवीणसिंह चावडा, धीरूबेन पटेल, वर्षा अडालजा, दिनकर जोषी, ध्रुव भट, हेमांगिनी रानडे, मावजा माहेश्वरी, रवीन्द्र पारेख, रमेश दवे, उत्पल भायाणी, भगवतीकुमार शर्मा, इला आरब मेहता, हिमांशी शेलत, जोसेफ मक्वान, हरीश नाग्रेचा, धीरेंद्र मेहता अशा कथाकारांच्या प्रत्येकी एक ते तीन कथांचे संकलन केले गेले आहे. एकूण २९ कथा आहेत.

अंजनी नरवणे यांचा बराच काळ गुजरातमध्ये व्यतीत झाल्यामुळे गुजरातीचा

प्रभाव त्यांच्या मराठीवर जाणवला तर त्यात आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. गुजराती जनजीवनाचे विशेष पैलू प्रकट करणारे शब्द आणि संकल्पना यांचे पडसाद अनुवादात जाणवणारच; किंबहुना त्यामुळेच मराठीपेक्षा वेगळ्या भाषेतून हे साहित्य आले आहे याची जाणीव होणे इष्ट असते. 'व्हिजिट' या प्रवीणसिंह चावडा यांच्या पहिल्याच कथेतले पहिलेच वाक्य वाचताना मला त्याचे वेगळेपण जाणवले आणि जरासे आश्चर्यही वाटले. "बातमी समजत गेली तसतशी माणसं येत गेली आणि घरात काही वेळ खूप रडारड तर काही वेळ अगदी भीती वाटेल अशी शांतता, असं होत राहिलं."

बातमी समजत गेली - हे गुजरातीत स्वाभाविक असेल; मराठीत बातमी कळणे, बातमी पसरणे, हे कानाला जास्त बरे वाटते. त्या अपघाताची बातमी लोकांना कळत गेली तसतशी त्यांची रीघ लागली आणि घरात कधी आक्रोश तर कधी भयाण शांतता जाणवू लागली... एकदा हे गुजराती वळण लक्षात आले की या कथांमध्ये रस घेणे सुलभ जाईल.

गुजरातीमध्ये कथाकारांची जी लोकमान्य पिढी प्रतिष्ठित मानली जात आहे, त्या पिढीच्या कथांचे प्रातिनिधीक दर्शन घडावे या दृष्टीने अनुवादासाठी कथांची निवड केली गेली असेल असे गृहीत धरायला हरकत नाही. गुजराती सामाजिक जीवन, संस्कार मूल्ये, आदर्श आणि रीतिरिवाज, व्यापारी वृत्ती आणि मानसिकता, औद्योगिक आव्हाने, ग्रामीण व शहरी जीवन, नात्यांतील गुंते, यांचे प्रतिबिंब कथानकांतून जाणवणे अपेक्षित असते. ते तसे जाणवतेही. प्रत्येक कथा एक स्वतंत्र भावविश्व घेऊन येते आणि त्यातले ताणतणाव, हर्षखेद प्रकट करते. लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाप्रमाणे, अनुभवक्षेत्राच्या अनुषंगाने, सामाजिक पार्श्वभूमीप्रमाणे विषयाची धाटणी आणि अभिव्यक्तीची पद्धत वेगळी असणेही आपल्याला अभिप्रेत असते.

गुजराती कथाकारांचे धावते परिचय एक दोन ओळीत दिल्याने आणि कथांची वैशिष्ट्येही प्रारंभी सूचित केल्याने गुर्जर कथाविश्वातला हा फेरफटका अधिक फलदायी होऊ शकेल.

प्रवीणसिंह चावडा हे प्रारंभी इंग्रजीचे प्राध्यापक आणि नंतर गुजरात शासनात उच्चपदस्थ अधिकारी होते. पात्रांच्या मनाचा सूक्ष्म वेध घेणे ही त्यांची खासियत. व्हिजिट या कथेत पती व मोठा मुलगा पुरामध्ये वाहून गेल्यावर धक्का बसलेल्या अबोल वृद्ध स्त्रीवर अडल्या नडल्यांच्या घरी स्वयंपाकासाठी व्हिजिटला जाऊन पोट भरण्याची पाळी येते, तिचे वर्णन तसेच मनोव्यापार हे कथेचे एक सूत्र आहे तर अपघातात कर्ता पुरुष गमावलेल्या सविताच्या शोकाकुल कुटुंबाची ओढग्रस्त अवस्था आणि बाराव्या तेराव्यापर्यंतचे विधी, त्यांचे ताण हे दुसरे कथासूत्र आहे.

धीरूबहेन पटेल यांच्या 'आगंतुक'ला साहित्य अकादमीचा पुरस्कार लाभला आहे. वास्तवाचे यथार्थ चित्रण, अनलंकृत भाषा, हृदयस्पर्शी घटना ही त्यांची

वैशिष्ट्ये. 'कहाणी वडाच्या लाडक्या मुलाची' ही कथा उपरोधपूर्ण आहे.

रवीन्द्र पारेख यांच्या कथांचे विषय चाकोरीबाहेरचे पण प्रखर वास्तवाचे भान करून देणारे असतात. 'मर्म' या कथेत सासूचा विरोध असूनही रजनी कन्या भ्रूणहत्या करते तर आपला गर्भ पाडून टाकणारी रोशनी सांगते, ''तो मुलगा होता'', तेव्हा तिची सासू तिच्याकडे संतप्त डोळ्यांनी बघू लागते.

पैशाच्या नोटा देणारे 'झाड' तोडल्याबद्दल, दंड म्हणून एक हजार चारशे कोटीचा टॅक्स भरण्याचा 'हिशेब' करण्यामागची शासकीय अधिकाऱ्याची गणिती बुद्धी वाचकांना चक्रावून सोडते. झाड गिफ्ट म्हणून देण्याचीही सोय नाही. कारण गिफ्ट टॅक्सही तसाच बेसुमार! ''शेवटी साहेब माझ्या घरात आणि मी त्यांच्या भाड्याच्या घरात.'' अशी उपरोधपूर्ण कलाटणी.

ध्रुव भट्ट यांनी आदिवासी संस्कृतीचे पिढीजाद सच्चेपण कथाकादंबऱ्यांत प्रकर्षाने रंगवले आहे. 'तत्त्वमसि' कादंबरीला साहित्य अकादमीचा पुरस्कार प्राप्त. सौराष्ट्रातील मच्छिमार कुटुंबाच्या श्रद्धांची पारंपरिक मातबरी दाखवणारी अकूपार (पृथ्वीला आपल्या पाठीचा आधार देणारे कासव) ही कथा या पुस्तकात घेतली आहे.

वर्षा अडालजा यांची अणसार ही कुष्ठरोग्यांच्या जीवनावरची कादंबरी साहित्य अकादमी पुरस्काराची मानकरी ठरली. कौटुंबिक समस्यांवर त्यांचा विशेष भर असतो. 'आजा पिया' मध्ये घर सोडून पलायन करणाऱ्याच्या वाट्याला आलेल्या कुंटणखान्यातील हडेलहप्पीचे आणि भग्न अपेक्षांचे चित्रण आढळते.

पत्रकारितेच्या दुनियेत रमलेली हीना. तिची धाकटी बहीण मैत्रेयी. शिकता शिकता अर्थार्जन करणे क्रमप्राप्त. वडिलांना तिच्या लग्नाची चिंता. ती त्यांना सांगते; ''मी शिकेन. नोकरी करून पैसे साठवेन. माझे विचार समजू शकेल, अशा माणसाची गाठ पडली तर लग्न करीन. पत्रिका बघून नाही.'' (वावली)

मावजी माहेश्वरी हे कच्छमध्ये शिक्षक : दलित, ग्रामीण जीवनावर लेखन. वेदना या कथेत शहरात प्रेमविवाह केल्याने माहेरला मुकलेल्या एका तरुणीच्या मनोवस्थेचा वेध घेतला आहे.

हिमांशी शेलत या सूरतला इंग्रजीच्या प्राध्यापिका आहेत. वंचित, अनाथ मुलांच्या पुनर्वसनासाठी मुदतपूर्व स्वेच्छानिवृत्ती. ते लोक ही कथा तृतीयपंथी लोकांच्या जीवनशैलीवर प्रकाश टाकते.

जोसेफ मक्वान हे लोकप्रिय दलित लेखक होते. मुख्य प्रवाहातही त्यांना मानाचे स्थान होते. 'अंगलियात' कादंबरीला साहित्य अकादमीचा पुरस्कार. राजधानी एक्सप्रेसला झालेल्या अपघातात शेठ अमरतराय मृत म्हणून घोषित होतात; पण ते जिवंत असतात. अनंतराय म्हणून ते हॉस्पिटलमधून बाहेर पडतात. त्यांच्या मुलांना त्यांच्या मृत्यूबद्दल दोन लाख रुपये रेल्वेकडून मिळतात. अमरतराय दोन वर्षे

हिमालयात स्वैर भटकंती करून घरी येतात. साधूच्या वेषामुळे त्यांना कोणी ओळखत नाही. ते अमरतरायचा एक मित्र म्हणून सर्वांना भेटतात व पुन्हा घर सोडतात. (उगाच हेलपाटा)

...अशी खूपच विविधता या कथांमधून आहे.

इला आरब मेहता यांच्या तीन कथांपैकी 'मी माझ्या सोबतीनं' मधील वंदनाची आई आपल्या मोठ्या काकांच्या आणि नंतर नवरा जयंतीलाल यांच्या आज्ञेनुसार घर चालवायच्या. सर्व निर्णय घेण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवून निर्धास्त असायच्या. त्या दोघांच्या निधनानंतर शोकाचे दिवस संपले; आपल्या आर्थिक व्यवहारांची माहिती घेऊन प्रॉपर्टीच्या नामांतराचे दिवसही संपले. नंतर घराची आवराआवर. फावल्या वेळात एका शाळेत मुलांसाठी छंदवर्ग चालवणे, असा दिनक्रम. अशा वेळी मुलगी वंदना आपल्या एकाकी आईला सुचवते, "माझ्या मामजींचे एक जवळचे मित्र आहेत. त्यांची पत्नी गतवर्षी वारली. तू एकटी रहातेस... या वयात कंपॅनियनची, सहजीवनाची - " तिचे बोलणे थांबवून वंदनाची आई म्हणते, "मी एकटी, एकाकी कुठेय? मी आहे ना माझ्या सोबतीला!" ... स्वत:ला हवं तसे वागत राहण्याचे दिवस आता तिला मोलाचे वाटत होते.

निवडणुका जवळ आल्यावर थोरले साहेब आपल्या प्रचारासाठी एक चित्रपट शूट करण्याचे ठरवतात. त्याचे स्क्रिप्ट स्वत:च तयार करतात. जगदंबेचे मंदिर, मंदिरामागची सुफी संताची कबर, हॉटेलवर दगडफेक, ब्ल्यू स्टार शॉपिंग मॉलची लुटालूट, जातीय दंगल, पोलीस फायरिंग, धर्मासाठी बलिदान..., गोध्रा..., गुजरात. एक परफेक्ट स्क्रिप्ट. कान्सच्या डॉक्युमेंटरी फेस्टिवलसाठी परफेक्ट एन्ट्री. 'शेवटचा शॉट' कथेचे हे वळण बदलत्या राजनीतीची झलक ट्रेलरसारखी दाखवते.

हरीश नाग्रेचांचे साहित्य उपेक्षित वर्ग, महिलांचे शोषण, सामाजिक अन्याय वेशींवर टांगते. बुद्धिप्रामाण्यवादाचे ते पुरस्कर्ते होते. 'ॲन अफेअर' या कथेतील वीरा ही हर्षची बायको. प्रेमाच्या उन्मादात वीरा अंगावरच्या कपड्यानिशी पेडर रोडवरचे आपले वैभवसंपन्न घर सोडून हर्षबरोबर संसार थाटायला उपनगरातल्या एका खोलीत येऊन राहिली. हर्षला हवी होती तशी राहू लागली. प्रेमापेक्षा आपण घर सोडून कुटुंबाशी द्रोह केला याची बोच त्याला जास्त वाटते. हर्षच्या जीवन पद्धतीशी वीरा जुळवून घेते. त्याच्या नातलगांची मर्जी सांभाळते...

हर्षच्या जीवनात प्रेयसी म्हणून आस्मा येते. ती स्वत:ला हर्षच्या इच्छेप्रमाणे घडवत जाते. हर्षच्या संदर्भातच तिला आपले आयुष्य अर्थपूर्ण वाटते. एरव्ही निरुपयोगी, असंगत, अनावश्यक वाटू लागते. वीराला भेटून ती हर्षबद्दल जेव्हा बोलते तेव्हा हर्षच्या घरेलू जीवनाचे पैलू तिला समजतात आणि ती हैराण होते. वीराच्या शब्दांनी हर्षबद्दलचे तिचे स्वप्न विस्कटून, कुस्करून, उद्‌ध्वस्त होते.

हर्षच्या मर्जीप्रमाणे जगणे एवढेच आपण करायचे तर आस्माचे अस्तित्वच उरणार नाही. एक मादी, एक स्वयंपाकीण, एवढेच का आपले काम? असा प्रश्न तिला पडतो. पत्नी म्हणून हर्ष वीराला झिडकारू शकते. पण व्यक्ती म्हणून वीराचे स्वत:चे अस्तित्व उरतेच. आपले तसे अस्तित्व उरायला हवे; असे आस्माला उमगते. आत्मभान येते.


गुजरातमधील कुटुंबव्यवस्था अजून बरीच बंदिस्त आहे. एका हलक्या कुळातल्या तरुणाबरोबर पळून जाऊन नयना लग्न करते. तिला पुन्हा कुटुंबात कोणी स्थान देत नाही. विवाह, मृत्यू या प्रसंगीही तिला हजर राहू देत नाहीत. सणावाराला तिची आठवण ठेवत नाहीत. ती मात्र सारखी त्यांच्या वाटेकडे डोळे लावून बसलेली असते. डॉ. मणिलाल पटेल यांनी विच्छेद या कथेत गुजरातमधील कर्मठ मानसिकतेचे दर्शन घडवले आहे.

गहू वगैरे निवडण्यासाठी शेजारच्या बायकांना बोलावून झटपट काम करण्याची प्रथा गुजरातमध्ये आहे. तिच्या अनुषंगाने एकेकीच्या सुखदु:खाची आस्थेने विचारपूस होते. एका प्लंबरबरोबर पळून गेलेल्या विवाहित मुलीसंबंधी तिची आई भद्रा म्हणते, ''घरात इतकं सगळं सामान आहे. त्यातली एखादी वस्तू कमी झाली एवढंच. तिनं काय फरक पडतो?'' ही गुजराती मानसिकता धीरेन्द्र मेहता यांनी 'निवडण' मध्ये पकडली आहे.

एकूणच या कथांद्वारे गुजराती समाजाची, कुटुंब रचनेची, मूल्यांची वेगवेगळी रूपे व वैशिष्ट्ये समोर येतात. त्यातून जुन्या नव्यांमधला संघर्षही स्पष्ट होतो. परंपरागत जीवनशैलीचा प्रभाव त्या मानाने अधिक दिसतो.

❐

**किंमत : १७०रु. सभासदांना : सवलतीत पोस्टेज : २५रु.**

**सुंदर मन**

**४थी आवृत्ती**

**एडवर्ड डी. बोनो : अनु. सुभाष जोशी**


आपल्या सर्जनशील विचारसामर्थ्यांनी आपलं व्यक्तिमत्त्व अधिक आकर्षक करण्यासाठी हे पुस्तक वाचा

१५०रु. पोस्टेज २५रु.

# अभिप्राय

## नियतीच्या खेळाची गोष्ट

पुण्याचे लेखक मिलिंद भालचंद्र गाडगीळ यांची 'संधिकाल' ही नवी कादंबरी. श्रीराम धारप नावाच्या ब्राह्मण, पुजारी कुटुंबात जन्माला आलेल्या तरुणाच्या आयुष्यातील उण्यापुऱ्या बत्तीस वर्षांच्या आयुष्यकालाची कहाणी. अनेक उलटसुलट घटनांनी भरलेली. अनेक प्रश्न उपस्थित करणारी. वेळणीच्या रुद्रेश्वर मंदिराचे पुजारी असलेले श्रीरामचे गरीब वडील पत्नी वारल्यानंतर आठदहा वर्षांच्या श्रीरामला गावाजवळच्या गुरुजींच्या वेदपाठशाळेत नेतात. त्याच्या इच्छेविरुद्ध सक्तीने वेदपठण शिकायला लावतात. तिथे त्याची ओळख मुंबईहून आलेल्या देवी नावाच्या सधन कुटुंबातील मुलीशी होते. नारळाचे झाड देवीच्या अंगावर पडत असताना श्रीराम तिला ढकलून तिचे संकट आपल्या अंगावर घेतो आणि देवीला वाचवितो. इतक्या लहान वयात श्रीराम, देवी एकमेकाच्या प्रेमात पडतात. मुंबईला परतण्यापूर्वी भेट न झाल्यामुळे देवी एक चिठ्ठी श्रीरामच्या नावे देऊन जाते. तो ती चिठ्ठी पुढील पंधरा वर्षे जपून ठेवतो. देवी ते विसरून जाते. श्रीराम विसरत नाही. गुरुजींची इच्छा डावलून श्रीराम वेदपाठशाळा सोडून इंजिनीयर होण्याची महत्त्वाकांक्षा बाळगून शाळेत परत जातो.. दरम्यान, श्रीरामचे वडील दुसरे लग्न करतात, नंतर लवकरच त्यांचे निधन होते. गरिबीतच जगणाऱ्या शाळेच्या मुख्याध्यापकांच्या सहाय्याने श्रीराम परीक्षा देतो. उत्तम प्रावीण्य मिळवितो. पुढील शिक्षणाचा प्रश्न असतो. निराधार अवस्थेत श्रीराम पुण्याला येतो. वेदशिक्षणाकडे पाठ फिरवून आल्यावरही पुण्यात उपजीविकेसाठी त्याला पुन्हा त्याच परंपरेचा आधार घेऊन जगावे लागते. एका आचाऱ्याकडे तो स्वयंपाकाचे काम करू लागतो.



एका यज्ञाच्या कार्यक्रमात आचारी म्हणून काम करताना श्रीराम यज्ञाचे मंत्र अस्खलित म्हणून दाखवितो. यज्ञ करणारे गणपुलेशास्त्री त्याचे पाणी ओळखतात. आपल्याबरोबर घरी घेऊन जातात. रहायला जागा, यज्ञाची कामे देतात. त्याच्या कॉलेज शिक्षणाला त्यांची हरकत नसते. श्रीराम इंजिनीअरिंगला प्रवेश मिळवितो. खूप अभ्यास करून इंजिनीयर होतो. कॉलेजात शिकणारी गणपुलेशास्त्रींची मुलगी सुमन श्रीरामला मदत करते. ती त्याच्या प्रेमात पडते. त्याच्या मागे लागते. श्रीराम मात्र लहानपणापासून मनात घर करून राहिलेल्या देवीला विसरू शकत नाही. तिचा ठावठिकाणा माहीत नसतानाही! दरम्यान रंगपंचमीच्या खेळात रंगाची ॲलर्जी झाल्याचे निमित्त घडून श्रीरामवर जीव टाकणारी सुमन अचानक मरण पावते. श्रीराम गणपुलेशास्त्रींचा वाडा सोडून पुन्हा रस्त्यावर येतो. इंजिनीअरिंगच्या अभ्यासाचा प्रश्न असतो. निराधार झालेल्या श्रीरामला स्वत:ची इंजिनीअरिंग फर्म असलेले इंजिनीअर मेहेंदळे योगायोगाने भेटतात. होतकरू श्रीरामला मदत करतात. आपल्या अपंग मुलीशी त्याचे लग्न लावून देण्याचा मेहेंदळे यांचा विचार असतो. पण मेहेंदळ्याच्या अपंग लेकीलाच ते मान्य नसते. श्रीरामचा जीव तर देवीतच गुंतलेला असतो. मेहेंदळ्यांची मुलगी गुंड आणून श्रीरामला धमकावून पळवून लावते. श्रीराम आता इंजिनीअर होतो. त्याला रेल्वेत नोकरी मिळते. ज्या वेळणी गावाला सोडून तो आलेला असतो त्याच परिसरात त्याला नोकरीच्या कामानिमित्त यावे लागते. मठाधीश गुरुजींचे देवीच्या आईशी पूर्वीपासून असलेले संबंध कळून त्याला आधीच आरपार धक्का बसलेला असतो. भ्रमनिरासातून त्याने स्वत:ला सावरलेले असते. आता देवीची भेट होते. देवीचे वडील पत्नीच्या मठातील गुरुजींशी असलेल्या संबंधांमुळे एके दिवशी कडाक्याच्या भांडणानंतर कायमचे परागंदा होतात. दरम्यान देवीचे एका 'क्रिएटिव्ह' परंतु, बायकोला विकण्याचा प्रयत्न करणाऱ्या नालायक तरुणाशी लग्न होऊन त्याच्याशी संबंध तुटलेलेही असतात. देवीची आई वारते. देवी 'एमबीए' करून 'स्वराज ग्रुप' नावाच्या 'स्पेशल इकॉनॉमिक झोन' उभारणाऱ्या, शेतकऱ्यांच्या जमिनी खरेदी करीत सुटलेल्या कंपनीत 'एक्झिक्युटिव्ह' म्हणून काम करू लागलेली असते. देवीची एकेक माहिती श्रीरामला कळत जाते. तो तिला धीर देतो. तिच्याशी लग्न करायचे ठरवतो. पण, दुर्दैव त्याची पाठ सोडत नाही. देवीकडे वेळणी गावच्या परिसरातील जमिनी खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांना राजी करण्याची कामगिरी असते. प्रारंभी तयार नसलेले शेतकरी नंतर पैशाच्या आमिषाने तयार होत जातात. श्रीरामने गाव सोडल्यानंतर वेळणीच्या रुद्रेश्वर मंदिराचा विश्वस्त बनलेला त्याचा दुराचारी आतेभाऊ दिनकर रुद्रेश्वराचा बाजार मांडतो. भूकंपाच्या धक्क्यामुळे शंकराच्या मूर्तीच्या खालून पाणी वाहू लागते, त्याला तो 'चमत्कार' ठरवतो. तीर्थ म्हणून ते पाणी विकून पैसे कमवू लागतो. रुद्रेश्वर मंदिरात दुकानांची गर्दी होते. देवाच्या नावावर व्यापारी पैसा

कमवू लागतात. दरम्यान, रूद्रेश्वर मंदिराला लागून असलेला डोंगर वंशपरंपरेने श्रीरामच्या मालकीचा असल्याचा शोध 'स्वराज ग्रुप'ला लागतो. तो डोंगर पाइपलाइन टाकण्यासाठी कंपनीला हवा असतो. शेतकऱ्यांना 'सेझ'साठी जमिनी विकायला लावून पैसा कमवणारा श्रीरामचा आतेभाऊ दिनकर, मंदिराचे गावातील ट्रस्टी, पुढारी यांना आता एकदम 'धर्म' आठवतो. रुद्रेश्वर मंदिर हलवून दुसरीकडे उभारून द्यायलाही कंपनी तयार होते. आपले उत्पन्न बुडणार म्हणून दिनकर, गावकरी, पुढारी आंदोलनाची भाषा सुरू करतात.'कॉर्पोरेट कल्चर' मध्ये 'रुळलेल्या' देवीला नोकरी टिकविण्यासाठी, बढती, सोयी मिळविण्यासाठी 'बॉस' मंडळींबरोबर शय्यासोबत करण्यात काहीच गैर वाटत नाही. तरीही काळाच्या ओघात टिकलेले श्रीरामचे प्रेम तिला भावते. ती श्रीरामशी लग्न करायला तयार होते. तिथेही तिचे दुर्दैव आड येते. तिचा नालायक नवरा तिच्याकडून 'पोटगी' वसूल करतो, शेवटच्या निरोपाला येऊन तिच्यावर बलात्कार करतो. देवी त्याच रात्री 'सुसाइड नोट' ठेवून आत्महत्या करते. तिच्या मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्याची  वेळ श्रीरामवर येते.

कादंबरीत डॉ. रमण देसाई नावाचे पात्र आहे, डॉ. देसाई कम्युनिस्ट विचारसरणीने भारावलेला. आदिवासींच्या सेवेसाठी, त्यांना 'क्रांतिकारक' बनविण्यासाठी तो या ग्रामीण भागात इस्पितळ उभारतो. अल्प खर्चात गरीब रुग्णांना उपचार पुरवतो. 'सेझ'साठी शेतकऱ्यांनी जमिनी विकू नयेत म्हणून जिवापाड प्रयत्न करतो, पण हरतो. आधी ध्येयवादी असलेली त्याची पत्नी नंतर खेड्यापाड्यातील दरिद्री राहणीमानाला कंटाळून, रमणला सोडून एकुलत्या एक मुलासह शहरात परतते. रमण निराधार होतो. रमणच्या पार्टीचा तेजतर्रार पुढारी आशुतोष मुंबईहून येऊन 'सेझ'ला विरोध करणारी सभा घेतो. नंतर 'स्वराज ग्रुप'शी त्याचे गुप्त साटेलोटे झालेले असल्याचे रमणला कळते, तेव्हा मात्र तो पुरता खचतो. आपल्या हॉस्पिटलवर लावलेला लाल झेंडा फेकून देऊन खचलेल्या मन:स्थितीत बायको, मुलाकडे शहराला निघतो.

दु:खाचे अनेक भोग भोगून नायक श्रीराम देवीच्या अस्थींचे विसर्जन करून संधिकाली आयुष्याच्या पुढील प्रवासाला निघतो. तत्त्वनिष्ठ राहिलेल्या श्रीरामला अनेक प्रश्नांची उत्तरे शोधायची असतात. इथूनच बहुधा मुमुक्षू अवस्थेची सुरुवात होत असावी.या सुंदर कादंबरीला मुखपृष्ठही सुंदर लाभले आहे. वाचकाला खिळवून ठेवण्याची क्षमता नक्कीच 'संधिकाल'मध्ये आहे. 'कॉर्पोरेट कल्चर'च्या नावाखाली चाललेला हिडीस अनाचार, धर्माच्या नावाखाली चाललेला अधर्म आणि व्यभिचार लेखकाने अचूक शब्दबद्ध केला आहे. जिज्ञासूंनी जरूर वाचावी अशी ही कादंबरी आहे.

विश्वास डिग्गीकर

महाराष्ट्र टाइम्स - दि.०९/१०/२०११

# मनोवेधक आधारित कथा

गणा महार, त्याची बायको रखमा आणि त्याचं मूल सोनू यांची जीवनकथा - 'एका परिसाची कथा'; कोकणात प्रसिद्ध असणाऱ्या लोककथांपैकी एक कथा; बोधकथा नि आपापल्या आयुष्याचं प्रतिबिंब शोधायला लावणारी कथा. खाणीत काम करणारा गणा. काम करताना सापडलेला परिस त्यातून ओढवलेली संकटे, सोनूचा जीवघेणा शेवट. ही कथा घडते केवळ परिसामुळे. गणा व रखमा अखेरीस या परिसाला समुद्रात फेकून देतात, कटू आठवणी पुसण्याचा प्रयत्न करतात, अशी ही 'एका परिसाची कथा' वाचताना वाचकही त्या कथेतील एक व्यक्ती म्हणून अंतर्मुख होऊन जातो, हेच या दीर्घकथेचे वैशिष्ट्य होय. 'द पर्ल' या जॉन स्टाईनबेग यांच्या कथेवर आधारित अशी ही कथा निश्चितच विचार करायला लावणारी आहे.

अशा अनेक मनोवेधक कथा 'एका परिसाची कथा' या संग्रहातून वाचायला मिळतात. भारतीय स्वातंत्र्य संग्रामात भाग घेतलेल्या एका स्वातंत्र्य सैनिकाची 'सुलताना' ही कथा; राजाराम कऱ्हाडे व जंगलाची अनभिषिक्त सम्राज्ञी भासणारी चित्तीण-सुलताना यांच्या आगळ्यावेगळ्या प्रेमाची आगळीवेगळी कथा बालझॅक यांच्या 'पॅशन इन द डेझर्ट' या फ्रेंच कथेवर आधारित आहे.




'नॉस्ट्राडॅमस', 'माणकेश्वराचा पुतळा', 'टर्मिनेटर सीड', 'चंद्रप्रकाश' ही गी दे मौपासाँ यांच्या 'क्लेडा दे ल्यूनअ' या फ्रेंच कथेवर आधारित कथा, 'कर्मविपाक' ही सॉमरसेट मॉम यांच्या द अँट अँड द ग्रासटॉपर या इंग्लिश कथेवर आधारित कथा, 'गिधाड्या' ही एडगर ॲलन पो यांच्या 'टिल-टेलहार्ट' या इंग्लिश कथेवर आधारित कथा. 'प्रेम' ही पिरांदिलो यांच्या 'वॉर' या कथेवर आधारित कथा - अशा अनेक कथांचा निर्भेळ आनंद मिळवून देणारा हा संग्रह मराठी साहित्यातील एक ठेवाच होय.

प्रस्तुत कथासंग्रहातील बऱ्याच कथा या इंग्लिश, फ्रेंच, रशियन कथांवर आधारित अशा आहेत; पण त्या वाचताना लेखकाने केलेले मराठी रूपांतर इतके सुंदर आहे, की जणू काही त्या कथा मूळ मराठीच आहेत, असे वाटते. मराठी भाषेवरचा त्यांचा अधिकार व अन्य भाषांचा तरल अभ्यास यांचा सुरेख मेळ साधला गेला आहे.

लेखक मिलिंद जोशी यांचे आणखी लेखनवैशिष्ट्य म्हणजे ते प्रत्येक प्रसंग वाचकांसमोर जिवंत करतात. प्रत्येक प्रसंग वर्णन करताना त्यांचे सूक्ष्म सूक्ष्म बारकावेही त्यांच्या लेखनामधून निसटत नाहीत. आपणही त्या प्रसंगांचे, कथेचे घटक आहोत, असा भास होतो; आणि म्हणूनच या कथा 'आपल्या' वाटतात. हेच या 'एका परिसाची कथा' या कथासंग्रहाचे मुख्य गमक आहे. वाचकांनी या कथांचा जरूर आस्वाद घ्यावा.

डॉ. सौ. अपर्णा दे. राईरीकर

सकाळ दि.२३/१०/२०११


'स' सुखाचा!

**जॉन ग्रे**

अनु. **ॲड. शुभदा विद्वांस**

२९०रु. पोस्टेज ३०रु.





जर तुमच्या घरातल्या भिंतींना तडे जायला लागले,
तर तुम्ही काय कराल?
प्रथम पाया मजबूत करण्याचा प्रयत्न कराल.
जर तुमची झाडे सुकून पिवळी पडायला लागली,
तर तुम्ही झाडाला हिरवा रंग देऊन ते ठीक करण्याचा प्रयत्न कधी
कराल का? नाही.
तुम्ही झाडांना पाणी घालाल,
तसेच जेव्हा आपण आपल्या प्रेमाचा वर्षाव करतो,
तेव्हा आपली अनेक संकटे
आपली आपणच नाहीशी होतात. आपल्याला हव्या असलेल्या गोष्टी
मिळत जातात तसतशी आपल्या
स्वत:लाच आपली ओळख पटत जाते.

# स्त्री-पुरुष संबंधावर प्रकाश टाकणाऱ्या कथा

आपल्या भारतीय संस्कृतीमधील रूढी-परंपरांचे आणि नीतिमूल्यांचे जतन करताना सर्व व्यक्ती चौकटबद्ध जीवन जगत असतात; परंतु ही चौकट भेदून आगळीक करण्याचा प्रयत्न कुणी केला तर विशेषत: पती-पत्नी असो वा मित्र-मैत्रिणी, या दोघांमध्ये दुरावा निर्माण होतो. त्यांच्यात मानसिक ताणतणाव निर्माण होतात आणि त्यांचे कौटुंबिक स्वास्थ्य बिघडते. यांच्यामधील काही व्यक्ती दिशाहीन होतात, तर काही स्थितप्रज्ञ होऊन आलेल्या परिस्थितीशी जुळवून घेतात. अशाच काही व्यक्तींच्या कथा डॉ. राम मराठे यांनी आपल्या 'ती दोघं' या कथासंग्रहातून रसिकांसमोर आणल्या आहेत.

प्रस्तुत कथासंग्रहातील कथा पुरुष आणि स्त्री आणि त्यांचे नातेसंबंध यांना केंद्रस्थानी ठेवून लिहिल्या आहेत. 'प्रिय कैकयीस', 'डॉ. आनंदी गोपाळ जोशी' आणि 'खोल खोल दरी' या कथांमधून रसिक वाचकांना ज्ञात असलेल्या पात्रांची नवी ओळख करून दिली आहे. 'मिनी सासरला जाते' आणि 'लीली वयात येते' या कथा विनोदी ढंगाने लिहिल्या आहेत, तर उर्वरित कथांमधून आपल्या सभोवताली वावरणाऱ्या पात्रांना जिवंत केले आहे.




'प्रिय कैकयीस' मधून रामायणातील कैकयीला लेखिकेने लिहिलेल्या पत्रामधून एक वेगळी कथा आकाराला आली आहे. क्रौर्य, दुष्टपणा आणि स्वार्थीपणा या दुर्गुणांची धनी होऊन खलनायिका ठरलेल्या कैकयीची वेगळी प्रतिमा साकारली आहे. यामुळे कैकयीबद्दलचा आदरभाव वाढण्यास मदत होते. 'खोल खोल दरी' या कथेमधून रामदासस्वामींच्या जीवनातील एका घटनेचा परामर्श घेतला आहे. रामदासस्वामी बोहल्यावरून पळून गेले. ते पुढे महान संत झाले परंतु त्यांच्यासमोर असलेल्या नववधूचे काय झाले, तिची मन:स्थिती कशी होती हे या कथेत अचूकपणे टिपले आहे. भारतातील पहिल्या महिला डॉक्टर म्हणून नावलौकिक मिळविलेल्या डॉ. आनंदी गोपाळ जोशी यांचे चरित्र सर्वज्ञात असले तरी त्यांच्या वैयक्तिक जीवनातील काही घटनांना आनंदीबाईंच्या दृष्टिकोनातून येथे अधोरेखित केले आहे. 'मिनी सासरी

जाते’ आणि ‘लीली वयात येते’ या दोन कथांमध्ये दोन तरुण व अल्लड मुलींच्या विवाहाच्या निमित्ताने घडलेल्या गमतीजमतींची वर्णने येथे केली आहेत.

लेखिकेने म्हटल्याप्रमाणे या अवनीवरील प्राणिमात्रांचे वंशसातत्य टिकविण्यासाठी नर आणि मादी यांमधले आकर्षण आणि शारीरिक संबंध ही निसर्गसुंदर आणि सहजप्रेरणा आहे आणि ती सामर्थ्यशाली आहे. मनुष्यप्राण्याच्या बाबतीत हेच शारीरिक संबंध त्यांच्या जीवनात प्रचंड उलथापालथ करू शकतात, एवढे ते प्रबळ आहेत. या संग्रहातील उर्वरित कथांमधून याचीच प्रचीती येते. स्त्री-पुरुष नातेसंबंध चितारताना कधी पती-पत्नी तर कधी मित्र-मैत्रीण तर कधी प्रेमाचा त्रिकोण यामधून जुळून आलेले संबंध, कधी गरज म्हणून कधी हौस म्हणून तर कधी स्वार्थ साधण्यासाठी व्यवहार म्हणून जोडलेल्या शारीरिक संबंधांमुळे निर्माण झालेल्या ताणतणावांना येथे शब्दबद्ध केले आहे.

विवाहानंतर थोड्याच दिवसांत पती परदेशी गेल्यावर आणि तो परत आल्यावर लगेचच पुन्हा कधीच परत न येण्यासाठी निघून गेल्यावर ‘क्षमाला’ सोसाव्या लागलेल्या एकाकीपणाची कथा (अंधारयात्रा), शरीरसुखाची आस आणि संसारसुखाची अभिलाषा असलेल्या सुमाची मानसिक घालमेल (आस), सुधाकर, नंदिनी आणि उमा आणि वैदेही-नितीश आणि त्याची मैत्रीण अशा प्रेमाच्या त्रिकोणातील परस्पर नात्यांची कथा (सखी) पत्नीच्या निधनामुळे एकाकी जीवन जगत असलेले अण्णा आणि देवपूजा करीत असताना त्यांचे झालेले निर्वाण (खेळ त्याचा), केवळ श्रीमंत पत्नी हवी म्हणून आपल्याशी विवाह केला आहे हे माहीत असूनही आणि पती देखण्या मुलीच्या प्रेमात पडल्यावरही सर्व सोशिकपणे सहन करणारी देवकी (फक्त तुझाच), मराठी भाषेच्या प्राध्यापकाशी विवाहबद्ध झालेल्या प्रतिभावंत लेखिका वसूची मानसिक आंदोलने (तुझा नि माझा एकपणा, कसा कळावा शब्दांना) आणि दुसऱ्या स्त्रीशी घरोबा करून मनाने दुरावलेल्या पती, सासू-सासऱ्यांनी अवाजवी लाड केल्याने व्यसनाधीन झालेला मुलगा आणि सासू-सासऱ्यांपासून होणारा मानसिक छळ अशा कोंडीत सापडलेल्या संपदाची कहाणी (प्रतिमा) अशा या कथांमधून पती-पत्नी यांच्या शारीरिक संबंधांबरोबरच त्यांच्या भावनिक नातेसंबंधांवर येथे प्रकाश टाकला आहे.

या संग्रहातील ‘गंध फुलांचा गेला सांगून’, ‘लागी न दृष्ट माझी माझ्याच वैभवाला’ आणि ‘निर्माल्य’ या कथा पात्रांच्या मनोगतांमधून उलगडत गेल्या आहेत. प्रेमाची प्रतारणा झालेल्या अश्विनीची कथा (गंध फुलांचा), श्रीमंतीचा सोस असलेली सासू आणि मध्यमवर्गीय संस्कृतीचे जतन करणारा पती लाभलेल्या एका गरीब मुलीची कथा (लागो न दृष्ट...) आणि स्वत:च्या पतीला आजारातून बरे करण्यासाठी मित्राच्या कंपनीत नोकरी मिळवून स्वत:ला समर्पित करून पतीचे प्राण वाचवून स्वत: आत्महत्या करणारी शीला (निर्माल्य) अशा कथांमधून कथांच्या नायिकांच्या मनोभावना

सूक्ष्मपणे चितारल्या आहेत.

अशा प्रकारे या संग्रहातील सर्वच कथांमधल्या पात्रांच्या अंतरंगापर्यंत जाऊन त्यामधून दोन व्यक्तींमधील भावनिक गुंतागुंत, त्यांच्यातील संबंध आणि त्यांचे इतरांशी असलेले संबंध उलगडून दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. या कथांमधील पात्रांची वर्तणूक आणि त्यांचे विचार आपल्या सभोवताली वावरणाऱ्या व्यक्तींमधून नेहमी दिसणारे आहेत. तरीही त्यांचं अंतरंग जाणून घेण्यासाठी या कथा वाचावयास हव्यात.

कमलाकर राऊत

लोकसत्ता दि.२३/१०/२०११




# दिवा

**प्रमोदिनी वडके-कवळे**

२७०रु. पोस्टेज २५रु.

गेल्या पन्नास-साठ वर्षांत भारतीय स्त्रियांचे मनोविश्‍व बदलले पण त्यांच्याभोवतीचे वातावरण मात्र बदलले नाही.

समाजाच्या अपेक्षाही बदलल्या नाहीत.

जगण्याची आधुनिक शैली स्वीकारताना स्त्रियांनी पारंपरिक बाज सांभाळावा आणि मध्यममार्गी जगण्याच्या चौकटीत राहूनच जगाचा वेध घ्यावा, अशी समाजाची अपेक्षा असते.

अशा तळ्यातमळ्यात जगणाऱ्या स्त्रियांचा आणि त्यांनी आपल्या परीने सोडवलेल्या काही सामाजिक समस्यांचा वेध.

सहजसुंदर भाषा आणि ओळखीचं वातावरण, यामुळे या कथांतली पात्रं मनाचा अलगद ठाव घेतात.

# पुरस्कार



### * साहित्यसम्राट न. चिं. केळकर पुरस्कार

''हरवलेल्या माणसाला त्याचा चेहरा मिळवून देण्याची जबाबदारी साहित्याची आहे. साहित्य जीवनस्पर्शी असावे. तरुणाईची स्पंदने, त्यांच्या संवेदना टिपणाऱ्या साहित्याची निर्मिती ही काळाची गरज आहे. नव्या पिढीचा अक्षरावरील विश्वास वाढवून हे नाते दृढ करणाऱ्या साहित्यनिर्मितीचा प्रयत्न झाला पाहिजे..'' अशी अपेक्षा उत्तम कांबळे यांनी व्यक्त केली.

पुणे मराठी ग्रंथालयाच्या शताब्दी वर्धापनदिनानिमित्त मोहन दाते यांच्या हस्ते कांबळे यांना साहित्यसम्राट न. चिं. केळकर पुरस्कार प्रदान करण्यात आला.''हरवलेल्या माणसाला त्याचा चेहरा मिळवून देण्याची जबाबदारी साहित्याची आहे. साहित्य जीवनस्पर्शी असावे. तरुणाईची स्पंदने, त्यांच्या संवेदना टिपणाऱ्या साहित्याची निर्मिती ही काळाची गरज आहे. नव्या पिढीचा अक्षरावरील विश्वास वाढवून हे नाते दृढ करणाऱ्या साहित्यनिर्मितीचा प्रयत्न झाला पाहिजे,'' अशी अपेक्षा उत्तम कांबळे यांनी व्यक्त केली.

कांबळे यांच्या हस्ते साहित्यिक वसंत आबाजी डहाके, प्रा. प्र. के. घाणेकर आणि लेखिका मीना देशपांडे यांना केळकर पुरस्कार; तर भिवंडी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर ग्रंथालयाचे ग्रंथपाल शरद मराठे यांना ग्रंथालय कार्यकर्ता पुरस्कार प्रदान करण्यात आला. डहाके यांच्या वतीने मंगेश काळे यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

कांबळे म्हणाले, ''ग्रंथालय चालविणे हे कठीण काम असते. माणसाला वाचनाला प्रवृत्त करणे अवघड असते. माणसाला घडविणारी ही समृद्धी आणि संसार दुसऱ्या पिढीच्या हाती देणार आहोत. पण ही पिढी ग्रंथांच्या किती जवळ आहे याचा विचार लेखकांनी आणि ग्रंथालयांनी केला पाहिजे. युवा पिढीने वाचावे असे साहित्य गेल्या दशकामध्ये आले का, जे आले त्याचा जीवनाशी किती संबंध आहे याची

चिकित्सा केली पाहिजे. स्वातंत्र्य, समाजप्रबोधन, ज्ञान आणि विज्ञानाच्या या चळवळीत नवीन वर्ग वाढला पाहिजे. केशवसुत, आचार्य अत्रे आणि नारायण सुर्वे यांनी केलेल्या नव्या माणसाचे स्वागत माझे साहित्य करते का, याचा विचार करावा. साहित्यामध्ये जीवनाचे दर्शन होत नसेल तर ते टरफलासारखे उडून जाईल.''

मीना देशपांडे म्हणाल्या, ''शरीराप्रमाणे मनाला आणि साहित्याला वय नसते. मनापासून लेखन करावेसे वाटते तेव्हाच साहित्यनिर्मिती होते. माझे वडील आचार्य अत्रे हेच संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील हुतात्मा आहेत, या भावेनतून मी कादंबरीचे लेखन केले. ही एक सुरुवात आहे.''

घाणेकर म्हणाले, ''मी स्वत:ला साहित्यिक मानत नाही. माझे लेखन ही प्रवासवर्णनाची माहिती घेण्याच्या दृष्टीने शिडी ठरावी.''

### * रत्नाकर मतकरी यांना विष्णुदास भावे गौरव पदक

अखिल महाराष्ट्र नाट्य विद्यामंदिर समितीचे 'विष्णुदास भावे गौरव पदक' ज्येष्ठ नाटककार व प्रयोगशील दिग्दर्शक रत्नाकर मतकरी यांना देण्यात आले.५ नोव्हेंबर रोजी रंगभूमी दिनानिमित्ताने अखिल भारतीय नाट्यंसमेलनाचे अध्यक्ष राम जाधव यांच्या हस्ते देण्यात आले.

पुरस्काराचे यंदाचे ४६ वे वर्ष आहे. या आधी हा पुरस्कार बालगंधर्व, पु. ल. देशपांडे, श्रीराम लागू, केशवराव दाते, प्रभाकर पणशीकर, निळू फुले, सुधा करमरकर, दुर्गा खोटे, आचार्य अत्रे, मास्टर कृष्णराव, शरद तळवलकर, नानासाहेब पाठक, मामा पेंडसे यांसारख्या दिग्गज नाट्यकर्मींना मिळाला आहे.

'अश्वमेघ', 'चि. सौ. कां. चंपा गोवेकर', 'समोरच्या घरात', 'अजून यौवनात मी', 'वर्तुळाचे दुसरे टोक', 'सत्तांध', 'चार दिवस प्रेमाचे', 'जादू तेरी नजर' यासारख्या ३८ नाटकांचे लेखन मतकरी यांनी केले आहे. त्यांना यापूर्वी जोत्स्ना भोळे पुरस्कार (१९७८), देवल पारितोषिक (१९८५), अत्रे फाऊंडेशन पुरस्कार (१९८५), राज्य शासनाचा गडकरी पुरस्कार (१९९५), संगीत नाटक अकादमी (२००३), फाय फाउंडेशन (२००५), दूरदर्शनचा साहित्यरत्न पुरस्कार (२०११) अशा विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. नाट्यलेखनाबरोबरच त्यांनी एकांकिका, कथासंग्रह, कादंबऱ्या, ललित लेख, वैचारिक लेख, बालसाहित्य अशा विविध स्तरातील लेखन त्यांनी केले आहे.

### * ज्येष्ठ संगीतकार यशवंत देव यांना पुरस्कार

'या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे' असे सांगणाऱ्या यशवंत देव यांना राज्य सरकारचा गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार लताबाईंच्या ८२ व्या वाढदिवशी प्रदान करण्यात आला.

या वेळी यशवंत देव यांनी पुरस्कारासोबत मिळालेली दोन लाख रुपयांची रक्कम श्रीनिवास खळे यांच्या कुटुंबीयांना देण्याचे जाहीर केले. ''गानसम्राज्ञी लता मंगेशकर हा मानाचा पुरस्कार मिळण्यासाठी २० वर्षे वाट पाहावी लागली; अखेर तो मिळाला. सरकारही अखेर देव मानायला लागले,'' अशा मिस्किल शैलीत यशवंत देव यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

'काल कालच्या संगीताने लाभला प्राण, आज आजच्या संगीताने गुदमरतो प्राण' असे मनोगत सध्याच्या संगीताबद्दल यशवंत देव यांनी व्यक्त केले. यशवंत देव यांच्या 'अखेर सरकार देव मानायला लागले,' या वाक्यावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी, 'मी आणि मुख्यमंत्री देव मानतो; परंतु अंधश्रद्धेच्या विरोधात आहोत. मात्र मंचावर बसलेल्या काही गंडादोरे घातलेल्या तुमच्या गावच्या मंत्र्यांना कोण सांगणार,' असे उत्तर दिले.

मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी गीतकार, संगीतकार, गायक, शिक्षक अशा सगळ्याच भूमिका यशस्वी करणारे देव आपल्या महाराष्ट्रात आहेत, हा आपला सन्मान आहे, अशी भावना व्यक्त केली.

*** द. भि. कुलकर्णी यांना जीवनगौरव पुरस्कार**

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष, समीक्षक डॉ. द. भि. कुलकर्णी यांना नागपूरच्या पद्मगंधा प्रतिष्ठानचा जीवनगौरव पुरस्कार देण्यात आला. आहे. अकरा हजार रुपये, मानपत्र, सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. नागपुरातील सायंटिफिक सभागृहात सांस्कृतिक कार्यमंत्री संजय देवतळे व संस्कृत विद्यापीठाचे कुलगुरू पंकज चांदे यांच्या उपस्थितीत पुरस्कार देण्यात आला. यापूर्वी बाबा आमटे, बाबासाहेब पुरंदरे, जयंत नारळीकर, रघुनाथ माशेलकर यांना हा पुरस्कार लाभला होता.

मुंबई विद्यापीठाच्या माजी मराठी विभाग प्रमुख प्रा. उषा देशमुख यांना स्त्रीशक्ती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

*** सिद्धार्थ मुखर्जी यांना 'पुलित्झर प्राइझ'**

भारतीय वंशाचे अमेरिकी लेखक सिद्धार्थ मुखर्जी यांच्या 'द एम्परर ऑफ ऑल मॅलडीज : ए बायोग्राफी ऑफ कॅन्सर' या पुस्तकाला ललितेतर विभागात यंदाचा पुलित्झर पुरस्कार मिळाला आहे. मुखर्जी डॉक्टर असून कॅन्सरचे संशोधक आहेत.

कॅन्सरसारख्या जीवघेण्या आजारावर उपचार शोधून काढण्याचे अनेक प्रयत्न होऊनही मेडिकल सायन्ससाठी कॅन्सर हा रोग अजूनही आव्हानच ठरला आहे. त्यामुळे कॅन्सरच्या इतिहासापासून ते त्यावरील उपचार आणि संशोधनावर आधारित मुखर्जी यांचे पुस्तक केवळ नॉनफिक्शन विभागात नव्हे तर कोणत्याही विभागातील

पुलित्झरसाठी पात्र आहे, असे निवड समितीने म्हटले आहे. मुखर्जी हे कोलंबिया विद्यापीठात मेडिसीन विभागात सहायक प्रोफेसर आहेत. तसेच कोलंबिया विद्यापीठ मेडिकल सेंटरमध्ये ते प्रॅक्टिस करतात. स्टॅनफोर्ड, ऑक्सफर्ड आणि हार्वर्ड विद्यापीठांतून त्यांनी शिक्षण घेतले आहे. त्यांचे अनेक लेख नेचर, न्यू इंग्लंड जर्नल ऑफ मेडिसीन, न्यूयॉर्क टाइम्स आणि द न्यू रिपब्लिक या मासिकांतून, वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाले आहेत. मुखर्जी यांनी आपल्या पुस्तकात कॅन्सरसंबंधीचे शोध, उपचारातील अपयश, विजय आणि मृत्यू यांचा आढावा घेतला आहे. तीन दशकांपूर्वी कॅन्सरवर मात करणे सहज शक्य होईल असे वाटत होते. परंतु तसे झाले नाही, असे ते पुस्तकात सांगतात. इतिहासाची दृष्टी आणि चरित्रकाराचा उत्साह यामुळे हे पुस्तक मेडिकल क्षेत्रासंबंधी असले तरी रोमांचकारी वाटते. पुलित्झर समितीने या पुस्तकाला कॅन्सरचे चरित्र असे संबोधले आहे. कॅन्सर बरा होणे, त्यावर नियंत्रण आणणे आणि त्यावर विजय मिळवणे या लढाईचे वर्णन करण्यासाठी मुखर्जी यांनी ल्युकेमिया झालेल्या कार्ला या पेशंटच्या कहाणीचा आधार घेतला आहे.

कॅन्सरवरील भविष्यकालीन उपचारासंबंधी माहिती देऊन त्यांनी पेशंटची आशा जागविली आहे.

## * 'आभाळ गोंधण' काव्यसंग्रहास गदिमा साहित्य पुरस्कार

महाराष्ट्र कामगार साहित्य परिषद व लायन्स क्लब भोजापूर गोल्ड यांच्या सहकार्याने देण्यात येणारा गदिमा साहित्य पुरस्कार कवी जिजाबराव वाघ यांच्या 'आभाळ गोंधण'काव्यसंग्रहाबद्दल २ ऑक्टोबर रोजी पुणे येथे आयोजित अकराव्या गदिमा कविता महोत्सवात देण्यात आला. विधानसभेचे सभापती दिलीप वळसे-पाटील, श्रीधर माडगूळकर, रवींद्र आवटी, प्रा. डॉ. विठ्ठल वाघ, अरुण सेठ उपस्थित होते.

## * मकरंद साठे यांना गंगाधर गाडगीळ पुरस्कार

''वेगळ्या जीवनदृष्टीतून साहित्यात रूढ संकेतांपेक्षा वेगळी मांडणी करू पाहणाऱ्या लेखकांना अनेक अडचणी येतात. अशा अडचणींवर मात करण्याची माझी उमेद या पुरस्काराने निश्चितच वाढणार आहे...'' या शब्दांमध्ये नाटककार मकरंद साठे यांनी 'गाडगीळ पुरस्कार' मिळाल्याबद्दलचा आनंद व्यक्त केला. आपल्या वैशिष्ट्यपूर्ण योगदानाने मराठी साहित्य समृद्ध करणाऱ्या लेखकाचा गौरव या पुरस्काराने केला जातो.

'चारशे कोटी विसरभोळे' या आपल्या पहिल्याच नाटकाने मकरंद साठे यांनी जाणकारांचे लक्ष वेधून घेतले होते. नव्या नाट्यप्रतिभांना उत्तेजन देणाऱ्या थिएटर ॲकॅडमी व फोर्ड फाउंडेशन यांच्या योजनेतून त्यांचे नाव प्रथम प्रकाशात आले.

वर्तमानातल्या भवतालाला भिडून प्रखरपणाने व्यक्त होणाऱ्या वेगळ्या शैलीतील त्यांच्या लेखनाने पुढे राष्ट्रीय पातळीवरही आपली मुद्रा उमटवली. 'सूर्य पाहिलेला माणूस', 'सापत्नेकरांचे मूल', 'ठोंब्या', 'गोळायुग', 'चौक' ही दिग्दर्शक अतुल पेठेंच्या साथीने आलेली त्यांची नाटके समांतर रंगभूमीवर गाजली. 'ते पुढे गेले...' हे त्यांचे अलीकडचे नाटक. 'अच्युत आठवले आणि आठवण' व 'ऑपरेशन मनू' या त्यांच्या कादंबऱ्यांचीही समीक्षकांनी दखल घेतली. गेली तीन वर्षे ते मराठी रंगभूमीच्या सामाजिक-राजकीय इतिहासाचा अभ्यास करीत आहेत. त्यातून सिद्ध होणारा 'मराठी रंगभूमीच्या तीस रात्री : एक सामाजिक राजकीय इतिहास' हा अंदाजे १८०० पानांचा बृहत्ग्रंथ तीन खंडांत प्रकाशित झाला आहे.

वासंती गंगाधर गाडगीळ ट्रस्टच्या वतीने दर तीन वर्षांनी दिला जाणारा पुरस्कार या आधी श्याम मनोहर, रत्नाकर मतकरी, विलास सारंग, वसंत आबाजी डहाके आणि नामदेव ढसाळ यांना मिळाला आहे. यंदाच्या निवडीसाठी प्रा. सुधा जोशी, डॉ. हरिश्चंद्र थोरात व डॉ. चंद्रशेखर जहागीरदार यांची समिती होती.

*** कमलाकर नाडकर्णी यांना 'गोखले पुरस्कार'**

नाट्यक्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल गोखले परिवारातर्फे देण्यात येणारा 'विद्याधर गोखले स्मृती पुरस्कार' यावर्षी ज्येष्ठ नाट्यसमीक्षक कमलाकर नाडकर्णी यांना २५ सप्टेंबरला गोखले यांच्या पंधराव्या स्मृतीदिनी ज्येष्ठ पत्रकार अरुण टिकेकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. पाच हजार रुपये रोख, शाल श्रीफळ आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

*** प्र. के. घाणेकर यांना 'स्नेहांजली पुरस्कार'**

डॉ. अनिल अवचट यांच्या हस्ते दुर्गलेखक प्रा. प्र. के. घाणेकर यांना 'स्नेहांजली' पुरस्कार प्रदान करण्यात आला. 'एकता' मासिकाचे संपादक विद्याधर ताठे, अनिल बळेल, प्रकाशक रवींद्र घाटपांडे उपस्थित होते. यावेळी बळेल यांच्या 'ज्ञानपीठ त्रिमूर्ती' आणि मृणालिनी जोशी यांच्या 'शंकरलीला' या पुस्तकांचे प्रकाशन झाले.

डॉ. अवचट म्हणाले, मराठी साहित्यविश्वातील अनेकांची 'ज्ञानपीठ' मिळविण्याची पात्रता आहे. त्यांना हा पुरस्कार मिळाला असता तर देशाचा सन्मान वाढला असता. मात्र आजच्या काळात त्यासाठी लॉबिंग करावे लागते.

घाणेकर यांनी भ्रमंतीद्वारे अनेक गड-किल्ल्यांची आणि हिमालयाची माहिती देऊन निसर्गाचा आम्ही एक भाग आहोत ही भावना वाढवली आहे. ''भ्रमंतीचा छंद असणारे लोक आता कमी होत आहेत. देवळामध्ये जाऊन देवाला सोन्याच्या वस्तू अर्पण करण्यापेक्षा रंजल्या-गांजल्यांना मदत करण्याची गरज आहे. छंदामुळे भटकंती

करताना आवडलेले विषय लिहिण्याचा प्रयत्न केला असे घाणेकर म्हणाले.

रवींद्र घाटपांडे यांनी प्रास्ताविक केले. सुप्रिया अत्रे यांनी सूत्रसंचालन केले.

*** जे. जी फॅरेल यांचा गौरव**

वाग्दत्त वधूच्या शोधात निघालेल्या सैनिकाची भावस्पर्शी कथा चितारणाऱ्या जे. जी. फॅरेल यांच्या 'ट्रबल्स' या कादंबरीला 'बुकर'ने मानाचा मुजरा केला आहे. चाळीस वर्षांपूर्वी प्रकाशित झालेल्या या वाचकप्रिय पुस्तकाला 'लॉस्ट बुकर प्राइझ' देऊन गौरविण्यात आले आहे.

फॅरेल यांनी 'ट्रबल्स' या कादंबरीत १९१९ चा कालखंड चितारला आहे. पहिले महायुद्ध संपल्यानंतर मेजर ब्रँडन आर्चर हा लष्करी अधिकारी अँजेलिना स्पेन्सर या महिलेच्या शोधासाठी आयर्लंडच्या मोहिमेवर निघतो. ही स्त्री आपली वाग्दत्त वधू असल्याची त्याची खात्री असते. आर्चरचा प्रवास आणि त्याला जाणवलेल्या मानवी भावभावनांच्या अनुभवांचे अत्यंत भावस्पर्शी चित्र फॅरेलने या कादंबरीत चितारले आहे. मात्र, १९७० च्या सुमारास 'बुकर'ने आपले पात्रता निकष बदलल्यामुळे ही कादंबरी बुकर पुरस्कारासाठी नामांकन मिळविण्यातही अयशस्वी ठरली होती. बदललेल्या निकषामुळे पुरस्कार मिळू न शकलेल्या साहित्यकृतींचा सन्मान करण्यासाठी 'बुकर'ने 'लॉस्ट बुकर प्राइझ' देण्याची प्रथा सुरू केली आणि चार दशकांनंतर 'ट्रबल्स'ला न्याय मिळाला.

हा पुरस्कार 'ट्रबल्स'ला देण्यात यावा यासाठी आंतरराष्ट्रीय वाचक संघटनेने तब्बल ३८ टक्के मते या कादंबरीच्या पारड्यात टाकली.

फॅरेल यांचे १९७९ मध्ये निधन झाले. तत्पूर्वी त्यांनी दर्जेदार साहित्य निर्मिती केली होती. त्यांच्या 'एम्पायर ट्रायोलॉजी'च्या मालिकेतील 'ट्रबल्स' ही पहिली कादंबरी होती. त्यांनतर याच मालिकेत त्यांनी 'द सिज ऑफ कृष्णपूर' (१९७३) आणि 'द सिंगापूर ग्रिप' (१९७८) या दोन लोकप्रिय आणि समीक्षकांच्या दृष्टीने सकस कादंबऱ्या लिहिल्या. त्यापैकी 'द सिज ऑफ कृष्णपूर' या कादंबरीला १९७३ मध्ये 'बुकर'ने सन्मानित करण्यात आले होते. 'बुकर'ला ४० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने २००८ मध्ये हा विशेष पुरस्कार सुरू करण्यात आला होता.

'लॉस्ट बुकर प्राइझ' साठी यंदा ७० च्या दशकातील 'ट्रीज' (नीना बॉडेन), 'द बे ऑफ नून.'(शर्ली हॅझर्ड), 'द ड्रायव्हर्स सीट' (म्युरिल स्पार्क), 'द व्हायव्हिसेक्टर' (पॅट्रिक व्हाइट) या कादंबऱ्यांना नामांकन मिळाले होते.

या पुरस्कारासाठी 'मान बुकर'च्या संकेतस्थळावरून मतदान करण्यात आले. त्यातून सहा कादंबऱ्यांची निवड करण्यात आली. या प्रक्रियेनंतर तीन सदस्यांच्या निवड मंडळाने 'ट्रबल्स'वर शिक्कामोर्तब केले. १९७० आणि ७१ मध्ये 'बुकर'च्या

निवड मंडळाच्या अध्यक्ष लेडी अँटोनिया फ्रेझर यांनी 'लॉस्ट बुकर प्राइझ'च्या विजेत्या कादंबरीची घोषणा केली. फेरेल यांचे बंधू रिचर्ड फॅरेल यांनी जे. जी. फॅरेल याच्या वतीने हा पुरस्कार स्वीकारला.

### * शिराज मिनवाला यांना भटनागर पुरस्कार

न्यूटनच्या गुरुत्वाकर्षणाच्या सिद्धांताचा नव्याने ऊहापोह करत हा सिद्धांत क्लिष्ट अशा 'स्टिंग थेअरी'शी कसा मिळताजुळता आहे, हे सांगणारे तरुण शास्त्रज्ञ शिराझ मिनवाला (वय३८) यांना शांतिस्वरूप भटनागर पुरस्कार जाहीर झाला. ते टाटा मूलभूत सशोधन संस्थेत काम करतात. वयाच्या सातव्या वर्षीच वैज्ञानिक होण्याचे ठरवून. बालवयात मिनवाला ग्रह-ताऱ्यांच्या दुनियेत रमले. कुलाबा येथील चॅम्पियन स्कूलमध्ये शिकतानाही विज्ञान शिक्षकांशी वाद-विवाद करण्यात ते पटाईत होते. सेंट झेविअर्स कॉलेजमधून भौतिकशास्त्रात पदवी मिळवून त्यांनी कानपूर आयआयटीत पदव्युत्तर अध्ययन केले. राष्ट्रपतींचे सुवर्णपदक मिळाले. यानंतर पीएच.डी.साठी ते न्यूजर्सीच्या प्रिन्स्टन विद्यापीठात गेले. तेथे त्यांनी ब्रान्स आणि होलोग्राफी या विषयात प्रबंध सादर केला. हार्वर्ड सोसायटी, एनएसएफ अमेरिकन राष्ट्राध्यक्ष करिअर फेलोशिप त्यांना मिळाल्या. सन २०००मध्ये पीएच.डी. होताच ते हार्वर्ड विद्यापीठात सहायक प्राध्यापक झाले. २००९ पासून ते टीआयएफआरमध्ये थेरॉटिकल फिजिक्स विभागात सहायक प्राध्यापक आहेत. भौतिकशास्त्रातील मूलभूत संकल्पनांचा अभ्यास करताना त्यांना 'स्टिंग थेअरी' चे सूत्र सापडले. जगभरातील वैज्ञानिकांना क्लिष्ट वाटणारी ही थिअरी ते सहज गप्पा मारताना सांगू लागले. त्यांनी गेज-ग्रेव्हिटी ड्युॲलिटी क्षेत्रातही काम केले. त्यांना गेल्या वर्षी 'इंटरनॅशनल सेंटर फॉर थेरॉटिकल फिजिक्स'चा पुरस्कार मिळाला. भौतिकशास्त्रातील स्टिंग थिअरी गुरुत्वाकर्षण सिद्धांताशी मिळतीजुळती आहे. या नव्या संशोधनामुळे 'फ्लूट ड्राइव्ह' या संकल्पनेतील गूढ उकलेल असा त्यांचा दावा आहे. भविष्यात ते आइन्स्टाईनच्या सिद्धांताची 'क्वांटम थिअरी' जगासमोर आणणार आहेत.

### * ख्रिस्ती साहित्य पुरस्कारांचे वितरण

''सध्याच्या काळामध्ये साहित्य लेखनाचा परीघ विस्तारत चालला आहे. कारण व्यवस्थेने लादलेले जगणे आपण जगत आहोत, याचे भान नव्या पिढीला आहे.'' असे मत पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे विभागप्रमुख डॉ. मनोहर जाधव यांनी व्यक्त केले.

ख्रिस्ती साहित्य प्रसारक या संस्थेच्या ५१ व्या वर्धापनदिनानिमित्त साहित्य पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. डॉ. अशोक कामत प्रमुख पाहुणे म्हणून

उपस्थित होते.

आसाराम लोमटे यांना 'आलोक' कथासंग्रहासाठी आणि सायमन मार्टिन यांना 'देवाशी संवाद' या काव्यसंग्रहासाठी पुरस्कार प्रदान करण्यात आला, तर मुकुंद गायकवाड यांच्या 'गुलमोहर' या काव्यसंग्रहाची 'लक्षवेधी काव्यसंग्रह' म्हणून निवड करण्यात आली.

डॉ. जाधव म्हणाले, ''भाषा ही जीवनानुभवातून येते. हीच भाषा जगण्याने आणि संस्कृतीमुळे प्राप्त झालेली असते. त्यामुळे ती थेट आपल्या मनाला भिडते. अशा वातावरणात निर्माण होणारे साहित्य हे कधीच कृत्रिम नसते. चांगल्या लेखकाला साहित्य लिहिताना कसरत करावी लागत नाही. कारण, ते वास्तववादी जगण्यातून आलेले असते. हे समजण्याचा अभ्यासकांमध्ये उमदेपणा हवा.''

डॉ. कामत म्हणाले, साहित्यासाठी स्वत:ला वाहून घेण्याचे काम ख्रिस्ती साहित्यिकांकडून घडत गेले. मात्र, मिशनऱ्यांच्या लेखनामागची कारणे वेगवेगळी होती. कला, साहित्य व माणसाला जोडणारे दुवे धर्म संप्रदायापलीकडे असतात.'' अनिल दहिवाडकर यांनी प्रास्ताविक तर ज्योती गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले.

*** पंडित विजय घाटे यांना सरस्वती राणे पुरस्कार**

किराणा घराण्याची गायकी शुद्ध, मुलायम व आत्मानंद देणारी आहे. याच गायकीचा समृद्ध ठेवा सरस्वतीबाई राणे यांनी त्यांच्या शिष्यांना दिला, अशी भावना ज्येष्ठ गायक सुरेश साखवळकर यांनी व्यक्त केली.

किराणा घराण्याचे अध्वर्यू उस्ताद करीम खाँसाहेब व गानसरस्वती सरस्वतीबाई राणे यांच्या स्मृतीनिमित्त 'सरस्वती संगीत ॲकॅडमी' व 'प्रबोधन विचारधारा' यांच्या वतीने ९ ऑक्टोबर रोजी एका मैफलीचे आयोजन करण्यात आले होते.

प्रसिद्ध तबलावादक पं. विजय घाटे यांना आमदार चंद्रकांत मोकाटे यांच्या हस्ते 'सरस्वती राणे पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले.

पुरस्काराबाबत घाटे म्हणाले, माझ्या कारकिर्दीचा एक छोटा पल्ला पूर्ण झाला आहे. आणखी खूप काही करायचे शिल्लक आहे. पुरस्कार म्हणजे मी योग्य दिशेने वाटचाल करीत असल्याचा संकेत आहे. एका मोठ्या कलाकाराच्या नावाच्या पुरस्कारासाठी एका तबलावादकाची निवड झाली, याचा विशेष आनंद वाटतो.

साखवळकर म्हणाले, किराणा घराण्याला वंदन करण्याचा आजचा दिवस आहे. या घराण्याचे अध्वर्यू उस्ताद करीम खाँसाहेब यांच्यापासून सवाई गंधर्व, गंगुबाई हनगल, सरस्वती राणे, पं. भीमसेन जोशी आदीपर्यंत किराणा घराण्याची गायकी तंतुवाद्याचा मागोवा घेणारी आहे. सरस्वतीबाईंकडे शिकण्याचे भाग्य मला मिळाले. समृद्ध गायकी त्यांनी शिष्यांना दिली.

पं. गिरीश संझगिरी यांनी 'पुरिया धनाश्री' रागाने मैफलीला सुरुवात केली. त्यानंतर पं. घाटे यांचे एकल तबला वादन झाले.

मीना फातर्पेकर यांनी 'मारूबिहाग' सादर केला. शुभा मुदगल यांनी मैफलीची सांगता केली. पं. अनिश प्रधान व हनुमंत फडतरे यांनी तबल्यावर, तर सुधीर नायक व प्रमोद मराठे यांनी हार्मोनियमवर साथसंगत केली.

*** डॉ. खडसे यांना पारितोषिक**

हिंदी साहित्यामध्ये मोलाची कामगिरी केल्याबद्दल प्रसिद्ध साहित्यिक डॉ. दामोदर खडसे यांना भारत सरकारच्या केंद्रीय हिंदी संस्थानचे 'गंगाशरणसिंह पारितोषिक' जाहीर झाले आहे. आग्रा येथील ही संस्था असून खडसे यांना राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते हे पारितोषिक दिले जाणार आहे. खडसे यांची ४२ पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

*** प्रा. रमेश वानखेडे यांना पारितोषिक**

समर्थन अभिव्यक्ती समर्थन पत्रकार संघटना, अग्निपंख सामाजिक संस्थेच्या वतीने 'माहिती अधिकार कायदा-यशोगाथा' राज्यस्तरीय अनुभव लेखनस्पर्धेत पुणे येथील मागासवर्गीय शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. रमेश वानखेडे यांना पारितोषिक देण्यात आले.

*** मुश्ताक अहमद यांना मुन्शी प्रेमचंद पुरस्कार**

हिंदी आणि उर्दू भाषेचे प्रसिद्ध लेखक काझी मुश्ताक अहमद यांना महाराष्ट्र राज्य हिंदी अकादमीचा मुन्शी प्रेमचंद पुरस्कार प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमाला सांस्कृतिक मंत्री संजय देवतळे, राज्यमंत्री फौजिया खान, डॉ. दामोदर खडसे उपस्थित होते.

❐



**आय डेअर**

**७वी आवृत्ती**

**किरण बेदी : अनु. आशा कर्दळे**

झुंजार व्यक्तिमत्त्वाची सुबोध ओळख

२५०रु. पोस्टेज २५रु.

# वाचकांचा प्रतिसाद



श्री. श्याम भुर्के

आपले ‘आनंदाचे पासबुक’ हे पुस्तक म्हणजे रोजच्या जीवनात कशा तऱ्हेने ‘आनंद घ्यावा - आनंद वाटावा’ याचा परिपाठच आहे. आपल्या व्यवसायाच्या माध्यमातून, व्यक्तिमत्त्वातून, ओळखीपाळखीतून दुसऱ्यांना केलेल्या मदतीतील आनंद हा आयुष्याच्या जमा-खर्च वहीत नेहमी शिल्लकच दाखवतो. मोजक्या पण नेमक्या शब्दांतून आपल्या आयुष्यातील अनुभवांची व घटनांची पोतडीच या पुस्तकात उघडून दाखविली आहे. अतिशय सोप्या व वाचकाभिमुख भाषेतून नेमकी कल्पना मनोरंजकरीत्या मांडण्याची व पटविण्याची हातोटी श्री. भुर्के यांना लाभली आहे.

हे पासबुक पुन्हा पुन्हा वाचून आनंदी व्हावे असेच आहे.

श्रीकांत जोशी

खडकी, पुणे ४११ ००३.

---

सुनीति काणे यांना,

आपले ‘इनसाइड द गॅस चेंबर’ हे अनुवादित पुस्तक वाचले आणि अंतर्बाह्य थरारून गेलो. मेहता पब्लिशिंग हाऊस ही प्रकाशन संस्था दर्जेदार पुस्तक प्रकाशनाबद्दल प्रसिद्ध आहेच.

अनुवाद असा जाणवला नाही. मूळ पुस्तकच वाचतो आहोत असे वाटत होते. पुस्तकाचे मुखपृष्ठ, छपाई इत्यादी तांत्रिक अंगे उत्तम आहेत.


द्वेष, सूड किती पराकोटीचा असतो व मन किती बधीर झालेले असते त्याचा हा नमुना. अर्थात भारतीय सोडले तर केवळ जर्मन्स नव्हे तर रशियन, अमेरिकन्स, मोगल, ब्रिटीश, पोर्तुगीज हे सर्वच एका माळेचे मणी आहेत. भारताचे उदाहरण घ्यायचे झाले तर परकीयांनी आपल्या बांधवांचा अपरिमित छळ केला. आपली तशी संस्कृती नाही. आपण पारसी, ज्यू जमातींना आसरा दिला, मानसन्मान दिला.

अशाच उत्तमोत्तम पुस्तकांचा अनुवाद आपण मराठी वाचकांना उपलब्ध करुन द्यावा. आपल्याला पुढील साहित्य सेवेसाठी शुभेच्छा!

अरुण भट

बदलापूर(पूर्व), ठाणे ४२१ ५०३.

# श्रद्धांजली



*** विनायक नारायण उर्फ बाळासाहेब चौधरी**

कोल्हापूर येथील अंजीश कमर्शिअल आर्ट प्रिंटर्सचे चालक श्री. विनायक नारायण चौधरी (वय ८६) यांचे वार्धक्याने निधन झाले. ते प्रभात फिल्म कंपनीत १९५०-५५ पर्यंत साऊंड रेकॉर्डिस्ट होते. देवबाप्पा, शिकस्त, रेल्वे प्लॅटफॉर्म आदि चित्रपटांचे साऊंड रेकॉर्डिंग त्यांनी केले होते. तसेच ते स्काऊट व एन.सी.सी. ऑफिसर होते. कोल्हापूरात मुद्रण व्यवसायात दर्जेदार बुकवर्क व जॉबवर्क, गुजराथी प्रिंटिंग करून त्यांनी चांगला नावलौकिक कमावला होता. गजानन भोगावकर, रॉय किणीकर आणि ग. दि. माडगूळकर यांच्या सोबत त्यांनी 'धरती' मासिक १९७२ ते ७६ पर्यंत चालू ठेवले होते. मेहता पब्लिशिंग हाऊसची अनेक पुस्तके त्यांनी छापली आहेत. ते एक उत्कृष्ट मुद्रितशोधनकार होते. त्यांनी अनेक व्यक्तींना, मुलांना मुद्रितशोधनाचे शिक्षण दिले आहे.

*** ज्येष्ठ अभिनेते, गायक पं. शरद गोखले**

संगीत रंगभूमीवरील गायक-अभिनेते पं. शरद गोखले (वय ७१) यांचे कर्करोगाने २० सप्टेंबर रोजी निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, मुलगा आणि मुलगी असा परिवार आहे. गोखले यांचा जन्म २६ मे १९४० रोजी झाला. वयाच्या १३ व्या वर्षापासून बारा वर्षे त्यांनी पं. विनायकबुवा पटवर्धन यांच्याकडे संगीत अलंकारपर्यंत गायनाचे शिक्षण घेतले. जयराम शिलेदार यांच्या 'मराठी रंगभूमी' संस्थेत ते १९७४ मध्ये दाखल झाले. कीर्ती शिलेदार यांच्याबरोबर त्यांनी सौभद्र, स्वयंवर, शाकुंतल, संशयकल्लोळ, स्वरसम्राज्ञी, विद्याहरण, शारदा, कान्होपात्रा आणि एकच प्याला या संगीत नाटकांतून नायकाच्या भूमिका केल्या. त्यांना नीलकंठबुवा अभ्यंकर यांचा सहवास लाभला. त्याचप्रमाणे रामचंद्र पटवर्धन यांच्याकडून त्यांनी तबलावादनाचे ज्ञान संपादन केले. विनायकबुवांच्या गायनाला तबल्याची साथ करण्याची संधी त्यांना मिळाली. आकाशवाणीचे ते मान्यताप्राप्त कलाकार होते. त्यांनी पुणे विद्यार्थी गृहाचे

महाराष्ट्र विद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालय येथे १९६५ ते १९९९ पर्यंत तांत्रिक अध्यापक म्हणून काम केले. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेतर्फे जीवनगौरव पुरस्कार, पुणे शाखेतर्फे माणिक वर्मा पुरस्कार, सांगलीच्या देवल स्मारक समितीतर्फे नाट्याचार्य गोविंद बल्लाळ देवल पुरस्कार, पुणे महापालिकेतर्फे बालगंधर्व पुरस्कार आणि पुणे मराठी ग्रंथालयाचा पुरस्कार देऊन त्यांना गौरविण्यात आले आहे.

*** नाट्यदिग्दर्शक प्रशांत लाड**

नाट्य-कलादिग्दर्शक, अभिनेते प्रशांत चंद्रकांत लाड यांचे १४ सप्टेंबर रोजी डोंबिवली येथे लिव्हरच्या आजाराने निधन झाले. ते ४९ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, आई, भाऊ असा परिवार आहे. राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांचे ते स्वीय सहाय्यक होते. राष्ट्रपतींकडे ते मराठी, हिंदी भाषेतील पत्रव्यवहार, भाषणे यांचे काम पहात होते.

*** विख्यात 'पियानोस्टार' रॉजर विल्यम्स**

'ऑटम लीव्हज' आणि 'बॉर्न फ्री' यासारख्या लोकप्रिय सुरावटींचे निर्माते आणि पियानोवादक रॉजर विल्यम्स यांचे (वय ८७) स्वादुपिंडाच्या कर्करोगामुळे १५ ऑक्टोबर रोजी राहत्या घरी निधन झाले. १९५०-६० पासून ऐंशीच्या दशकापर्यंत विल्यम्सच्या सुरावटींनी रसिकांना मोहिनी घातली होती

हॅरी ट्रुमन ते जॉर्ज बुश (ज्युनियर) या नऊ अमेरिकेच्या अध्यक्षांच्या कारकीर्दीत त्यांचे अधिकृत निवासस्थान असणाऱ्या 'व्हाइट हाऊस'मध्ये पियानो वादनाचा मान मिळालेले रॉजर विल्यम्स हे एकमेव कलाकार होते. त्यांचे १०० अल्बम्स प्रसिद्ध झाले असून, त्यातील 'रॉजर विल्यम्स प्लेज युवर ऑल टाइम फेव्हरिट' आणि 'द ग्रेटेस्ट पॉप्युलर पियानिस्ट' हे अल्बम विशेष गाजले. 'एमजीएम ग्रॅंड' आणि लास वेगासमधील 'ट्रॉपिकाना' या बॅंडमध्येही त्यांचा सहभाग होता. 'ऑटम विल्यम्स' या अल्बमच्या आतापर्यंत २० लाखांहून अधिक कॉपीज विकल्या गेल्या आहेत.

*** 'ॲग्रोवन'चे सहसंपादक पांडुरंग गायकवाड**

ॲग्रोवन या कृषी दैनिकाचे सहसंपादक व 'लोकसत्ता'चे माजी मुख्य उपसंपादक पांडुरंग मुकुंदा गायकवाड (वय ५३) यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर भोर तालुक्यातील करंदी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुली, मुलगा व दोन भाऊ असा परिवार आहे.गायकवाड यांनी सकाळमधून आपल्या पत्रकारितेच्या कारकीर्दीची सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी 'लोकसत्ता'च्या पुणे आवृत्तीत विविध पदांवर दीर्घ काळ काम केले. प्रत्यक्ष शेती करणारा आणि शेतीच्या प्रश्नांची सर्वांगीण माहिती असलेला पत्रकार म्हणून त्यांची ओळख होती. 'कृषी अर्थशास्त्र' हा त्यांचा अभ्यासाचा विषय होता. त्यांना २००७

मध्ये राज्य शासनाचा वसंतराव नाईक शेतीमित्र राज्यस्तरीय पुरस्कार मिळाला होता.

*** 'मार्मिक'चे सल्लागार संपादक वसंत सोपारकर**

'मार्मिक'चे सल्लागार संपादक वसंत सोपारकर यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. ते ७२ वर्षांचे होते. 'मार्मिक'चे कार्यकारी संपादक पंढरीनाथ सावंत यांच्या सोबत गेली १९ वर्षे ते मार्मिक चे काम पहात होते. त्यांच्या पश्चात पत्नी निशा, मुलगा आदित्य, सून अर्चना व नात आर्या असा परिवार आहे. ज्येष्ठ पत्रकार अनंत काणेकर यांच्या सोबत वसंत सोपारकर यांनी आपल्या पत्रकारितेला सुरवात केली. 'मराठा' मध्ये आचार्य अत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी वृत्तपत्रीय लेखन तसेच वृत्तपत्राची मांडणी यामध्ये प्राविण्य मिळवले. 'वृत्तपत्राची अप्रतिम रचना करणारा' अशी पोचपावतीच आचार्य अत्रे यांनी त्यांना दिली होती. 'श्री'चे कार्यकारी संपादक असताना वसंत सोपारकर यांनी या मासिकाला प्रचंड खप मिळवून दिला. 'चित्रलेखा' मासिकाचे कामही त्यांनी पाहिले. विषयाची निवड, त्याची मांडणी आणि वाचकांना हवे तसे सादरीकरण यात त्यांचा हातखंडा होता. मासिकाची पोस्टर व्हॅल्यू त्यांनी अचूक ओळखली होती. त्यामुळे मुखपृष्ठ सजावटीवर त्यांची बारीक नजर असे.

*** ज्येष्ठ नृत्यदिग्दर्शक सुबल सरकार**

सिनेसृष्टीतील अनेक दिग्गज कलाकारांना नृत्यात पारंगत करणारे ज्येष्ठ नृत्य दिग्दर्शक 'चित्रभूषण' सुबल सरकार यांचे परळ येथील राहत्या घरी प्रदीर्घ आजाराने निधन झाले. ते ७६ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी पूर्णिमा, नृत्यदिग्दर्शक मुलगा सागर नटराज, मुलगी केशुपाल, सून ज्योती, नातू सम्राट असा परिवार आहे. त्यांच्या निधनामुळे नृत्यातील मराठमोळा ठेका हरपल्याची भावना मान्यवरांनी व्यक्त केली आहे. उत्कृष्ट नृत्यदिग्दर्शक राज्य सरकारचे नऊ सन्मान पटकाविणाऱ्या सुबल सरकार यांनी ४०० हून अधिक हिंदी, मराठी चित्रपटांसाठी नृत्यदिग्दर्शन केले आहे. ज्येष्ठ अभिनेत्री जयश्री गडकर, माधुरी दीक्षित, वर्षा उसगांवकर, दादा कोंडके, मिथुन चक्रवर्ती, जॅकी श्रॉफ, अशोक सराफ, लक्ष्मीकांत बेर्डे अशा चित्रपटसृष्टीतील अनेक कलाकारांना त्यांनी नृत्याचे धडे दिले. त्यांच्या निधनाने चित्रपटसृष्टीवर शोककळा पसरली आहे. शिवाजी पार्क स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिन देहावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

❐



## * निषादची स्मृती चिरंतन राहो

२८ नोव्हेंबर २०१०ला पहाटे निषाद देशमुखचा अपघाती मृत्यू झाला. या घटनेला एक वर्ष होऊन गेले असले तरीही त्याच्या अनपेक्षित जाण्याचा धक्का आणि त्यामुळे वाटणारी हळहळ अजूनही कमी झालेली नाही. ही परिस्थिती जे त्याच्याशी चांगले परिचित होते त्यांचीच आहे असं नाही तर ज्यांच्या ज्यांच्या थोड्याफार संपर्कात तो आला होता त्या सर्वांची आहे कारण ज्या प्रकारचं व्यक्तिमत्त्व आपण गमावलं आहे ते कधीही भरून निघणारे नाही.

निषादने मोठ्या हिमतीनं, उमेदीनं, पद्धतशीरपणे सुरू केलेला ग्रंथ प्रकाशनाचा प्रपंच पुढेही चालू राहो, गौतमी प्रकाशनच्या स्वरूपात निषादची स्मृती चिरंतन राहो अशी प्रार्थना आपण करूया.

निषादच्या प्रथमस्मृतीदिनी त्याला भावपूर्ण श्रद्धांजली!

# बालनगरी

**भारतीय साबरी विद्येच्या पार्श्वभूमीवरील अफलातून फँटसी**

**विद्याधरांचे दुकान**

(मागील अंकावरून)

आपल्या घराच्या खिडकीपाशी बंद तावदानावर पडणारे पावसाचे थेंब व त्यांच्या ओघळत्या रेषांनी बनणारी नक्षी पाहत ओम निवांत बसला होता. त्याच्या मनातही वेगवेगळे विचार असेच एकमेकांत गुंतून त्यांची छानशी जाळी तयार होत होती. ते विचार छान होते. ओम खुषीने स्वतःशीच हसला. त्याला ती मजा आठवली. गेल्या मंगळवारी स्थलदर्शनाच्या कार्यक्रमात ते एका नाटकाची तालीम बघायला गेले होते. नाटक इतके विनोदी होते की पाहता पाहता धुंडीला हसू आवरेनासे झाले आणि तो गदागदा हलू लागला! खुर्ची मोडली. गंमत म्हणजे खुर्ची मोडल्याबद्दल नाटकवाले रागावले नाहीत, त्यांनी खुष होऊन धुंडीला दोनदा बटाटेवडे खायला घातले. नाटक हमखास यशस्वी होणार याची त्यांना खात्री पटली म्हणे.

त्याआधीच्या स्थलदर्शनाची आठवण मात्र तितकीशी चांगली नव्हती.

ते सगळे बसडेपो बघायला गेले होते. ओमला एका रिकाम्या बसमध्ये कोणीतरी विदूषकासारखा माणूस असल्याचा भास झाला.की खरेच तो तिथे होता? ओम खात्री करायला आत चढला. बाकी कोणाला कळले नाही. सगळे पुढे गेले. आत कोणी सापडले नाही. अचानक ओमला जाणीव झाली. तो तिथे एकटाच होता. भीतीने घाईघाईने ओम बसमधून बाहेर आला. ओळखीचे कोणीच जवळपास दिसत नव्हते. तो पुढे गेला. तिथे कोणी नव्हते. मग डावीकडे गेला, मग उजवीकडे. प्रत्येक ठिकाणी त्याची निराशा होत होती. सभोवताली इतकी माणसे होती आणि तरीही ओम एकटा होता. गर्दीत हरवलेला. लोकांचे धक्के खात. जाणाऱ्या येणाऱ्यांच्या शिव्या ऐकत. सुन्न!

आताही तो एकटाच होता. स्वतःच्या घरात. एकटा राहू नकोस बजावताना सरलकाकाने तो घरात एकटा सुरक्षित असेल असे गृहीत धरले होते का? तो तसा नव्हता. इथे घरात एकटाच असताना त्याला कायम भीती सतावत असे. बाथरूमच्या दारामागे बसून पारवे घुमत राहत.हुं, हुं. त्या आवाजाने सतत कोणीतरी दबा धरून आपल्याकडे सरकते आहे, अशी त्याला जाणीव होत राही. तो जाड्या कधीही घराचे

दार फोडून आत घुसू शकतो आणि आपला गळा चिरडू शकतो. हा विचार ओमला भेडसावत राही. डेपोत तो सुन्न होऊन मरणाची वाट पाहत बसला. गळा आवळणाऱ्या हातांची.

दोन हात त्याच्यापाशी आले आणि त्यांनी त्याचे डोळे मिटले. हे छोटे नाजूक हात मरणाचे नव्हते. ते जाड्याचे असू शकणार नव्हते. ते, ते...

पंडी. तो एकदम ओरडला.

छट्! चंटी. ती खळखळून हसून म्हणाली होती. ओमला चांगलाच राग आला. ते सर्व त्याची मजा बघत त्याला खेळवत होते का?

नाही. आम्हाला तू खरेच सापडत नव्हतास. सगळे जमल्यावर वागडेंनी त्याला समजावले. सगळ्यांना सोडून काही न कळवता सवरता परस्पर बसमध्ये वगैरे चढल्याबद्दल उलटा दम भरला. त्यादिवशी मुलांना फिरवून आणायची जबाबदारी त्यांची होती ना!



आजोबा वाघडे. नाही. त्यांना आजोबा म्हटले तर राग यायचा. वाघ्या काका म्हणा, म्हणायचे. अंगावर सुरकुत्यांची जाळी पडलेली, सगळे केस पिकून डोक्याला सोडचिठ्ठी देऊन गेलेले. गांधी टोपी घालणारे. मिशा, भिवया पांढऱ्याशुभ्र झालेल्या. चष्म्याच्या काड्यासुद्धा म्हाताऱ्या होऊन खाली वाकलेल्या. दातांचे ते बोळके, त्यात

कवळी ठासली म्हणून काय झाले? डेपोतल्या कॅन्टीनमध्ये समोश्याची कड कडक लागली तेव्हा काढून परत बसवावी लागली, आणि तरी म्हणे म्हातारा न इतुका, मला काका म्हणा. पणजोबा म्हणायला हवे खरे तर. ओम आतासुद्धा मनोमन वैतागला, त्यावेळी तिथे तो उपदेश ऐकताना वैतागला होता तसाच!

मग पंडीला का नाही असा उपदेश केला? गेल्या बुधवारी ते लोक वार्तालापाच्या कार्यक्रमात पर्यावरणतज्ज्ञ डॉ. आयझॅकच्या व्याख्यानाला गेलेले. प्लास्टिक वापरू नका म्हणून त्यांनी काय झकास मुद्दे मांडलेले. तर ही आमची शहाणी पंडिता त्यांचीच उलटी झाडाझडती घ्यायला लागली.

मग तुम्ही रोज तुमचा दातांचा ब्रश लाकडी वापरता का?

तुमची साबणाची डबी दगडी आहे का?

तुम्ही पाण्याची बाटली फिरायला नेताना ती काचेची नेता का?

आणि काय काय? बिच्चारे. इतक्या लोकांसमोर लाजच काढली अगदी त्यांच्या खिशाला लावलेले पेन काढून आपटले सरळ सगळ्यांसमोर. याची बनावट आणि रिफिल दोन्ही प्लास्टिकची आहे म्हणून. कोरडे उपदेश कसले जगाला करता? आधी स्वतः सांभाळून दाखवा तुमचे तंत्र आणि मग लोकांना त्यांच्या प्लास्टिकच्या वस्तूंची होळी करायला सांगा. कसले कावले डॉ. आयझॅक!

तुझ्यासारख्या लहान मुलींना कळणार नाहीत या गोष्टी. हळूहळू जग बदलते, त्याची सुरुवात कुठूनतरी करायला हवी असे मी म्हणत होतो, वगैरे वगैरे.

तेव्हा हे वागडे सरळ सगळ्या मुलांना घेऊन बाहेर पडले आणि मारे पंडीला शाबासकी देतायत.

मूर्ख कुठची ! डॉ. आयझॅकच्या व्याख्यानानंतर मध्यांतर झाले आणि शीतपेयांचे खोके आणणारी कार्यकर्ती मंडळी दिसली नाहीत का? चार शब्द नुसते ऐकून घेतले म्हणजे काय लगेच तिच्या घरातल्या सगळ्या प्लास्टिकच्या वस्तू पेट घेणार होत्या? ओम तेजा आणि धुंडीच्या जोडीला राम, श्याम देखील जाम चरफडले होते. शेरा मात्र तिचे कौतुक करत होता. आगीची मुलगी म्हणून, जेव्हा केव्हा ती अशी सर्रकन पेटून उठे.

कार्यशाळेच्या वर्गात, ड्रिल मशीनने भोक कसे पाडतात ते बघायला शेरा गेला आणि त्या लाकडी फळकूटासोबत त्याच्या खालच्या तयार टेबलाला सुद्धा भोक पाडले. तेव्हा त्या फर्निचरच्या दुकानाचे मालक सन्तासिंग आणि बन्तासिंग कपाळाला हात लावून बसले ते दृश्य ओमच्या डोळ्यासमोर तरळले. नंदा उघडेकडे मुलांची जबाबदारी होती. तिने शेराला आता पगडी बांधूया आणि त्याला तुमच्या जातीतला समजा वगैरे काही मखलाशी करायचा प्रयत्न केला होता. यावर दोघे सिंग बंधू एवढे संतापले की त्यांनी रागाने मुठी आवळल्या. त्याचबरोबर साऱ्या फौजेने तिथून पळ

काढला होता.

श्यामने कार्यशाळेच्याच अजून एका वर्गात गिरणीवाल्याच्या चक्कीत इतके गहू एकदम घातले की ती  बंद पडली. जोडीला विजेचा मुख्य फ्युज पण उडाला. कमी वेळेत जास्त काम उरकले की विजेची बचत होईल हे आपण चक्कीवाल्या यादवला पटवून देत होतो, असे स्पष्टीकरण नंतर श्यामने दिले. अर्थात सगळे यादवच्या दोन हातांपासून खूप लांब सुरक्षित अंतरावर पोहोचल्यावर. नंदा उघडे या अमुदि गटावर निहायत खूष होती. अशी धावाधाव जर दर दोन दिवसांवर घडायला लागली तर आपले जास्तीचे वजन दोन महिन्यात पार उतरेल अशी तिची खात्री होती.

रामने मात्र केशभूषाकार रशिदच्या वार्तालापाच्या व प्रात्यक्षिकाच्या वेळी स्वतःवर प्रयोग करून आपल्या केसांचे वाटोळे करून घेतले. म्हणजे त्याने त्यावर बॉल आणि बॅटची चित्रे कोरून घेतली. चंटीने एका नर्सरीवाल्याचा फवारे उडवण्याचा हातपंप नादुरुस्त करून ठेवण्यापलीकडे मोठा पराक्रम केला नाही. असे मोठ्ठे भीमपराक्रम करायची मक्तेदारी तेजाकडे होती.

मिठेलाल प्यारेमोहन हलवायाच्या दुकानात कार्यशाळेच्या वर्गात जिलेबीच्या उकळत्या तेलात, साखरेच्या पाकाच्याच थेट जिलेब्या बनवाव्यात असे काहीतरी आपल्याला सुचले होते, असे निवेदन तिने नंतर कधीतरी दिले. आता उरल्या आहेत त्या फक्त त्या क्षणाच्या कढत आठवणी. अगदी कढत कढत. आता सुद्धा ओमचा हात त्या फोड आलेल्या जागांवरून हळुवार फिरला. ते मिटले होते आणि त्याचे व्रणही आता बुजले होते. त्यांच्या पायी अख्ख्या गटाचे अमुदि वर्ग चार दिवस बंद पडले होते. त्यामुळे वाचनालयाचा दिवस एकदा बुडाला तर दुसऱ्यांदा वाचनालयाची फिरती गाडी वाटेत पंक्चर झाल्यामुळे येऊ शकली नव्हती.

आज तो दिवस उगवला होता. निघायची तयारी केली पाहिजे. ओम स्वतःशीच म्हणाला.

घोर एकटेपणाने अशी बडबडायची सवय त्याला लागली होती.

सरलकाकाने ओमला अमुदि वर्गात एकटे न सोडण्याची जबाबदारी तेजावर टाकलेली. डेपोवाला हरवण्याचा प्रसंग घडल्यावर पंडीवर सुद्धा.

त्यानंतर मात्र ओमला हरवणे दुरापास्त झाले. पंडीची त्याच्यावर सतत बारीक नजर असे.

इथे घरात बसण्यापेक्षा इमारतीखालच्या सोप्यात तेजाची वाट बघत बसणे बरे. खाली आल्यावर ओमला फार वेळ तेजाची वाट पाहावी लागली नाही. ती उत्साहाने सळसळत आली. अख्ख्या दिवसात आता कुठे ऊन आले होते. पावसाचे कोंदट वातावरण आता लख्ख श्रावणी उन्हाने उजळून निघाले होते. दोघे हातात

हात घालून मजेत गांधीजींच्या पुतळ्याच्या चौकाच्या दिशेने निघालेले. सारा परिसर स्वच्छ धुतल्यासारखा प्रसन्न दिसत होता. निसर्गशोभा दाखवण्याची त्या शहरी भूभागाची ऐपत नव्हती. हिरवळीचा छोटासा तुकडा गांधीजींच्या पुतळ्यापाशी पाहायला मिळेल अशी ओमची खात्री होती.

पुतळ्यापाशीचे ते फुलझाडांचे बेट सुरेख फुलारलेले होते. त्या बेटाच्या चारही बाजूंनी रस्ते व वाहतुकीचा गजबजाट होता. त्यापलीकडे फेरीवाल्यांनी अडवूनही शिल्लक उरणारे रुंद पदपाथ, त्यांना संलग्न अनेक उंची दुकाने. संध्याकाळच्या वेळी ती दिव्यांनी उजळून निघाली की तिथली शोभा विशेष बघण्यासारखी असे. फुलझाडांचे बेट व त्यामधल्या पुतळ्यावरही सुरेख प्रकाशझोत व दिवे उजळून निघत. ओल्या गच्च काळ्याभोर रस्त्यांवर मोटार गाड्या व इतर वाहनांचे रंगीबेरंगी दिवे प्रतिबिंबित होत. ते दृश्य ओमला फार आवडे.

लोकही रंगीबेरंगी कपड्यांनी सजून फेरफटका मारण्यासाठी तिथे येत. त्यांच्या अंगाला लावलेल्या प्रसाधनांचे, अत्तरांचे सुवास हवेत मिसळून एक प्रकारचा तरलपणा वातावरणात येत असे. त्यात खाऊपिऊच्या गाड्यांवरून सुग्रास, खमंग वास भर घालत. हसण्याखिदळण्याच्या आवाजांच्या जोडीला जोरजोराने तवा, कढई यांच्यावर आपटण्यात येणाऱ्या कालथ्यांचे आवाज, चुरचुर तव्यावर मारल्या जाणाऱ्या पाण्याचा आवाज, बशा चमच्यांचे चुटचुटीत, किणकिणते आवाज, बांगड्यांची सळसळ, उंच टाचांच्या चपलांची टपटप, रस्त्यावरच्या डबक्यातून उडणारे शिंतोडे, चिखलाने पावलांशी केलेल्या ओल्या गुदगुल्या. सारे वातावरण जल्लोषाने जिवंत होऊन उठत असे.

फेरीवाल्यांच्या आरोळ्या, गिऱ्हाईकांच्या चौकश्या, घासाघीस, बोली पटल्यावरचे हाकारे, आवाजांचा इतका गलका होऊन जाई की शेजारी उभ्या असलेल्या माणसांशी देखील तार स्वरात ओरडून बोलावे लागे. प्रत्येकाच्या ओरडण्याने आवाजाची पातळी अजून अजून उंचावर चढत जात असे. पूर्वी या अशा गर्दीला तो बुजून जात असे. आज मात्र त्याला ती खूप हवीशी वाटत होती. डेपोतल्या गर्दीसारखी ती आपल्या कामात मग्न, घाईघाईने दूर दूर पळणारी नव्हती. दिवसभर घड्याळाच्या काट्यानुसार वावरणारी हलणारी यंत्रे, संध्याकाळी परत चालती बोलती माणसे बनणार होती. एका लहान मुलाला एका क्रूर राक्षसाने चिरडण्याचा प्रयत्न केला तर ती त्याच्यासाठी भांडणार, लढणार होती. राक्षसाला दूर पिटाळून लावणार होती.

तो रम्य उल्हास प्रत्यक्षात साकारायला अजून वेळ होता. त्याची तयारी चालू असलेली. फेरीवाले गाडीवाल्यांच्या लगबग हालचाली चाललेल्या ओमला दिसत होत्या. त्याला गाणे गुणगुणावेसे वाटले. त्यांच्यासमोरून जाणारा माणूस देखील काहीतरी गुणगुणत होता. कोणी वंदा, कोणी निंदा.. असेच काही. त्याची

चाल विचित्र वाटत होती.

तेजा हलकेच ओमच्या कानात कुजबुजली, त्याने घेतलीय. ओमला तो माणूस अंगावरून गेला तेव्हा कसला एवढा उग्र दर्प नाकाशी झोंबला होता त्याचा उलगडा झाला.

दारू. ओमने तेजाला काय म्हणायचेय आपल्याला कळलेय दाखवण्यासाठी अजून खालच्या आवाजात उच्चारले. त्याबरोबर त्या दारुड्याने एकदम मागे वळून त्या दोघांकडे पाहिले.

श्शू.... त्याने तोंडावर बोट दाबत त्यांना गप्प केले. ओम आणि तेजा जागच्या जागी थारावले. तसे तारवटलेली नजर दोघांवरून फिरवून दारुड्या पुन्हा आपल्या मार्गाला लागला..

ओम! तेजा! त्यांच्या कानावर पंडीची हाक आली. एका मोठ्या मिनीबसपाशी ती पलीकडच्या पदपथावर उभी होती. नेहमीच्या घाईघाईने सिग्नलची पर्वा न करता तेजा सरळ रस्त्यावरच्या वाहनांच्या वर्दळीत शिरली आणि रस्ता पार करून गेली. ओमला तसे करता आले नाही. मग मोठ्या गाड्या, बसेसची त्याच्या समोरून रांग सुरू झाली. त्या बसेस कधी संपतायत याची वाट पाहत ओम थांबला.

सूर्य त्याच्या मागच्या बाजूला क्षितिजाकडे कलत चालला होता. एक मोठ्ठी सावली त्याला झाकोळून उभी राहिली. समोरून एखादी चकचकीत गडद रंगाची गाडी सरकली तर, तिच्यावर ती विक्राळ सावली जिथे पडे, तिच्यात मागच्या गोष्टी प्रतिबिंबित होत होत्या. अचानक त्या ओझरत्या दिसणाऱ्या प्रतिबिंबावर ओमचे लक्ष गेले. त्याचे हृदय जिथल्या तिथे थांबले. लालभडक शर्ट आणि त्यावरल्या त्या क्रूर दाट भिवया अन मिश्या. तो जाडजूड आकार एकाच व्यक्तीचा असू शकणार होता.

ती गाडी पुढे सरकून गेली. होता होता समोरच्या गाड्यांची रांग संपली. सिग्नल पडला. समोर तेजा आणि पंडी हातवारे करून त्याला लवकर ये खुणावू लागल्या. ओमला थोडा धीर आला. त्याने मागे वळून पाहिले.

ती मोठ्ठाली सावली दोन खचाखच भरलेल्या पिशव्या घेतलेल्या शांताबाईंची होती. ए चेंगट आता चल की पुढे, न्हाय तर हो बाजूला, मस्नी जाव दे.

ओम खजील झाला. आपल्याला ध्यानीमनी जाड्याच दिसतोय नुसता.

(क्रमश:)

समीर बागायतकर, वेंगुर्ला
९८६०४९८८६२
इ-मेल : ssbagayatkar@yahoo.co.in

# ओळखा पाहू



**नुकतेच दिवंगत झालेले चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध कलादिग्दर्शक**

विजेत्यास रु. १०१ चे रोख पारितोषिक दिले जाईल.

आपली उत्तरे दिनांक १५ जानेवारी २०११ पर्यंत आम्हाला मिळायला हवीत.

बरोबर उत्तरे देणाऱ्यांपैकी एकाची ड्रॉ पद्धतीने निवड करण्यात येईल.

निकाल फेब्रुवारी २०१२ च्या अंकात जाहीर होईल.

**उत्तरे पाठविण्याचा पत्ता :**

**मेहता पब्लिशिंग हाऊस,** मेहता मराठी ग्रंथजगत विभाग, १९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, पुणे टेलिफोन भवनसमोर, पुणे-४११ ०३०.

'सप्टेंबर' अंकातील 'ओळखा पाहू'चे उत्तर

मॅगसेसे पुरस्कार विजेत्या - निलिमा मिश्रा

स्पर्धेचे विजेते **महानूर वत्सला रामचंद्र - अहमदनगर**

अनिकेत कुलकर्णी, संज्योत कुलकर्णी, कागले नानासाहेब, सुरेखा हावळ, अनघा विभुते - कोल्हापूर, राहूल धाये - यवतमाळ, अस्मिता इनामदार, तनया कुलकर्णी - सांगली, यतीन गोरे - मुंबई, शोभा ढेपे, अंजू सराफ, रामचंद्र धर्माधिकारी, अंजली जोशी , सुरेश पवार- अहमदनगर, मिनल विद्वांस - इन्दौर, चैतन्य सरोदे - बारामती, चंद्रकांत अंबाडे - भुसावळ, निकिता यादव, शंकर घनवट - सातारा, यशवंत देशपांडे, दिगंबर गाडगीळ - नाशिक, संजय मुळे, शिवमंगल चव्हाण - अमरावती, सुमंगला गोखल, गुंजा घाटे, अनिकेत कुलकर्णी, व्यंकटेश काळे, उज्ज्वला फणसे, रमेश थेटे - पुणे, प्राची उमरकर - बुलढाणा, भीमराव गुंडे - सोलापूर, राम घाटे, संतोष काळबांडे, - अकोला, अंकुश घाटे, जयंत जुननकर - नागपूर, आरती पाणबुडे, शुभांगी महाराज, प्रतिक्षा भगवान बनसोडे - नांदेड, रविंद्र सराफ - रावेर

**प्रायोजक**

श्री.राजू जगदीशचंद्र मेहता, मे. हिराचंद नानचंद अँड कंपनी,

**साडी आडतीचे व लुंगीचे होलसेल व्यापारी**

टिळक चौक, मालेगाव, **जि.नाशिक.**

**सूचना** - प्रायोजकांच्या पत्त्यावर उत्तरे पाठवू नका.

# मेहता मराठी ग्रंथजगत

**वर्गणीदारांसाठी पुस्तक खरेदीवर सवलत**


**एक वर्षाला २०%   तीन वर्षांना २५%   पाच वर्षांना ३०%**

| एक वर्षाची | तीन वर्षांची | पाच वर्षांची |
|---|---|---|
| वर्गणी १५०रु. | वर्गणी ३५०रु. | वर्गणी ५००रु. |

**तीन किंवा पाच**
**वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट**

३ वर्षांची वर्गणी पाठवल्यास
**'लोखंड खाणारे उंदीर'** आणि **'नशीबवान शेखर'**
लेखिका : वृषाली पटवर्धन
प्रत्येकी ३० रु. ची
पुस्तके भेट!
पोस्टेज २०रु.

५ वर्षांची वर्गणी पाठवल्यास
**'चला जाणून घेऊ या! मंत्रसामर्थ्य'**
आणि **'चला जाणून घेऊ या! प्रार्थना'**
प्रत्येकी ४० रु. ची
पुस्तक भेट!
पोस्टेज २०रु.







**भेट पुस्तके प्रती शिल्लक असेपर्यंतच**

**मेहता मराठी ग्रंथजगत,** द्वारा मेहता पब्लिशिंग हाऊस,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे ४११ ०३०. फोन - (०२०) २४४७६९२४


**वर्गणी मनीऑर्डर अथवा डिमांड ड्राफ्टने वरील पत्त्यावर पाठवावी.**

RNI NO-MAHMAR/2000/2739
Regd.No.:L2/RNP/PNW/M/184/09-2011/ Posted at Marketyard Pso, Pune
Posting Date 11 Dec. 2011

# स्टीव्ह जॉब्ज

**नवे कोरे**

तंत्रज्ञानाच्या जगामधला सगळ्यात प्रसिद्ध जादूगार - स्टीव्ह जॉब्ज आपल्या अद्‌भुत कल्पनाशक्तीच्या जोरावर तयार केलेले कम्प्युटर्स, मोबाईल फोन्स, म्युझिक प्लेअर्स, टॅब्लेट पीसीज हे सर्व या जगाला त्याची आठवण देत राहतील.




जगभरातल्या लोकांच्या कल्पनाशक्ती पलीकडची उत्पादनं जॉब्जनं प्रत्यक्षात आणून दाखवली.

आपलं आयुष्यच तो एका वेगळ्या विश्वात जगला. राजाचा रंक आणि परत रंकाचा राजा असं सनसनाटी आयुष्य जॉब्जच्या वाट्याला आलं. सगळ्यांहून वेगळं आणि अगदी सर्वोत्तम असंच काम करून दाखवण्यासाठी तो आयुष्यभर प्रयत्नशील राहीला.

कर्करोगानं शरीर पोखरून टाकलं, तरी त्यानं शेवटपर्यंत आपल्या कल्पनांच्या भराऱ्या मारायचं काम थांबवलं नाही.

अशा या हट्टी, जिद्दी, कलाकार तंत्रज्ञाला सलाम करणारी ही रंजक चरित्रगाथा.

**लेखक : अच्युत गोडबोले । अतुल कहाते**
**९५ रु. पोस्टेज २५ रु.**

## मेहता पब्लिशिंग हाऊस

१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे - ३०. फोन - (०२०) २४४७६९२४

BOOK POST
Printed Matter

प्रति, ____________________

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट, ३५६, अ गणेश पेठ, पुणे २.